संस्थापक :
साने गुरुजी

# साधना

शनिवार
२ जानेवारी २०१०
मूल्य रु. १०/-

# ज्ञाननिर्मितीचे प्रयोजन आणि शिक्षकाची भूमिका

द. ना. धनागरे



*साधना अंकास हार्दिक शुभेच्छा*

# श्री लक्ष्मी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था मर्यादित, गडहिंग्लज, ता. गडहिंग्लज.

धान्य विभाग, दूध विभाग

हेड ऑफिस फोन : २२२६१२

## ''किसान मिनी बँक''



चेअरमन
**मा. श्रीपतरावजी शिंदेसो**
गोडसाखर गडहिंग्लज



चेअरमन
**मा. अनिल शेंडगे**
श्री.लक्ष्मी विकास सेवा संस्था मर्या. गडहिंग्लज



व्हा. चेअरमन
**मा. सौ.सोभा झोंड**
श्री. लक्ष्मी विकास सेवा संस्था मर्या. गडहिंग्लज



मा. नगराध्यक्षा
**मा. सौ. स्वाती कोरी**
गडहिंग्लज नगरपालिका गडहिंग्लज

## संस्थेची माहिती

सभासद संख्या : १९६९ — भाग भांडवल : २८. ९६ लाख

ऑडिट वर्ग : 'अ' — खेळते भांडवल : १.३० कोटी

गुंतवणूक : ३४.७५ लाख — नफा : १.६९ लाख

सरासरी दूध आवक : १२०० लिटर दैनंदिन

## -: संचालक मंडळ :-

श्री. सदाशिव चव्हाण
श्री. आप्पासो म्हेत्री
श्री. भैरू पाटील
श्री. गौस मुल्ला
श्री. शिवाजी ताशिळदार
श्री. कलगोंडा पाटील (सद्री)
श्री. काशिनाथ बेळगुट्टी
श्री. शिवाजी मेंडुले
श्री. निजामा हेब्बाळे
श्री. गणपती नेवडे
श्री. अनिल कुंभार
श्री. भैरू डोमणे (सचिव)
श्री. अजितभय्या नगाळे (सह. सचिव)
श्री. भैरू शिंदे (दूध मॅनेजर)
श्री. पुंडलिक गायकवाड (धान्य मॅनेजर)

**कर्मचारी वर्ग व सर्व सभासद वर्ग**

# ‘साधना’च्या वाटचालीची दिशा

एकविसाव्या शतकातील दहाव्या वर्षाच्या प्रारंभी ‘साधना’च्या आगामी वाटचालीबाबत विचार करीत असताना, आमचे मन कोणत्या दिशेने धावते आहे याची थोडीबहुत कल्पना वाचकांनाही असावी असे फार तीव्रतेने वाटते; कारण ‘साधना’चा प्रत्यक्षातील प्रवास आमच्या कार्यक्षमता आणि वाचक-लेखक, हितचिंतक-पाठीराखे यांचे सहकार्य या दोहोंवर अवलंबून आहे.

गेल्या वर्षी ‘साधना’च्या हीरकमहोत्सवाचा सांगता समारंभ भारताच्या राष्ट्रपतींच्या उपस्थितीत पार पडला, तेव्हा आम्ही दोन सूचक विधाने केली होती. १) ‘साधना’च्या हीरकमहोत्सवाची सांगता झाली याचा अर्थ ‘साधना’च्या अमृतमहोत्सवाची पायाभरणी पूर्ण झाली असा आम्ही घेतो. २) वैचारिक व परिवर्तनवादी नियतकालिक ही ‘साधना’ची ओळख अधिक ठळक व्हावी असा आमचा प्रयत्न राहील.

या वर्षीच्या दिवाळी अंकाच्या संपादकीयामध्ये आम्ही स्पष्टपणे नोंदवले आहे : संख्यात्मक व गुणात्मक या दोनही प्रकारची वाढ झाली तरच ‘विकास’ ही संज्ञा बहाल करता येते आणि त्याबाबत ‘साधना’ला आम्ही अपवाद करू इच्छित नाही.

**स्थापण्या समता शांती ठेवुनी शुद्ध साधनां । करिती साधना त्यांना ठेवो उत्स्फूर्त साधना**

हीरकमहोत्सवाच्या काळात (अमृतमहोत्सवाची पायाभरणी करण्यासाठी) ‘साधना’ने केलेले बहुतांश संकल्प समाधानकारकपणे प्रत्यक्षात अवतरले, पण सर्वांत महत्त्वाचा संकल्प मात्र पूर्णत्वास गेला नाही; तो म्हणजे नवे सहा हजार वर्गणीदार-वाचक मिळविण्याचा! अनेक कारणांमुळे व काही मर्यादांमुळे आम्ही त्या संकल्पपूर्तीसाठी पुरेसा वेळ देऊ शकलो नाही. त्यातच भर म्हणजे न चुकता दर गुरुवारी दुपारी एक वाजता अंक पोस्टात रवाना करूनही, पोस्ट खात्याच्या ढिसाळ कारभारामुळे अनेक वाचकांना ‘साधना’चे अंक मिळण्यात अनियमितपणा वाढला. शिवाय, साधना वेबसाईटवर गेल्या साठ वर्षांतील सर्व अंक असूनही, अधुनमधून होणारे तांत्रिक बिघाड व व्यवस्थापनातील दिरंगाई यांमुळे वेबसाईटवरही अनियमितपणा राहिला. साधनाच्या संख्यात्मक वाढीला अडथळा ठरणाऱ्या या तीनही त्रुटी (नवे वर्गणीदार, पोस्टाची दिरंगाई व वेबसाईटची अनियमितता) दूर करण्यासाठी आम्ही गेल्या तीन महिन्यांपासून नियोजन करीत आहोत; त्यासाठी काही तज्ज्ञ व्यक्ती-संस्था यांचे मार्गदर्शन-सहकार्य घेत आहोत. त्याबाबतची सविस्तर माहिती देणारी निवेदने पुढील काही अंकातून प्रसिद्ध होतील.

‘साधना’च्या संख्यात्मक वाढीसाठी आवश्यक असलेल्या वरील तीन उपाययोजनांबाबत आम्ही असमाधानी असलो तरी तीन दीर्घकालीन उपाययोजनांबाबत मात्र आम्ही बऱ्यापैकी यशस्वी ठरलो आहोत. १) या वर्षी बालकुमार दिवाळी अंकाच्या तब्बल १ लाख ४६ हजार प्रतींची विक्री झाली. हे यश आमच्या अपेक्षेपेक्षा अधिक असले तरी तो अपघात नव्हता. मुलांसाठीच्या अंकाला मागणी भरपूर असते आणि त्या अंकाची किंमत खूप कमी होती हे खरे असले तरी, हितचिंतक व्यक्ती-संस्था-संघटना यांचे पाठबळ मिळवता आले तर छोटीशी यंत्रणाही किती परिणामकारक काम करू शकते याचा तो पुरावा होता. खपाचा विक्रम, भरपूर प्रसिद्धी वा नफा कमावणे या पलीकडे आम्ही त्या अंकाकडे पहात आहोत. ‘बालकुमार’ अंकाला असाच प्रतिसाद पुढील वर्षीही मिळाला तर त्यानंतर ‘युवा’ अंकही प्रकाशित करण्याचा विचार आम्ही करीत आहोत. सलग सात-आठ वर्षे बालकुमार व युवा अंकांतून संस्कारित झालेली नवी पिढी साधना साप्ताहिकाची नियमित वाचक होण्यास भरपूर वाव आहे (अर्थात, वितरण यंत्रणा सक्षम असेल तर!) असे आम्हांला वाटते. हे काहींना स्वप्नरंजन वाटण्याची शक्यता आहे, पण ‘मार्केट’ व ‘मॅनेजमेंट’ यांची ही अगदी पायाभूत व पुरातन तत्त्वे आहेत.

२) गेल्या वर्षी ‘कादंबरी’ या वाङ्‌मयप्रकाराला केंद्र मानून पहिले साधना साहित्य संमेलन पुणे येथे झाले तर या वर्षी ‘कविता’ या वाङ्‌मयप्रकाराला केंद्र मानून, दुसरे साधना साहित्य संमेलन पणजी (गोवा) येथे पार

**२ जानेवारी २०१०**
वर्ष ६२ / अंक २१

● संपादक :
**नरेंद्र दाभोलकर**

● युवा संपादक :
**विनोद शिरसाट**

● हे साप्ताहिक मुद्रक, प्रकाशक नरेंद्र दाभोलकर यांनी **ब्ल्यू बर्ड (इंडिया) लिमिटेड**, पुणे ४ येथे छापून, **साधना साप्ताहिक, ९२६ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०**, येथे प्रकाशित केले.

● दूरध्वनी : **वर्गणी, पत्ता व अंकासंबंधी, [०२०] २४४५१७२४.** संपादक : टेलिफॅक्स – २४४३२४०२.
E-mail : weeklysadhana@gmail.com ● Website : www.sadhanatrust.com

● वार्षिक वर्गणी : व्यक्तिगत रु. ४००/-, संस्थांसाठी रु. ५००/- साधना मीडिया सेंटर – २४४५९६३५.

● [अंकात व्यक्त झालेल्या सर्वच मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.]

● मुखपृष्ठ : **राजू देशपांडे** Mob. 9326229188

● सहयोगी संपादक मंडळ : **अभय टिळक** (अर्थकारण), **राजा शिरगुप्पे** (सामाजिक), **अवधूत परळकर** (सांस्कृतिक), **संजय भास्कर जोशी** (साहित्य)

पडले. यापुढील काळात, दरवर्षी महाराष्ट्रातील वेगवेगळ्या जिल्ह्यांत असे संमेलन भरवले जाणार आहे. ग्रामीण भागातून, बहुजन समाजातून नवे वाचक-लेखक तयार होत आहेत, त्यांना 'साधना'शी जोडण्यात ही संमेलने उपयुक्त ठरणार आहेत. साहित्याच्या माध्यमातून समाजाशी संवाद व्हावा आणि त्यातून परिवर्तनाचा विचार पेरला जावा, या दृष्टीने साहित्य हे 'साधना'चे प्रमुख अंग राहिले आहे. मागील दोनही संमेलनांतून प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष होणारे फायदे बऱ्यापैकी स्पष्ट झाले आहेत.

३) साधना समकालीन हा सात दिवसांचा राजकीय-सामाजिक-सांस्कृतिक महोत्सव मागील दोन वर्षे पुणे शहरात उत्तमप्रकारे पार पडला. समकालीन प्रश्नांकडे लक्ष वेधणारा, चर्चा व चिकित्सा करणारा हा महोत्सव इतर शहरांतही भरवता आला तर त्याचाही 'साधना'च्या संख्यात्मक वाढीला फायदाच होणार आहे. व्याख्याने, चर्चासत्रे, प्रकाशन समारंभ, वाचक-कट्टे यांचे प्रमाण वाढून, इतर शहरांतही त्यांचे आयोजन करता यावे हा यापुढील टप्पा असेल. त्याची पूर्वतयारी म्हणून लहान-मोठे वाचक मेळावे आयोजित करण्याच्या दृष्टीने आम्ही नियोजन करीत आहोत.

साधनाची संख्यात्मक वाढ होण्यासाठी तत्कालीन व दीर्घकालीन उपाययोजनांना पूरक ठरण्यासाठी व आर्थिक स्थैर्यासाठी 'साधना प्रकाशन' व 'साधना मीडिया सेंटर' व्यावसायिक पद्धतीने (अर्थातच, मूळ गाभा न सोडता) चालविण्याचा प्रयत्न करीत आहोत.

साधना अंकाच्या गुणात्मक वाढीसाठीची आखणी 'स्लो बट स्टेडी' अशी आहे. विविध विषय हाताळण्यासाठी पानांची उपलब्धता व साधनसामग्रीची मर्यादा तर असतेच, पण त्याहून अधिक वेळेची मर्यादा असते. राजकीय, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व साहित्यिक असे साधना अंकाचे पाच प्रमुख घटक आहेत. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील घटना-घडामोडींचे ताणेबाणे उलगडून दाखवणे हेही आवश्यक असते आणि त्याच वेळी विज्ञान, कृषी, शिक्षण अशा मूलभूत विषयांकडेही लक्ष वेधणे आवश्यक असते. नव्या व तरुण लेखकांचा शोध घेऊन त्यांना लिहिते करायचे असते आणि ते करताना अंकातील लेखनाचा दर्जा खालावणार नाही याचीही काळजी घ्यायची असते. शिवाय, अंक छापायला गेल्यानंतर आठवडाभरानंतर वाचकांच्या हातांत तो पडणार असतो, त्यामुळे अनेक घडामोडी हाताळता येत नाहीत किंवा तोपर्यंत परिस्थिती बरीच बदललेली असते. अशा पार्श्वभूमीवर तुलनेने दुर्लक्षित विषयांना हात घालणे, अतिपरिचित विषयांचे अंतरंग उकलून दाखवणे आवश्यक ठरते; म्हणजे केवळ माहिती देणारे नाही तर विश्लेषण करून भाष्य करणारे लेखन प्रसिद्ध करण्यास प्राधान्य द्यावे लागते.

अशा अनेक मर्यादा असल्या तरी साधना साप्ताहिकाची बलस्थानेही कमी नाहीत. सुशिक्षित, प्रौढ व समाजसन्मुख वाचक वर्ग 'साधना'ला लाभलेला आहे. त्यामुळे राजकीय-सामाजिक प्रश्नांबाबत वाचकांना विचारप्रवृत्त करणारे व काही प्रश्नांची कोंडी फोडणारे लेखन 'साधना'तून प्रसिद्ध करायला भरपूर वाव आहे. गेल्या वर्षीची तीन उदाहरणे लक्षणीय आहेत. १) 'नक्षलवादाचे आव्हान' हा विशेषांक प्रसिद्ध केला, त्यामुळे देशासमोरील अतिशय महत्त्वाच्या प्रश्नाबाबत चांगली चर्चा घडून आली. त्या अंकातील महेश भागवत यांची मुलाखत (नक्षलवादाशी लढण्याचा फॉर्म्युला) ज्येष्ठ अर्थशास्त्रज्ञ डॉ. नीळकंठ रथ यांनी उडिया भाषेत अनुवाद करून ओडिशातील एका मोठ्या नियतकालिकाकडे प्रसिद्धीसाठी पाठवली. २) माजी कुलगुरू डॉ. द. ना. धनागरे यांनी 'विद्येच्या प्रांगणात' या सदरातील बारा लेखांतून उच्च शिक्षणाच्या क्षेत्रातील अतिशय महत्त्वाच्या प्रश्नांकडे लक्ष वेधले, त्याची विद्यापीठ स्तरावर भरपूर चर्चा झाली. ३) दिवाळी अंकातील राजा शिरगुप्पे यांचा 'शोधयात्रा : ग्रामीण महाराष्ट्रातील दुर्गम भागांची' हा प्रत्यक्ष अनुभवावर आधारित ४६ पानी लेख, या वर्षीच्या सर्व दिवाळी अंकातील सर्वोत्तम लेख आहे, असे प्रसारमाध्यमातील अनेकांनी बोलून दाखवले.

अशा प्रकारची इतर काही उदाहरणे सांगता येतील, पण तरीही हे प्रमाण आमच्या अपेक्षेइतके नाही हे मान्य केलेच पाहिजे. यासाठी आम्ही काही तरुण पण सक्षम लेखकांना अभ्यासवृत्ती देऊन लेखन मिळविण्याचा प्रयत्न करणार आहोत. वैचारिक लेखन 'साधना'तून बऱ्यापैकी प्रसिद्ध होत असले आणि ते परिवर्तनाला पोषकच ठरणारे असले तरी प्रत्यक्ष चळवळी, आंदोलन व विधायक उपक्रम याबाबतचे लेखन मात्र फारच कमी प्रसिद्ध होत आहे, याचे खूपच असमाधान आम्हाला आहे! असे लेखन प्रत्यक्ष काम करणारे लोक क्वचितच लिहितात आणि बऱ्याच वेळा त्यात वृत्तांत किंवा औपचारिक माहितीच फक्त असते. ही मर्यादा ओलांडण्यासाठी प्रत्यक्ष त्या त्या ठिकाणी सामाजिक-राजकीय भान असलेल्या लेखकांना पाठवून 'कार्यकर्ता', 'संघर्षकथा' व 'विधायक वाटा' ही सदरे नियमितपणे चालतील असा प्रयत्न आम्ही करणार आहोत.

साधना साप्ताहिक वंचित-शोषित घटकांना आपले पाठीराखे वाटावे, सक्रिय सज्जनशक्तीचे व्यासपीठ बनावे आणि समाजस्वास्थ्य बिघडवणाऱ्या घटकांना जरब बसवणारे ठरावे असा आमचा प्रयत्न राहील. कारण साने गुरुजींचे विचार व कार्य यांचा गाभाही हाच होता!

---

**सहयोगी संपादक मंडळाची कल्पना :** कोणत्याही नियतकालिकाला कालसुसंगत राहण्यासाठी व परिणामकारक ठरण्यासाठी नवीन विषय, नवीन लेखक व ताजे लेख मिळवणे ही प्रक्रिया सतत चालू ठेवावी लागते. साधना अंकाचे संपादन करताना वाचक-लेखक व विविध क्षेत्रांतील लोकांशी आम्ही अनौपचारिकपणे तर नेहमीच बोलत असतो; पण लहान-मोठ्या बैठका घेऊन अंकाच्या नियोजनाबाबत चर्चाही करीत असतो आणि अंकाच्या निर्मितीत त्यांचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष उपयोगही करीत असतो. हेच काम अधिक सुसंगतपणे करता यावे यासाठी आम्ही सहयोगी संपादक मंडळाची संकल्पना राबवण्याचा निर्णय घेतला आहे. काही विषयांकडे जाणीवपूर्वक व विशेष लक्ष देण्यासाठी त्या त्या विषयांच्या जाणकार-अभ्यासकांचे सहकार्य मागितले आहे. पुढील वर्षभरासाठी आम्ही अभय टिळक (अर्थकारण), राजा शिरगुप्पे (सामाजिक), अवधूत परळकर (सांस्कृतिक) व संजय भास्कर जोशी (साहित्य) या चौघांचे सहकार्य मागितले आहे. यांनी प्रत्येक महिन्यात त्यांच्या विषयांच्या अनुषंगाने एखादा लेख द्यावा, अन्य लेखकांकडून एखादा लेख मिळवावा किंवा लेखकांची-विषयांची नावे सुचवावीत अशी अपेक्षा आहे.

या चौघांनीही देऊ केलेल्या सहकार्याबद्दल आम्ही आभारी आहोत.

**– संपादक 'साधना'**



विद्येच्या प्रांगणात

द. ना. धनागरे

# ज्ञाननिर्मितीचे प्रयोजन आणि शिक्षकाची भूमिका

**उत्कृष्ट शिक्षक असूनही ते आदर्श नाहीत/ नव्हते याचे उदाहरणच द्यायचे झाल्यास, महाभारतातील द्रोणाचार्यांचे घेता येईल. धनुर्विद्येच्या क्षेत्रात त्यांच्यासारखा उत्कृष्ट शिक्षक दुसरा नव्हता, पण ज्यांना शिकवण्यासाठी द्रोणाचार्यांना नियुक्त केले होते, त्या कौरव-पांडवांपेक्षा अधिक चांगली तयारी एकलव्याची झालेली पाहून द्रोणाचार्यांना त्यात एक तर स्वत:चाच शिक्षक म्हणून पराभव झाल्याच्या भावनेने ग्रासले म्हणा, किंवा राजपुत्रांपेक्षा सरस अशी विद्या तळागाळातून वर आलेल्या एकलव्याने कुणाच्याही मार्गदर्शनाशिवाय आत्मसात करून दाखवली हे राजघराण्याच्या इभ्रतीला हानिकारक ठरेल अशी भीती वाटली असावी म्हणून, द्रोणाचार्यांनी एकलव्याकडे 'गुरुदक्षिणा' म्हणून 'उजव्या हाताचा अंगठा कापून मला दे' अशी मागणी केली. तशी गुरुदक्षिणा मागण्यात द्रोणाचार्यांनी अध्यापकाचा धर्म पाळला नाही आणि दुसरे म्हणजे शिक्षकाने शिरोधार्य मानावे अशा व्यावसायिक नीती-मूल्यांशी अक्षम्य तडजोड केली. मुख्य म्हणजे प्रत्यक्षात एकलव्याला द्रोणाचार्यांनी मुळात धनुर्विद्या शिकवलेलीच नव्हती. त्यामुळे गुरुदक्षिणा मागण्याचा त्यांना नैतिक अधिकार तरी कुठे होता? उत्कृष्ट शिक्षक हा 'आदर्श शिक्षक' असतोच असे नाही हे त्यामुळेच.**

एक उत्तम आदर्श शिक्षक, अध्यापक वा प्राध्यापक कसा असावा? या प्रश्नाचे सर्वमान्य असे उत्तर देणे तसे कठीणच आहे. मात्र त्याच्या व्यवच्छेदक लक्षणांचा शोध घेण्याचा प्रयत्न नक्कीच करता येईल. प्रतिवर्षी ५ सप्टेंबर हा 'शिक्षक दिन' म्हणून भारतभर पाळला जातो. भारताचे दुसरे राष्ट्रपती डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन् यांचा तो जन्मदिवस. त्यांचा तत्त्वज्ञानातील, विशेष: भारतीय दार्शनिक परंपरेच्या अभ्यासातील व्यासंग विद्वत्मान्य होता. ते एक उत्तम प्राध्यापकही होते. ऑक्सफर्ड विद्यापीठामधील भारतीय तत्त्वज्ञानाच्या अध्यासनावर नियुक्ती होणारे ते पहिले भारतीय प्राध्यापक होते. त्यांचे इंग्रजी भाषेवरील प्रभुत्व आणि वक्तृत्व अनुभवण्यासाठी आणि ऐकण्यासाठी केवळ विद्यार्थीच नव्हे, तर डॉ.राधाकृष्णन यांचे सहकारी प्राध्यापकसुद्धा उत्सुक असत. ब्रिटिश संसदेपुढे व्याख्यान देण्यासाठी त्यांना सन्मानपूर्वक निमंत्रण दिले होते. असा बहुमान फारच थोड्या भारतीय राजकारणी व मुत्सद्यांना आजवर मिळाला आहे. अशा थोर प्राध्यापक-मुत्सद्दी (academician-statesman) व्यक्तीचे स्मरण चिरंतन/निरंतर होत रहावे म्हणून त्यांच्या जन्मदिनी 'शिक्षक दिन' साजरा केला जातो. निदान भारत सरकार शिक्षकदिनाचे हेच'अधिकृत स्पष्टीकरण' म्हणून सांगत असते.

मात्र लगेचच मनात प्रश्न येतो की, 'गुरुपौर्णिमे'च्या दिवशीसुद्धा विद्यार्थी त्यांच्या त्यांच्या शिक्षक/प्राध्यापकांना अभिवादन करतात; कोणी पुष्पगुच्छ देऊन तर कोणी भेटकार्डाच्या माध्यमाद्वारे शिक्षकांना शुभेच्छा देतात. केंद्रशासन आणि राज्यशासनही 'प्राथमिक, माध्यमिक, महाविद्यालयीन आणि विद्यापीठीय' अशा वेगवेगळ्या विभागातून आदर्श शिक्षकांची निवड करून त्यांचा सन्मान करते. पुरस्कार-प्रदान सोहळा नंतर होत असेल/होतो; मात्र 'गुरुपौर्णिमा', 'गुरुपूजन' आणि 'गुरुदक्षिणा' या संकल्पना भारतीय विद्यार्जन आणि विद्यादान परंपरेत रूढ झालेल्या आहेत. भारतीय पंचांगात गुरुपौर्णिमेच्या दिनविशेषांत 'व्यासपूजादिन' असेही लिहिलेले असते. याचा अर्थ काय? व्यास हे उत्तम, शिक्षक होते काय? एक ज्ञानव्रती गुरुवर्य म्हणून महर्षी व्यासांची महती नेमकी कोणती? एक शिक्षक म्हणून वेदव्यासांचे कोणते कार्य आजच्या शिक्षकांच्या-प्राध्यापकांच्या पिढीलासुद्धा प्रस्तुत आणि कालसुसंगत वाटेल?

### व्यासांच्या कार्याची व्याप्ती

नमोऽस्तुते व्यास विशालबुद्धे फुल्लारविंदा यतपत्र नेत्र:
येनत्वया भारततैलपूर्ण: प्रज्वलितो ज्ञानमयप्रदीप: ।।

भगवद्गीतेच्या प्रार्थनेत प्रथम व्यासांना वंदन केले जाते, कारण 'महाभारतरूपी तेलाने त्यांनी ज्ञानदीपच प्रज्वलित केला आहे' असे कृतज्ञतापूर्वक म्हटले जाते. पण 'महाभारत' ह्या व इतर पुराणांचे रचनाकार एवढीच व्यासांची ओळख नाही. ज्ञानाच्या सर्वच शाखांचा धांडोळा व्यासांनी घेतलाय. त्यासाठी त्यांनी अथक प्रयत्न आणि प्रवास करून वेद आणि वेदोत्तरकालीन अभिजात मौखिक परंपरांचे संहितेत रूपांतर

केले, दस्तावेजीकरण (Documentation) केले; त्यावर संशोधन केले. व्यासांमुळेच प्राचीन भारतातील विस्मृतीत गेलेल्या विविध विद्या, शास्त्रे आणि कलांचे पुनरुज्जीवन तर झालेच, पण वेदवेदांगांचे संकलन-संपादन आणि विभाजनाचे प्रचंड कार्य त्यांनी केल्यामुळेच आजपर्यंत भारतीय संस्कृती अबाधित राहिली, तिचे सातत्य अक्षुण्ण राहिले असे मानले जाते.

असे हिमालयाच्या उंचीचे काम एक व्यक्ती तिच्या मर्यादित जीवनकाळात कसे करू शकेल? हे कार्य तर शतकानुशतके पुरले असेल. त्यामुळे काही प्राच्यविद्यापंडित असेही मानतात की, 'हस्तिनापुरालगतच्या प्रदेशात पराशरमुनी आणि नाव (नौका) चालवणारी एक धीवर (कोळी) कन्या सत्यव्रती, यांच्या कामसंगातून जो पुत्र जन्माला आला तोच वेदव्यास आणि त्याचा जन्मकाल सामान्यत: इसवीसन पूर्व ३१०० असावा' (संदर्भ : पहा भारतीय संस्कृतिकोश, खंड ९, (१९९३), पृष्ठ १५६.) अर्थात ही पुराणकथा (Mythology) आहे. तिला ऐतिहासिक सत्य मानले तरीही वेद-वेदोत्तर वाङ्मयाचे संकलन, संशोधन आणि संपादनाचे कार्य आटोक्यात यायला शतकेच नाही, तरी एक सहस्रक सहज लागले असावे. त्यामुळे 'व्यास' हे वैचारिक परंपरेचे, सिद्धांतन आणि अभ्यास-संशोधनपद्धतीचे (School of Thought) द्योतक असावे; म्हणजेच मूळ पुरुष व्यासऋषी जरी असले, तरीही नंतर मात्र त्यांच्या व्यासंगाचा वारसा सांगणारा 'व्यास' हा एक बौद्धिक संप्रदाय झाला असावा. कारण देवी भागवतात एकूण २८ व्यासांची नामावली दिलेली आहे आणि त्यातली आठ-दहा नावे ही आज गोत्र-नामे म्हणूनच सांगितली जातात. (पहा, संस्कृतिकोष, पूर्वोल्लेखित, पृष्ठ १५६).

मुख्य म्हणजे व्यासांची परंपरा महाभारताची संहिता करून थांबली नाही तर, त्या महाकाव्यात वर्णिलेल्या घटना, कथा 'व्यासपीठा'वरून अनेक प्रवचने, भाषणे देऊन तिने त्या जनमानसात कायम घर करून बसतील असा प्रयत्न अव्याहतपणे केला. त्याद्वारे लोकांना 'धर्म' म्हणजे काय, 'नीतिमत्ता', 'मानव आणि सृष्टी यांचा परस्परसंबंध', 'जन्म-मरण' यांबद्दल लोकशिक्षण होईल असा प्रयत्न केला. जेणेकरून पुढे हरिकथा, कीर्तन-प्रवचनांद्वारे बुद्धिवंतांचा अभिजनवर्ग आणि सर्वसामान्य लोक यांच्यातील दरी कमी करून भारतात एकात्मता साधली जाईल. तसेच 'प्रेम, मैत्री, उद्यमशीलता, मानवता-मूल्यांची जोपासना, राष्ट्रीय सौहार्द आणि नीतिशिक्षणाचा प्रसार-प्रचार ह्या व्यासपरंपरेने केला आहे' (पहा- संस्कृतिकोश, पूर्वोल्लेखित, पृष्ठ १५९). म्हणूनच 'व्यासोच्छिष्टं जगत्सर्वम्'- म्हणजे जगातले सर्व ज्ञान व्यासांनी उष्टे करून सोडलेय असेही म्हटले जाते.

याचा अर्थ असा होतो की, व्याससंप्रदायाने/परंपरेने उत्कृष्ट लोकशिक्षक निर्माण केले. त्यांनी फक्त शास्त्रे, वाङ्मय, कला जोपासल्या एवढेच नाही, तर त्या लोकांना शिकवल्या, धर्म, नीती यासंबंधीच्या कल्पना प्रत्यक्ष आचरणात कशा आणायच्या ते स्वत:चा आदर्श लोकांसमोर ठेवण्याकरिता त्यांनी प्रथम आत्मसात केल्या, आपले वागणे आणि बोलणे यांच्यात विसंगती असता कामा नये हे जनमानसात बिंबवले. ह्या अर्थाने 'व्यास' हे उत्कृष्ट आणि आदर्श शिक्षक होते असे म्हणता येईल. 'उत्कृष्ट' आणि 'आदर्श' ही दोन स्वतंत्र विशेषणे आहेत. त्यांना 'एकाच नाण्याच्या दोन बाजू' असे म्हणता येत नाही. तसेच एकात दुसरे सामावलेले असतेच असेही गृहीत धरता येत नाही. याचा अर्थ 'आदर्श' शिक्षक हा 'उत्कृष्ट' अध्यापक असेलही, पण जो शिक्षक उत्तम अध्यापन करतो, (म्हणजे ज्याचा विषयाचा अभ्यास अद्ययावत तर आहेच, पण तो विषय विद्यार्थ्यांना समजावून सांगण्याची कला आणि हातोटीही त्याच्याजवळ आहे) त्याला 'उत्कृष्ट' अध्यापक म्हणता येईल. मात्र तो 'आदर्श' असेलच हे सांगता येणार नाही. एखाद्या अध्यापकाला विद्यार्थ्यांनी 'आदर्श' मानणे हे त्याच्या व्यासंग आणि अध्यापनकौशल्याव्यतिरिक्त त्या पलीकडच्या व्यक्तिमत्त्वाशी निगडित असते. शिक्षकाचे वर्तन, चारित्र्य, विद्यार्थी-विद्यार्थिनींशी असलेले निकोप संबंध, त्याचा प्रामाणिकपणा, त्याची नि:स्पृहता, ज्ञाननिष्ठा आणि ज्ञानदान ह्यांनाच अध्यापकी व्यवसायाचा मूलाधार मानून स्वत:चे कर्तव्य नि:स्पृहपणे करणे, ही आदर्श शिक्षकाची लक्षणे सर्वसामान्यपणे मानली जातात.

उत्कृष्ट शिक्षक असूनही ते आदर्श नाहीत/नव्हते याचे उदाहरणच द्यायचे झाल्यास, महाभारतातील द्रोणाचार्यांचे घेता येईल. धनुर्विद्येच्या क्षेत्रात त्यांच्यासारखा उत्कृष्ट शिक्षक दुसरा नव्हता. म्हणूनच कौरव-पांडवांना त्या विद्येत पारंगत करण्यासाठी द्रोणाचार्यांवर जबाबदारी टाकण्यात आली होती. मात्र ते प्रशिक्षण सुरू असताना एकलव्य दुरूनच ती विद्या आत्मसात करीत होता. राजकुलात, तेही क्षत्रियांच्या कुळात त्याचा जन्म झालेला नव्हता म्हणून धनुर्विद्येचे शिक्षण राजगुरूंकडून, म्हणजे द्रोणाचार्यांकडून घेण्याचा त्याला अधिकार नव्हता. पण तरीही दुरूनच निरीक्षण करून एकलव्य त्या विद्येचा अभ्यास आणि सराव करू लागला. दंतकथा अशी सांगितली जाते की, द्रोणाचार्यांना मनाने 'गुरू' म्हणून स्वीकारून गुरूंच्या साक्षीने आपण धनुर्विद्येचा अभ्यास करावा ह्या हेतूने एकलव्याने त्यांची एक मूर्ती तयार केली आणि त्या मूर्तीसमोर, तिच्या साक्षीने तो धनुर्विद्येचा सराव करू लागला. काही काळानंतर द्रोणार्यांना हे कळले आणि त्यांनी एकलव्याची परीक्षा घेतली तेव्हा एकलव्याने कौरव-पांडवांपेक्षा अधिक सरस ठरेल असे प्रावीण्य मिळविल्याचे त्यांच्या ध्यानात आले. पण ज्यांना शिकवण्यासाठी द्रोणाचार्यांना नियुक्त केले होते, त्या कौरव-पांडवांपेक्षा अधिक चांगली तयारी एकलव्याची झालेली पाहून द्रोणाचार्यांना त्यात एक तर स्वत:चाच शिक्षक म्हणून पराभव झाल्याच्या भावनेने ग्रासले म्हणा, किंवा राजपुत्रांपेक्षा सरस अशी विद्या तळागाळातून वर आलेल्या एकलव्याने कुणाच्याही मार्गदर्शनाशिवाय आत्मसात करून दाखवली हे राजघराण्याच्या इभ्रतीला हानिकारक ठरेल अशी भीती वाटली असावी म्हणून, द्रोणाचार्यांनी एकलव्याकडे 'गुरुदक्षिणा' म्हणून 'उजव्या हाताचा अंगठा कापून मला दे' अशी मागणी केली. ती पूर्ण केल्यानंतर निरुपयोगी झालेल्या हाताने एकलव्य प्रत्यंचा कधीच ओढू शकला नाही. तशी गुरुदक्षिणा मागण्यात द्रोणाचार्यांनी अध्यापकाचा धर्म

पाळला नाही आणि दुसरे म्हणजे शिक्षकाने शिरोधार्य मानावे अशा व्यावसायिक नीती-मूल्यांशी अक्षम्य तडजोड केली. एक तर त्यांनी विशुद्ध आणि निरपेक्ष ज्ञानदानाचे व्रत मोडले; आणि दुसरे म्हणजे विद्याभ्यासातील प्राविण्याचे तौलनिक मूल्यांकन करताना शिक्षणबाह्य निकष वापरले, म्हणजे राजघराण्याचे श्रेष्ठत्व सिद्ध करण्याचे किंवा ते अबाधित राखण्याचे राजकारण त्यांनी केले. अन्यथा त्यांनी 'अंगठा कापून दे' अशी दक्षिणा एकलव्याकडे मागितली नसती. मुख्य म्हणजे प्रत्यक्षात एकलव्याला द्रोणाचार्यांनी मुळात धनुर्विद्या शिकवलेलीच नव्हती. त्यामुळे गुरुदक्षिणा मागण्याचा त्यांना नैतिक अधिकार तरी कुठे होता? उत्कृष्ट शिक्षक हा 'आदर्श शिक्षक' असतोच असे नाही हे त्यामुळेच. एका आदर्श अध्यापकाने असा व्यवहार कधीच केला नसता.

### शिक्षक आणि सद्गुरू

पारमार्थिकतेच्या संदर्भात आणि भक्तिमार्गात काही महापुरुषांना, सिद्धी प्राप्त व्यक्तींना 'सद्गुरू' म्हणून मानले जाते. ज्याला साक्षात् ईश्वराचे दर्शन झाले आहे, किंवा तशी अनुभूती आहे त्याला सद्गुरु समजले जाते. ते त्यांच्या शिष्यांना अनुग्रह देतात, मंत्र सांगतात, नामस्मरण-जपजाप्य करायला सांगतात. शिष्यसुद्धा सद्गुरूंची/महाराजांची पाद्यपूजा करतात आणि त्यांची कृपादृष्टी रहावी म्हणून त्यांची आज्ञा शिरसावंद्य मानतात. दैनंदिन जीवनात अडीअडचणी आल्या, संकटे आली की सद्गुरूंच्या प्रतिमेसमोर प्रार्थना केली की सर्व संकटे दूर होतील अशी श्रद्धा बाळगतात. किंबहुना जोपर्यंत एखादा शिष्य आपले 'मी-पण' विसरत नाही तोपर्यंत त्याला सद्गुरूंच्या कृपेची अनुभूती होत नाही, प्रचिती खऱ्या अर्थाने येणार नाही असे मानले जाते. (संदर्भ- पहा श्री ब्रह्मचैतन्य महाराज गोंदवलेकर, 'पारमार्थिक शंका समाधान', गोंदवले, फेब्रुवारी २००४, पृष्ठ. १०-१२). एका अर्थाने सद्गुरूही आपल्या शिष्यांना काहीतरी शिकवीत असतो, खऱ्या ज्ञानप्राप्तीचा मार्ग कोणता, मन एकाग्रचित्त कसे करावे, माझे 'मी-पण' कसे सद्गुरूंच्या चरणी समर्पित करावे याबद्दल, म्हणजे आत्मबोध कसा होतो/होऊ शकेल, हेच शिकवीत असतात. मात्र सद्गुरू आणि त्यांच्या शिष्यांमध्ये साध्य-साधकाचे, किंवा सेव्य सेवकाचे नाते असते.

आजच्या काळाच्या संदर्भात अध्यापक आणि विद्यार्थ्यांचे नाते मात्र तसे नसते. शिक्षक उत्तम असला, उत्तम आचरणाद्वारे विद्यार्थ्यांवर सुसंस्कार करीत असला, म्हणजे त्याच्याबद्दल विद्यार्थ्यांना आदर वाटतो. कदाचित 'शिक्षकदिनी' किंवा 'गुरुपौर्णिमे'ला शिक्षकाच्या घरी जाऊन ते त्याला अभिवादन, चरणस्पर्शही करतील. तरीही त्यांचे नाते साध्य-साधकाचे नसते. शिक्षकाच्या व्यक्तिमत्त्वाची छाप विद्यार्थ्यांवर पडू शकते, त्याचे वागणे त्यांना अनुकरणीयही ('रोल मॉडेल'सारखे) वाटेल. तरीपण शिक्षकाला आपण आध्यात्मिक/पारमार्थिक अर्थाने 'सद्गुरू' म्हणत नाही, किंवा विद्यार्थी त्यांचे भक्त नसतात. आणि विद्यार्थ्याला भावी आयुष्यातील वाटचालीसाठी शिक्षक-प्राध्यापकाने 'प्रमाणपत्र' जरी दिले, तरी त्याने विद्यार्थ्याला 'अनुग्रह' दिला, 'कानमंत्र' दिला असा शब्दप्रयोग आज शैक्षणिक विश्वात सहसा कोणी वापरत नाही.

याचा अर्थ असा की विद्यार्थ्यांना एखादा विषय तन्मयतेने शिकविणारा अध्यापक जाणते-अजाणतेपणाने त्यांच्यावर संस्कार करीत असतो, त्यांना घडवीत असतो. ह्या संस्कारनिर्मिती प्रक्रियेचा परिणाम कालांतराने दिसतो, पण तिचे निश्चित मोजमाप संख्यात्मक पद्धतीने कधीच करता येत नाही. किंवा त्या प्रक्रियेचे चित्रीकरणही करणे शक्य नसते. तरीही शिक्षक विद्यार्थ्याला घडवतो, त्याच्या जडणघडणीत महत्त्वाची भूमिका बजावतो हे सत्य नाकारता येत नाही. या संदर्भात एका ख्रिस्ती धर्मोपदेशकाची गोष्ट फार समर्पक आहे. एकदा एक धर्मोपदेशक खेड्यातून पाऊलवाटेने (शेतामधून) धर्मप्रसाराच्या कामासाठी चालला होता. तिथे त्याला एक राबणारा शेतकरी दिसला. त्याचे हिरवेगार, बहरलेले, समृद्धीने नटलेले शेत-पीक पाहून तो धर्मोपदेशक शेतकऱ्याला म्हणाला, 'ही समृद्धी, तुझ्या शेतातलं हे उत्तम बागायती पीक म्हणजे परमेश्वराची कृपा आहे!' शेतकऱ्याला त्याची ती बोजड भाषा समजली नाही. पण हा ख्रिस्ती धर्मोपदेशक आपल्या बहरलेल्या शेताबद्दल चांगले बोलतोय असे त्याला जाणवले. तेव्हा शेतकरी म्हणाला, 'बरोबर आहे, मी परमेश्वराचा ऋणी आहे, त्याचीच ही कृपा आहे हे सर्व खरं, पण जेव्हा हे शेत पूर्णपणे परमेश्वराच्या मालकीचं होतं, आणि त्याच्याच ताब्यात होतं तेव्हा या शेताची दशा तुम्ही बघायला हवी होती.' म्हणजे शेतकऱ्याच्या प्रयत्नाशिवाय काही ते शेत हिरवंगार झालेलं नव्हतं; तिथली समृद्धी त्याच्या कष्टातून साकारलेली होती. आपण 'प्रयत्नांती परमेश्वर' असं म्हणतो, पण 'समृद्धी ही काही दैवी देणगी नसते, ती माणसाच्या कष्टाचीच कमाई असते. तसेच शिक्षक विद्यार्थी घडवतो म्हणजे तो दैवी कृपाप्रसाद नसतो. तर शेतकऱ्याने शेताची जशी मशागत केलेली असते, पिकांची राखण केलेली असते, त्याप्रमाणे शिक्षक विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देत असतो. त्यानेच विद्यार्थ्यांची 'मशागत' केलेली असते, त्यांना घडविलेले असते.

### 'शिक्षक': एका व्यापक अर्थाने

केवळ वर्गात नियोजित तासांवर जाऊन एखाद्या विषयावर भाषण देणे, किंवा शिकवणे एवढेच 'शिक्षका'कडून अपेक्षित आहे का? जर आपल्या अंगिकृत कार्यात इतरांना गोडी लावून त्या कामाचे महत्त्व पटवून देणे आणि त्या कामाची प्रेरणा देणे हेसुद्धा चांगल्या शिक्षकाचे एक लक्षण असेल, तर मग इतिहासात अशा अनेक थोर व्यक्ती-विभूती होऊन गेल्या. ज्या लौकिकार्थाने शिक्षकी पेशात नव्हत्या, पण त्यांनी ध्येयासक्तीच्या झपाटलेपणाने हाती घेतलेल्या कामासाठी इतरांना उद्युक्त केले असेल, तर एका अर्थाने त्या व्यक्तीलाही आपण शिक्षक म्हणू शकू. लौकिकार्थाने जरी ती व्यक्ती शिष्य तयार करीत नसली, तरीही ती 'लोकशिक्षक' म्हणूनच कार्य करीत असते, मान्यता पावते. ह्या अर्थाने अब्राहम लिंकन, चर्चिल, लेनिन, जोसेफ मॅझिनी, महात्मा गांधी, पं.जवाहरलाल नेहरू, महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, स्वातंत्र्यवीर सावरकर

किंवा योगी अरविंद, रामकृष्ण परमहंस, स्वामी विवेकानंद यांच्यापासून तर जे कृष्णमूर्ती, महर्षी रमण, रवींद्रनाथ टागोर, विठ्ठल रामजी शिंदे, पांडुरंगशास्त्री आठवले, मदर तेरेसा, बाबा आमटे हे सर्व शिक्षकच होते. ह्या सर्वांचे कार्यक्षेत्र वेगळे आणि कार्यपद्धती भिन्न होती तरीही ह्या सर्वांमध्ये एक समान धागा होता. प्रचंड ध्येयासक्ती, अविचल अशी मूल्यश्रद्धा आणि त्यासाठी स्वत:च्या जीवनामध्ये किंमत मोजण्याची सिद्धता हे तीन गुणधर्म समान आहेत/होते, म्हणून त्या व्यक्ती थोर आहेत. मात्र अशा थोरांची जीवनचरित्रे वाचताना आपण एक गोष्ट बरेचदा विसरतो की, शाळा-कॉलेजातून किंवा विद्यापीठांमधून कार्यरत असलेले उत्कृष्ट आणि आदर्श शिक्षकसुद्धा त्या थोर व्यक्तींची, स्थानिक पातळीवरची, प्रतिरूपेच असतात. त्यांनीसुद्धा अशीच जीवननिष्ठा आयुष्यभर जोपासलेली असते. स्वत: व्यावसायिक नीतिमत्तेशी कधीही तडजोड न करता त्यांनी आपले जीवितकार्य केलेले असते. महत्त्वाचे म्हणजे कुठल्याही प्रसिद्धीच्या मागे न लागता, अथवा पुरस्काराची अपेक्षा न बाळगता, एक केवळ ध्यासपर्व म्हणून कर्तव्य पूर्ण केलेले असते/किंवा करीत असतात. व्रतस्थ वृत्तीने केलेल्या शिक्षकी पेशातून निवृत्त झाल्यानंतरही ते स्वत:चे लेखन, वाचन, संशोधन आणि विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याचे काम अखंडपणे सुरू ठेवतात; त्यात औपचारिक सेवानिवृत्तीचा अडसर ते होऊ देत नाहीत.

**शिक्षक : एक कालसापेक्ष संस्कार**

'आदर्श शिक्षकाने निरपेक्ष ज्ञानसाधना/ज्ञानोपासना करावी, ज्ञाननिर्मिती ज्ञानप्रसाराचे कार्य करावे, वर उल्लेख केल्याप्रमाणे व्रतस्थ राहून अध्ययन अध्यापन करावे' असे म्हणताना आपण प्राचीन/वेदकालीन 'गुरुकुला'बद्दल स्वप्नरंजन तर करीत नाही ना?- असा प्रश्न मनात येतो. वर्तमान वास्तवापासून दूर नेणारे गुरुकुलातील आश्रम पद्धतीचे उदात्तीकरण आजच्या एकविसाव्या शतकारंभी निश्चितच कालसुसंगत नाही. 'विद्या धनम् सर्व धनप्रधानम्' ही मानसिकता शिक्षकाची असली पाहिजे अशी अपेक्षा करताना शिक्षक आपल्या आणि त्याच्या कुटुंबीयांच्या किमान सुख-सोयी आणि निर्वाहाच्या बाबतीत चिंतामुक्त राहील अशी समाजव्यवस्थेची धारणा असली पाहिजे. मात्र अधाशीपणाने अनिर्बंध उपभोगाचा हव्यास, हा कितीही विकसित आणि समृद्ध देश असला, तरी तो पुरविणे त्याला शक्य नाही. भोगलालसेवर नियंत्रण हा कालसापेक्ष संस्कार प्रथम शिक्षकाने स्वत:त रुजवला पाहिजे, तरच तो त्याच्या अध्यापनातून विद्यार्थ्यांप्रत पोहोचेल. कारण महात्मा गांधी आणि शूमाकर यांनी म्हटल्याप्रमाणे :- "There is enough to meet everyone's need but not everyone's greed" (संदर्भ- मोहनदास करमचंद गांधी, हिंद स्वराज, नवजीवन प्रेस, अहमदाबाद, १९८९, पृष्ठे ८-३१; आणि E.F. Schumacker, Small is Beautiful- A study of Economics as if People Mattered, लंडन; पेंग्विन/अबाकस, १९७३, पृष्ठे ८४-९६) ह्याचा अर्थ, आदर्श शिक्षकाने फाटक्या कपड्यात रहावे किंवा पोटाला चिमटा काढून जीवन व्यतीत करावे असा होत नाही. स्वत:च्या हक्कासाठी झगडणे, वर्तमानातील राहणीमानानुसार स्वत:चा दर्जा त्याला सांभाळता यावा ही त्याची अपेक्षा वाजवी आहे. तो मिळत नसल्यास आजच्या काळात स्वत:च्या मागण्यांसाठी आंदोलन, मोर्चा, संपासारखे मार्गसुद्धा अवलंबिण्यास हरकत नसावी. मात्र ते करताना समाजातील आपल्या भूमिकेचे मुख्य प्रयोजन नेमके काय आहे, याचा विसर पडू देता कामा नये. 'विद्यार्थी, अध्ययन आणि अध्यापन' ही उद्दिष्टे केंद्रस्थानी ठेवूनच आदर्श शिक्षकाने स्वत:च्या जीवनाची आखणी केली पाहिजे, अग्रक्रम ठरविले पाहिजेत. स्वत:च्या मागण्यांसाठी संप करताना वर्गात शिकवणे बंद करणे म्हणजे व्यावसायिक नीतिमत्तेला मूठमाती देण्यासारखे आहे. ते प्राथमिक दायित्व निभावून ज्या इतर मार्गांनी संघटितपणे संघर्ष करायचा असेल तो अवश्य करावा. (ही माझी भूमिका मी स्वतंत्रपणे एका लेखात, याच सदरातून यापूर्वी मांडलेली आहे. पहा-'अंगलट आलेला प्राध्यापकांचा संप', साधना, वर्ष ६२, अंक ५, १२ सप्टेंबर २००९, पृष्ठे ८-१२). मात्र वर्ग आणि शिकवणे बंद करून, म्हणजेच विद्यार्थ्यांना वेठीस धरून शिक्षकांनी आपल्या मागण्या पूर्ण करून घेणे कधीही समर्थनीय होणार नाही. नैतिकतेच्या पातळीवर तर ते निंदनीयच ठरेल.

तसेच 'गुरूंपासून विद्याग्रहण करणे' ही कल्पनासुद्धा आज नीट तपासून घेतली पाहिजे. प्राचीनकालीन गुरुकुलात मौखिक परंपरेतून शास्त्रे शिकली/शिकविली जात. त्यात पाठांतरांवर भर असे. तसेच कडक आचरणावरही होता. 'गुरूंचे वाक्य, त्यांची आज्ञा प्रमाण मानून, त्यावर कोणतेही प्रश्नचिन्ह उपस्थित न करता विद्याग्रहणाची दीक्षा दिली-घेतली जात असे. मात्र हे फक्त 'ज्ञानार्जन' झाले. नवीन ज्ञाननिर्मितीला अशी कडक आचारसंहिता फार पोषक नसते. मात्र एकविसावे शतक हे ज्ञाननिर्मितीचे शतक मानले जाते. नवज्ञाननिर्मिती (Knowledge production) हेच ज्ञानाधिष्ठित (Knowledge-based) समाजाचे व्यवच्छेदक लक्षण आहे. आज 'ज्ञाननिर्मिती'ची संकल्पना गुरुकुलातील गुरूपासून विद्यार्थ्याने 'विद्याग्रहण' करण्याच्या संस्कारापासून फार पुढे गेलेली आहे. आजच्या ज्ञाननिर्मितीमध्ये गुरू-शिष्य परंपरेतील एकतर्फीपणा राहिलेला नाही. गुरूवर्यांनी जे दिले ते ज्ञान प्रसादरूपाने स्वीकारावे, तेही निमूटपणे, हे आता कोणीही स्वीकारणार नाही. 'एक ने कही दूजे ने मानी, गुरुनानकजी कहे दोनो ग्यानी (ज्ञानी)' हे ज्ञानसूक्त (सूत्र म्हणा) आज कोणालाही मान्य होणार नाही. ''गुरूचा उपमर्द होईल असा प्रतिप्रश्न आधी केला जात नसे. आता नवज्ञाननिर्मितीचे मूळच 'शंके'मध्ये (Doubt) आहे. शिक्षक जे शिकवेल ते निमूटपणे न स्वीकारता 'प्रत्यक्ष-प्रमाण' कितपत आहे? असे प्रश्न आणि शंका विद्यार्थ्यांच्या मनात उत्पन्न झाल्या, त्यांच्यात अस्वस्थता निर्माण झाली म्हणजेच अध्यापन परिणामकारक होत आहे, असे आज मानले जाते.

केवळ शंका उपस्थित करून चालणार नाही, तर त्यांचा पाठपुरावा करण्याची जिज्ञासा (Curiosity) सुद्धा शिक्षकाने विद्यार्थ्यांमध्ये जागविली पाहिजे. 'Doubts must be followed

by curiosity.' विद्यार्थ्याने उत्तरे शोधली पाहिजेत, शंका-निरसन करण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. आवश्यक तेथे प्रयोग करून पाहिले पाहिजेत- तशी प्रेरणा विद्यार्थ्याला शिक्षकांकडून मिळणे गरजेचे आहे. शंका, जिज्ञासा, नवज्ञाननिर्मिती व त्यांतून विज्ञान (किंवा विज्ञानातील संकल्पना, सिद्धांतन आणि प्रमेय यांच्यात बदल) घडणे असाच विज्ञानाचा प्रवास आहे. तो एक जाणिवांचा प्रवास आहे. म्हणजेच शिकवणारा अध्यापक त्यांच्या विद्यार्थ्यांना अस्वस्थ करून सोडतो किंवा नाही हे महत्त्वाचे आहे. एका अर्थाने आज शिक्षकाच्या भूमिकेतच आमूलाग्र बदल झाल्याचे आज दिसत आहे. तो आदर्श शिक्षकाने आधी समजून घेतला पाहिजे. 'शिष्यात इच्छेत्पराजयम' ह्या म्हणीत असाच ज्ञाननिर्मितीतील बदल अपेक्षित आहे. (संदर्भ- पहा. द.ना.धनागरे, 'समर्पित शिक्षक म्हणजेच ब्रह्मवादिन:', गणित शिक्षण, वर्ष २६, अंक ४, मार्च २००३, पृष्ठे IV-V)

**झपाटलेपण आणि भूमिकांची अदलाबदल**

आजच्या संदर्भात व्यावसायिकता, व्यवहार आणि किमान लाभाचा विचार एका उत्तम व आदर्श शिक्षकाने केला तर ते समजण्यासारखे आहे, पण विद्यार्थ्यांच्या बाबतीत 'जेवढ्यास तेवढे' वृत्तीने त्रयस्थासारखे शिक्षकाने वागणे अक्षम्य आहे. विद्यार्थी घडवायचा म्हटलं की त्यांच्या अध्यापकाने स्वत:ला गुंतवून घेणं ओघानेच येतं. फक्त शिक्षक-छात्र संबंध नियोजित तासाच्या ४५-५० मिनिटांपुरता असतो असे मानून तास आटोपला की लगेच आपल्या मोटारसायकलवर स्वार होऊन महाविद्यालयातून निघून जाणे अशोभनीय आहे. विद्यार्थ्यांसाठी, स्पष्टीकरण द्यायला, विषय समजला नसेल तर तो तपशिलात जाऊन, सोपा करून समजावून सांगायला अध्यापकाने तास आटोपल्यानंतरही विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असायला हवे. आजचे बव्हंशी शिक्षक (अपवाद सोडल्यास) घड्याळी तासांच्या गणितामध्ये किंवा कार्यभाराच्या (Work-load) आवर्तनामध्ये गुंतलेले आढळतात!

प्रत्येक वर्ग हा शिक्षकासाठी एक नवा ज्ञानानुभव असायला पाहिजे. प्रेसिडेन्सी कॉलेज, कलकत्ता विद्यापीठात भावतोष दत्त हे अर्थशास्त्राचे एक विख्यात प्राध्यापक होते. त्यांनी त्यांच्या एका आठवणीबद्दल लिहिलंय की, "Every class is a new experience for me." 'क्लास सुरू होण्याच्या अर्धाएक तास आधी मी पूर्णपणे बेचैन, झपाटून गेलेला असतो. बायकोने 'जेवण चांगलं झालं होतं का?' हे विचारणंही मला आवडायचं नाही. इतकं ते झपाटलेपण वर्ग सुरू होण्याआधीचं.' ज्या अध्यापक-प्राध्यापकांना 'कशाला आपण या व्यवसायात आलो' अशी उपरती होत असेल, किंवा पश्चात्ताप होत असेल त्यांनी प्रा.भावतोष दत्त यांचा लेख अवश्य वाचावा. त्यात ते म्हणतात... "Good teachers are not born and they are not made either... They have to make themselves good by their own effort. Such effort is largely individual but partly collective also. Groups which act in unison for maintaining and raising the standards and for making education socially relevant do exist and it is their will that we ultimately depend for the growth of skill, intellect and culture" (संदर्भ- पहा भावतोष दत्त, 'द ॲडव्हेंचर ऑफ टीचिंग' On Being a Teacher (संपादित ग्रंथ, प्रा.अमरिक सिंग संपादक), दिल्ली : कोनार्क पब्लिशर्स, १९९०, पृष्ठ १३-२९).

जर शिक्षकाने स्वत:ला, स्वप्रयत्नाने घडवायचे असेल तर त्याने 'अध्यापनाआधी अध्ययन' हे तत्त्व स्वीकारून ते अखंडपणे पाळले पाहिजे; म्हणजे उत्तम शिक्षक हा सर्वप्रथम उत्तम विद्यार्थी असला पाहिजे. त्याचा अभ्यास/अध्ययन सातत्याने सुरू असायला पाहिजे, तरच त्याच्या अध्यापनात नित्यनूतनता आणि ताजेपणा राहील. 'माझा अध्ययन काळ संपला, मी ज्ञानार्जनाच्या परिसीमेला पोहोचलो आता अधिक काही ग्रहण करण्याची आवश्यकता नाही' अशी भावना बाळगणे शिक्षकांसाठी आत्मघातकी ठरते. म्हणून "Teaching requires a profound inversion of roles" ह्या म्हणीत भूमिका परावर्तित करणं, म्हणजेच प्राध्यापकांनी आधी चांगलं विद्यार्थी होणं आणि तसं सतत राहणं अभिप्रेत आहे. सतत प्रयोगशीलता, निर्माणक्षमता जोपासूनसुद्धा आपण जितके नवं ज्ञान ग्रहण करतो, तितकेच 'आपण अजून किती अज्ञानी आहोत' हे अधिक उमगायला लागते. जे कळले आहे त्यापेक्षा न कळलेले, म्हणजेच अज्ञानाचे क्षेत्र अधिक मोठे आहे. जॉन एफ. केनेडी यांनी एका ठिकाणी असे म्हटले आहे की, "Teaching is constantly a confessional activity." 'मी इतकं ग्रहण करूनसुद्धा मी अजूनही किती अज्ञानी आहे' हे प्रत्येकाने प्रांजळपणे, विनम्रपणे मान्य केले पाहिजे. तरच विद्यार्थ्यांची आणि अध्यापकांची बौद्धिक प्रगती कुठे थांबत नाही; कुंठित होत नाही.

**ज्ञानप्राप्ती आणि अध्यापनाचे प्रयोजन**

सरतेशेवटी ज्ञाननिर्मिती, ज्ञानोपासना, ज्ञानार्जन आणि ज्ञानदान ह्यांनाच 'साध्य' मानले तरच त्याच्या प्रयोजनाकडे आणि उपयोगितेकडे समाजहिताच्या व्यापक परिप्रेक्ष्यातून पाहणे शक्य होते. अध्यापकाची तशी जीवननिष्ठा विकसित होणे गरजेचे आहे. मात्र आज 'ज्ञानाधिष्ठित समाजा'कडे आपली वाटचाल सुरू आहे. म्हणजे जो वस्तू (Commodity) उत्पादन करतो, त्याच्यापेक्षा वस्तू तयार करण्यासाठी लागणारे तंत्रज्ञान आणि यंत्रे उत्पादन करणारे अधिक श्रेष्ठ आणि ज्यांच्याजवळ उत्पादनासाठी लागणारे भांडवल (Capital) आहे, त्यापेक्षा जे फक्त सेवा (Services) उत्पादन करतात, पुरवितात ते कमी दर्जाचे आहे असे मानले जाते. या सामाजिक उतरंडीत आता 'जे ज्ञाननिर्मिती करतात ते सर्वांत वरच्या दर्जाचे, त्यांच्याच हातात यापुढे एकविसाव्या शतकात सर्व सत्ता केंद्रित होणार आहे असे सांगितले जाते. ह्या मांडणीच्या मुळाशी 'ज्ञान हे सत्तासंपादनाचे साधन', (Knowledge as means of power) हे गृहीतक आहे. म्हणजेच 'Knowledge is power' असे मानले जात आहे.

अशा मांडणीत एका मूलभूत प्रश्नाकडे दुर्लक्ष होत आहे असे

वाटते. 'ज्ञान हीच सत्ता' हे तत्त्व मानून जरी मान्य केले तरीही त्या सत्तेचा वापर कशासाठी करायचा? त्या सत्तेचे खरे प्रयोजन काय? हे प्रश्न अनुत्तरितच राहतात. त्या सत्तेचा वापर जर समाजात वितुष्ट, संघर्ष आणि विकारी स्पर्धा वाढविण्यासाठी होत असेल, त्यातून जर समाजातील विविध घटकांचे ध्रुवीकरण (Polarisation) होत असेल/होणार असेल किंवा त्या ज्ञानाचा वापर एका विशिष्ट वर्गाचे, जातीचे, धर्माचे किंवा वांशिक/भाषिक गटांचे इतरांवर वर्चस्व सिद्ध करण्यासाठी होत असेल तर त्या ज्ञाननिर्मिती आणि संपादनाच्या सामाजिक प्रयोजनाबद्दलच कुठेतरी गोंधळ आहे हे स्पष्टपणे जाणवते.

ज्ञाननिर्मिती आणि शिक्षणप्रक्रियेला त्या त्या समाजाच्या जीवनदृष्टीपासून (World-view किंवा philosophy of life पासून) वेगळे करता येणार नाही. सांस्कृतिक वैविध्य असलेल्या भारतीय समाजात विविध गट, जाती, प्रजाती, वर्ग विकासप्रक्रियेत भिन्न पातळ्यांवर आहेत. त्या सर्वांना मान्य अशी एक जीवनदृष्टी असणे तसे अशक्यच आहे. त्यामुळे ज्ञाननिर्मिती आणि शिक्षणाला सामाजिक मूल्यांचे अधिष्ठान असलेच पाहिजे. ही मूल्ये - 'स्वातंत्र्य, समता, सामाजिक न्याय, बंधुता आणि सर्वधर्मसमभाव तसेच समान संधी आणि मानव अधिकार' - आज सर्वत्र मान्यता पावत आहेत. एका उत्तम शिक्षकाने, भारतीय संविधानात शिरोधार्य मानली गेलेली ही मूल्ये, प्रथम स्वत: आत्मसात केली पाहिजेत. म्हणजे मग शिक्षक ती स्वत:च्या आचरणाद्वारे त्याच्या विद्यार्थ्यांमध्ये रुजवण्यात यशस्वी होऊ शकेल. मग तो विद्यार्थी संतवाङ्मयाचा अभ्यास करीत असो, किंवा गणिताचा, कौटिल्याच्या अर्थशास्त्राचा विद्यार्थी असो किंवा जैवतंत्रज्ञानाचा वा माहिती तंत्रज्ञानाचा; ज्ञाननिर्मितीबरोबरच मानवी मूल्यांचे बीजारोपण अध्ययन, अध्यापन प्रक्रियेत होत गेले म्हणजे विद्यार्थी घडविण्यासाठी अध्यापकाला वेगळे काही करावे लागणार नाही.

सरतेशेवटी उत्तम आणि आदर्श अध्यापकाला 'विद्वत्ता आणि पांडित्य' हीच खरी समृद्धी वाटली पाहिजे. त्याबरोबर लौकिक लाभतो ह्यात शंका नाही. समाज आणि राज्यशासन अशा अध्यापकांची दखल घेतच असते. अर्थात ख्याती, पुरस्कार, गौरव इत्यादी सर्वच शिक्षकांना लाभतात असे नाही. मात्र आपले वाचन, लेखन, संशोधन, अध्यापन आणि निरपेक्ष भावनेने विद्यार्थी घडविणे हेच अध्यापकाने आपले खरे/मुख्य कार्यक्षेत्र मानले पाहिजे. त्याच्या अनुषंगाने इतर पदे, जबाबदारी मिळतील ते स्वीकारण्याचे, नाकारण्याचे स्वत:चे स्वातंत्र्य त्याने अबाधित ठेवावे. तथापि केवळ बुद्धिमत्ता, गुणवत्ता, विद्वत्ता असणे हे अध्यापकाला आवश्यक असले तरी ते पुरेसे नाही. त्याने विवेकाला स्मरून घेतलेल्या निर्णयाला तो पक्का राहिला पाहिजे. त्यावर ठाम राहण्याचा अर्थ त्या निर्णयाच्या परिणामामुळे त्याने वाटेल ती किंमत मोजण्याची सिद्धता ठेवणे तितकेच महत्त्वाचे आहे. असे असले तरीही केवळ हिमालयासारखा निर्धार असणे उपयोगाचे नाही; तर आपले विचार, संकल्पना, सिद्धांत, नीतिमत्तेच्या कल्पना, जीवनविषयक दृष्टी प्रत्यक्ष कृतीत उतरवून तो अध्यापक दाखवू शकतो की नाही, म्हणजेच 'उक्ती' आणि 'कृती'त जर सुसंगती असेल तरच त्याला स्वत:ची समाजातील भूमिका निश्चितपणे उमगली आहे असे म्हणता येईल. ज्याला आपल्या आयुष्याचे प्रयोजन कळले आहे त्याला संस्कृतमध्ये 'ब्रह्मवादिन:' असे म्हणतात. अशी व्यक्ती आपला विचार कृतीत आणून दाखवीत असते. या अर्थाने भारताच्या प्रबोधन युगातील बाळशास्त्री जांभेकर, लोकहितवादी, जगन्नाथ शंकर शेट, गोपाळकृष्ण गोखले, न्या. रानडे, महात्मा फुले, लो.टिळक, महात्मा गांधी, स्वा.सावरकर डॉ.आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील, एवढेच नव्हे तर कवी कुसुमाग्रज, बाबा आमटे ह्या सर्वांनाच 'ब्रह्मवादिन:' असे म्हटले पाहिजे. त्यांच्यासारखेच प्रत्येक शिक्षकाला आपल्या जीवनाचे प्रयोजन समजले आणि उमगले पाहिजे तरच समाजाप्रती दायित्व पूर्ण करण्याची क्षमता त्यांच्यात निर्माण झाली असे म्हणता येईल.

**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक व कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू आहेत.)**

**द. ना. धनागरे**
ddhanagare@hotmail.com
बी/७, दिव्यकुंज अपार्टमेंट्स, १०७६, गोखले रोड,
मॉडेल कॉलनी पी.ओ., पुणे ४११०१६.
Mob. : 9823243752

**(डॉ.द.भि.कुलकर्णी संपादित 'प्रा. श्री. मा. कुळकर्णी स्मृतिग्रंथ', पद्मगंधा प्रकाशन, पुणे यांच्या वतीने लवकरच प्रकाशित होत आहे. त्या ग्रंथासाठी लिहिलेला हा लेख विषयाचे महत्त्व लक्षात घेऊन 'विद्येच्या प्रांगणात' या सदरात प्रसिद्ध करीत आहोत.)**

**- संपादक**

## पुढील अंकात...

१६ जानेवारी : **वैचारिक व्यासपीठ : फॉरिन अफेअर्स**– गोविंद तळवलकर

१६ जाने. व २३ जाने. : **न्यायाचे शास्त्र आणि न्यायाचा व्यवहार**– नरेंद्र चपळगावकर

३० जाने. : **कृषि विज्ञान : काल, आज आणि...** – रमेश पाध्ये





**रमेश पाध्ये**

# वाढती महागाई- अर्थात अराजकाला निमंत्रण

**किमान ५० टक्के जनतेचे जीवन ही वाढती महागाई उद्‌ध्वस्त करीत आहे. आजच्या घडीला अशी बहुसंख्य जनता नेतृत्वाच्या अभावी अजून रस्त्यावर उतरलेली नाही. पण याचा अर्थ भविष्य काळातही ती सतत पोट आवळत उपासमार सहन करीत राहील असे नाही. कोणत्याही नेतृत्वाशिवाय जनता जेव्हा रस्त्यावर उतरते तेव्हा ते अराजकाला आमंत्रण असते आणि अशा अराजकामुळे अर्थव्यवस्था ठप्प होते, हा जागतिक पातळीवरचा अनुभव आहे.**

५ डिसेंबर रोजी संपलेल्या आठवड्यामध्ये खाद्यान्नाच्या भाववाढीच्या दराने जवळपास २० टक्क्यांचा टप्पा गाठला आहे. गेल्या वर्षी हा भाववाढीचा दर सुमारे १० टक्के होता. अशा रीतीने खाद्यान्नाचे भाव सातत्याने चढ्या दराने वाढत आहेत. एकदा ही गोष्ट लक्षात घेतली की मागणी आणि पुरवठा यांच्यातील असंतुलनामुळे निर्माण झालेली ही तात्कालिक स्वरूपाची समस्या नाही, ही बाब अभ्यासकांच्या सहज लक्षात यावी. तसेच २००९ सालात मोसमी पावसाने दगा दिल्यामुळे खरीप पिकांवर त्याचा जो अनिष्ट परिणाम झाला व तांदुळाच्या उत्पादनात जी घट आली, केवळ त्यामुळे ही भाववाढीची समस्या उद्‌भवलेली नाही, तर आर्थिक उदारीकरण आणि बाजारपेठेचे वर्चस्व यांना बांधील असणारे आजचे राज्यकर्ते, बाजारपेठेत हस्तक्षेप करून खाद्यान्नाच्या किंमती नियंत्रित करण्याचा अल्पसाही प्रयास करणार नाहीत, असा रास्त विश्वास व्यापारी वर्गाला वाटतो. त्यामुळे साठेबाजी करून बाजारपेठेमध्ये कृत्रिमरित्या टंचाई निर्माण करून भरमसाठ भाववाढ करण्याचे धाडस करण्यास तो धजावतो आहे आणि आपले वारेमाप नफ्याचे उद्दिष्ट साध्य करतो आहे. तसेच या नफ्यावर प्रत्यक्ष कराची वसुली करण्यात शासन अयशस्वी ठरत असल्यामुळे, व्यापाऱ्यांच्या वाढत्या नफ्यामुळे सरकारचे महसुली उत्पन्न वाढत नाही. भारतीय अर्थव्यवस्थेची ही खास वैशिष्ट्ये लक्षात न घेता आर्थिक विश्लेषणाला सुरुवात करणे चूक ठरेल.

सर्वसाधारणपणे भाववाढीला प्राथमिकरित्या जबाबदार ठरणारा घटक म्हणजे चलन फुगवटा हा होय. कोणत्याही अर्थव्यवस्थेत बाजारातील विक्रेय वस्तूच्या वाढीपेक्षा चलनाचा पुरवठा वाढला की सार्वत्रिक भाववाढीला चालना मिळते. गेल्या वर्षभरात काही प्रमाणात असे घडले आहे. उदाहरणार्थ गेल्या वर्षी सप्टेंबरमध्ये अमेरिकेतील लेहमन ब्रदर्स ही वित्तीय संस्था दिवाळखोरी निघाली आणि त्याचा परिणाम म्हणून जगभरातील सर्व अर्थव्यवस्थांना आर्थिक मंदीने ग्रासून टाकले. या आर्थिक संकटाशी मुकाबला करण्यासाठी रिझर्व्ह बँकेने ताबडतोबीने कॅश रिझर्व रेश्योमध्ये २.५ टक्क्यांची कपात जाहीर केली. यामुळे अर्थव्यवस्थेमधील रोखता १ लाख २५ हजार कोटी रुपयांनी वाढली. भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये चलनाचा गुणक सुमारे ५ आहे. तो विचारात घेता, वर्षभरासाठी चलनवाढ सव्वा सहा कोटी रुपयांची झाली असे म्हणावे लागते. गेल्या आर्थिक वर्षामध्ये राष्ट्रीय उत्पन्न ८ टक्क्यांनी वाढले असते तरी, रिझर्व्ह बँकेने कॅश रिझर्व्ह रेश्यो कमी करून जो चलन फुगवटा निर्माण केला, त्यामुळे महागाई वाढण्याला चालना मिळणार होती. तरीही पुढील तीन महिन्यात रिझर्व्ह बँकेने सातत्याने तीन वेळा कॅश रिझर्व्ह रेश्योमध्ये कपात केली. तसेच बँकेने स्टॅच्युटरी लिक्विडिटी रेश्योही कमी केला. अशा रीतीने रिझर्व्ह बँकेने अर्थव्यवस्थेत जेवढा अतिरिक्त पतपुरवठा निर्माण करण्याचा प्रयास केला, तेवढा अतिरिक्त पैसा चलनात आला नाही. कारण अर्थव्यवस्थेवर आर्थिक मंदीचे सावट झाकळल्यामुळे उद्योजकांनी बँकांकडून उपलब्ध झालेल्या वित्तपुरवठ्याचा वापर करण्याचे टाळले. तरीही २० नोव्हेंबर २००९ पर्यंत अर्थव्यवस्थेमध्ये वार्षिक चलनवाढीचा दर १८.४ टक्के एवढा झाला होता. हा दर सरकारच्या घोषित उद्दिष्टापेक्षा १.४ टक्क्यांनी जास्त होता. तसेच या कालावधीत आर्थिक वाढ अंदाजित ८ टक्क्यांऐवजी ६.५ टक्केच झाली होती. अशा रीतीने अर्थव्यवस्थेमध्ये गरजेपेक्षा जास्त प्रमाणात रोखता निर्माण झाली होती. यामुळे भाववाढीला चालना मिळणे स्वाभाविक होते. यापुढील काळात औद्योगिक क्षेत्रामधील मंदी संपुष्टात आल्यामुळे वाढत्या औद्योगिक उलाढालीसाठी उद्योगपतींनी बँकांकडून अधिक पतपुरवठ्याची मागणी अपेक्षित आहे. तसेच शेती क्षेत्राकडून आगामी रब्बी हंगामासाठी होणारी पतपुरवठ्याची मागणी विचारात घेता भविष्यात चलनफुगवटा वाढणार आहे.

यामुळे चालू आर्थिक वर्षाच्या उर्वरित काळामध्ये वाढता चलनफुगवटा भाववाढीला चालना देणार आहे अशा निष्कर्षाप्रत आपण येतो.

आज घाऊक किमतीच्या निर्देशांकात वाढ दर्शवणाऱ्या वस्तूंमध्ये कडधान्ये, डाळी, बटाटे, भाजीपाला इत्यादी वस्तूंचा अंतर्भाव होतो. या वस्तुगटात साखरेचा समावेश होत नाही. कारण साखर हे औद्योगिक उत्पादन आहे. गेल्या वर्षभरात बटाट्याच्या घाऊक किमतीमध्ये १३६.३९ टक्क्यांची वाढ नोंदविली गेली आहे. भाजीपाला १३.५५ टक्क्यांनी महागला आहे. कडधान्ये ४०.८१ टक्क्यांनी महाग झाली आहेत. तर, तांदूळ, गहू यांसारख्या तृणधान्यांच्या किमतीने ४१.०१ टक्क्यांची वाढ नोंदविली आहे. याच्याच जोडीने साखरेची किंमत गेल्या वर्षभरात दुप्पट झाली आहे. या खाद्यान्नाच्या भाववाढीचा साकल्याने विचार केला तर देशातील गोरगरीब जनतेला, म्हणजेच बहुसंख्य लोकांना, कुपोषणाच्या फुफाट्यातून उपासमारीच्या आगीत ढकलणारी ही भाववाढ आहे, ही गोष्ट स्पष्ट होते. तसेच ही भाववाढ काही एका रात्रीत झालेली नाही. पण 'काँग्रेस का हाथ आम आदमी के साथ' अशी घोषणा देणाऱ्या राज्यकर्त्यांनी किमान गेली दोन वर्षे डोळे बंद करून या भाववाढीच्या समस्येकडे जाणूनबुजून दुर्लक्ष केले आहे असेच म्हणावे लागते.

पण केवळ भाववाढीच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करून राज्यकर्ते थांबलेले नाहीत. तर २००९ च्या सार्वत्रिक निवडणुकीत जनतेचा कौल मिळून पुन्हा सत्तेवर आलेल्या राज्यकर्त्यांनी भाववाढीचे उघड उघड समर्थन करण्याचा जणू विडाच उचललेला दिसतो. उदाहरणार्थ ऑगस्ट महिन्यात या भाववाढीच्या प्रश्नावर लोकसभेत आणि राज्यसभेत झालेल्या चर्चेला उत्तर देताना कृषी आणि नागरी पुरवठा मंत्री शरद पवार यांनी बाजारपेठेत कडधान्ये, डाळी व साखर यांच्या किमतीमध्ये मागणीपेक्षा पुरवठा कमी झाल्यामुळे वाढ झाल्याचा युक्तिवाद केला होता, पण प्रत्यक्षात २००९-१० या वर्षासाठी कडधान्याचा पुरवठा घटला नसल्याचे चित्र आजमितीस स्पष्ट झाले आहे. उदाहरणार्थ २००८-०९ या कृषी वर्षात देशात कडधान्यांचे उत्पादन सुमारे १४.६ दशलक्ष टन, म्हणजे आधीच्या वर्षाएवढेच झाले होते. तसेच एप्रिल २००९ ते नोव्हेंबर २००९ या कालखंडात सरकारी कंपन्यांनी आणि खाजगी व्यापाऱ्यांनी ४.८ दशलक्ष टन कडधान्ये आणि डाळी यांची आयात केल्याची आकडेवारी आता प्रसिद्ध झाली आहे. अशा रीतीने २००९-१० सालासाठी आधीच्या वर्षाएवढीच कडधान्यांची उपलब्धता असताना जूनमध्ये मोसमी पावसाने किंचित डोळे वटारताच कडधान्ये आणि डाळी यांचे बाजारभाव आकाशाला भिडले ते साठेबाजीमुळेच होत. तरीही अशा भाववाढीचे समर्थन मंत्रिमहोदयांनी केले. साखरेच्या संदर्भातील स्थिती जरा वेगळ्या वळणाची आहे. ऑक्टोबर २००८ मध्ये ऊस गळिपाचा हंगाम सुरू होण्यापूर्वीच नवीन वर्षात साखरेचे उत्पादन सुमारे १५० लक्ष टन एवढे कमी होईल आणि देशाची साखरेची गरज सुमारे २३० लक्ष टन आहे, या गोष्टी सरकारला ज्ञात होत्या. तरीही सरकारने साखर उत्पादकांना आर्थिक सवलत देऊन साखर निर्यात केली आणि साखरेची गोदामे रिकामी केली. त्यानंतर २००९ सालात सरकारने साखरेचे उत्पादन आणि मागणी यांच्यातील तफावत भरून काढण्यासाठी सरकारी कंपन्यांना आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतून साखर खरेदी करण्याचा आदेश दिला नाही. परिणामी २००९-१० च्या दुसऱ्या तिमाहीत साखरेचे भाव गगनाला भिडले. आगामी वर्षातही या परिस्थितीत सुधारणा होण्याची सुतराम शक्यता नाही. याच पद्धतीने देशातील कांद्याचे उत्पादन घटलेले असताना कांद्याची निर्यात रोखण्यात आलेली नाही. तसेच लसणीचे उत्पादन जवळपास ४५ टक्क्यांनी घटले असताना लसणीची निर्यात गेल्या वर्षीपेक्षा सुमारे सहापट झाली आहे. त्यामुळे भारतीय बाजारपेठेत लसणीचा भाव चौपट झाला आहे. या साऱ्या भाववाढीचा जबरदस्त फटका गोरगरीब लोकांनाच बसतो आहे. कारण ज्वारी, बाजारीच्या भाकरीबरोबर चवीसाठी कांदा वा लसणीची चटणी खाणेही आता त्यांच्या आवाक्याबाहेर होत आहे.

साधारणपणे जुलै महिन्यापासून ही भाववाढीची घोडदौड सुरू झालेली दिसते. जुलै महिन्यात ग्राहकमूल्य निर्देशांकाने ५ टक्क्यांची विक्रमी भाववाढ नोंदविली होती. तेव्हा काही अर्थतज्ज्ञांना ही भाववाढ चिंतित करणारी वाटली होती. पण खाद्यान्नाच्या घाऊक किमतीच्या निर्देशांकाने वार्षिक भाववाढीचा २० टक्क्यांचा टप्पा गाठीपर्यंत भारताच्या अर्थमंत्र्यांना भाववाढीने चिंतित केले नसावे. पण डिसेंबर १७ रोजी ५ डिसेंबरला संपणाऱ्या आठवड्याची आकडेवारी जाहीर होताच, अर्थमंत्र्यांना जाग आली. आणि या भाववाढीला आळा बसावा म्हणून अन्नधान्य आणि इतर जीवनावश्यक वस्तूंची गरज लक्षात घेऊन जरूर तेथे आयात करण्याची घोषणा त्यांनी केली. अर्थात सरकारने तांदूळ, गहू, कडधान्ये आणि साखर यांची आयात करण्याचे ठरविले, तरी त्या प्रक्रियेची सर्व आन्हिके पार पडून असा कृषिमाल भारतीय बाजारपेठेत उपलब्ध होण्यासाठी किमान दोन ते तीन महिन्यांचा कालावधी खर्ची पडेल. तेवढा काळ ग्राहकांना आयातीकडे डोळे लावून प्रतीक्षा करण्यात खर्ची घालावा लागणार हे उघड वास्तव आहे. म्हणजे लोकांच्या हालअपेष्टा ताबडतोबीने संपणार नाहीत. तसेच तांदुळाच्या उत्पादनातील संभाव्य तूट सुमारे २० दशलक्ष टन होण्याची शक्यता विचारात घेता आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत एवढा तांदूळ उपलब्ध होईल याची खात्री देता येणार नाही. कडधान्ये आणि साखर यांच्या संदर्भातील स्थिती काही फार वेगळी नाही. खरे तर ११५ कोटी लोकसंख्या असणाऱ्या महाकाय देशाला खाद्यान्नाच्या संदर्भात आंतरराष्ट्रीय बाजारपेठेवर विसंबून राहता येणार नाही हेच खरे. परंतु वास्तव स्थिती अशी असताना, आर्थिक उदारीकरणाला सुरुवात झाल्यापासून भारतामधील कृषी क्षेत्राच्या विकासाकडे सातत्याने दुर्लक्ष झालेले पहावयास मिळते. यामुळे अन्नधान्याच्या संदर्भातील स्वयंपूर्णता धोक्यात आली आहे. ही चिंतेची बाब म्हणायला हवी. अर्थात कृषि विकासाला चालना देणे ही मध्यम पल्ल्याच्या काळातील बाब झाली; पण

आजची तात्कालिक समस्या विचारात घेता, देशात कृषी उत्पादनाच्या आघाडीवर काय स्थिती आहे याचा इत्थंभूत मागोवा घेणारे कृषिखाते पुरवठ्यामधील संभाव्य तूट लक्षात घेऊन, तो सुधारण्यासाठी योग्य वेळी योग्य निर्णय घेऊन तात्कालिक टंचाई निवारण्यासाठी का प्रयत्न करीत नाही? बाजारपेठेत टंचाई निर्माण होऊ नये यासाठी प्रयत्न करण्याची जबाबदारी कोणी पार पाडायची? मंत्रालयातील वरिष्ठ अधिकारी सुयोग्य वेळी उचित निर्णय घेण्यास असमर्थ ठरत असतील तर त्यांना मिळणारा गलेलठ्ठ पगार हा सरकारच्या पैशाचा अपव्यय नव्हे काय? हे आणि यांसारखे अनेक प्रश्न अभ्यासकाच्या मनात निर्माण होतात.

१७ रोजी डिसेंबर रोजी अर्थमंत्र्यांनी, गरज पडल्यास खाद्यान्न आयात करण्याची घोषणा केली, याचे आपण स्वागत करू या. पण त्यांच्या या वक्तव्याचा गर्भितार्थ बाजारपेठेत वस्तूंची निर्माण झालेली टंचाई हीच सर्वार्थाने आजच्या भाववाढीला जबाबदार आहे असा होतो. पण वस्तुत: पुरवठ्यातील वास्तव टंचाईबरोबरच व्यापाऱ्यांनी साठेबाजी करून कृत्रिमरित्या पुरवठा रोखून धरून या भाववाढीला चालना दिली आहे, या वास्तवाकडे मंत्रिमहोदयांनी दुर्लक्ष केले आहे, पण खाजगी वित्तीय संस्थांमध्ये कार्यरत असणाऱ्या अर्थतज्ज्ञांनी पुरवठ्यामधील तुटीबरोबरच साठेबाजीमुळे भाववाढीच्या प्रक्रियेला चालना मिळत असल्याचे आपले मत 'बिझनेस स्टँटर्ड' या दैनिकाच्या १८ डिसेंबरच्या अंकामध्ये व्यक्त केले आहे. पण हे वास्तव आमचे कृषिमंत्री आणि अर्थमंत्री यांच्या नजरेला टिपता आले नाही. कारण भारतीय संविधानाने ती जबाबदारी त्यांच्यावर टाकल्याचा घटनेत उल्लेख नाही हे असावे! आणि आमचे राज्यकर्ते केवळ संविधानात नमूद केलेल्या गोष्टीच करत असण्याची शक्यता आहे. कारण काहीही असो, पण हे राज्यकर्ते साठेबाजांना कधीच पाठीशी घालणार नाहीत याविषयी आपण खात्री देऊ शकतो. कारण नफेखोरांना प्रेमाने कवटाळणे हा यांचा राजधर्म आहे.

या राजधर्माला अनुसरून केंद्रीय मंत्र्यांनी राज्य सरकारांनी साठेखोरांवर कारवाई करावी असा जप गेले चार महिने सुरू ठेवला आहे. तर बिगरकाँग्रेस राज्य सरकारांनी यु.पी.ए. सरकारच्या चुकीच्या आर्थिक धोरणामुळे महागाई वाढत असल्याचा घोष सुरू ठेवला आहे आणि अशी घोषणाबाजी सुरू ठेवून प्रत्यक्षात महागाईला आवर घालण्यासाठी कोणतीही कृती करण्याचे काम केंद्रीय आणि राज्य पातळीवरील सरकारांनी अत्यंत चलाखीने टाळले आहे. भारतीय घटनेनुसार कृषिविभाग हे केंद्र सरकार तसेच राज्य सरकार या दोहोंच्या अखत्यारीतील खाते होय. पण यामुळेच दोन घरचा पाहुणा उपाशी या म्हणीनुसार आपल्या देशातील कारभार सुरू आहे. याचा परिणाम म्हणून कृषी क्षेत्रातील उत्पादनवाढीचा दर, देशातील अन्नधान्याच्या वाढत्या मागणीसाठी पुरेसा नाही, हे वास्तव पंतप्रधानांच्या सल्लागार मंडळावरील कृषी विषयातील अर्थतज्ज्ञ प्रोफेसर व्ही.एस.व्यास यांनी वारंवार उघड केले आहे. पण केवळ सकल राष्ट्रीय उत्पन्नाचा दर कसा चढा ठेवता येईल याची चिंता करणाऱ्या आमच्या देशातील अर्थतज्ज्ञांना या देशातील ११५ कोटी जनतेची प्राथमिक गरज असणारे अन्न पुरेशा प्रमाणात उत्पादन करण्यासाठी काय करावे आणि अशा उत्पादन झालेल्या अन्नधान्याचे सर्व भुकेल्या लोकांपर्यंत वाटप होण्यासाठी आर्थिक धोरण काय असावे, याचा विचार करण्याची गरज भासत नाही ही सर्वांत मोठी दुर्दैवाची बाब आहे. हे आजच्या काळाचे खास वैशिष्ट्य आहे असे म्हणता येणार नाही. कारण स्वातंत्र्योत्तर काळाचा आर्थिक इतिहास हा महागाईच्या भस्मासुराने पछाडलेला इतिहास आहे, असे सहजपणे दाखवून देणे कोणालाही शक्य व्हावे.

खाद्यान्नाची अशी विक्रमी भाववाढ सुरू असताना महाराष्ट्रातील एका मंत्रिमहोदयांनी केंद्रामध्ये कृषी आणि नागरी पुरवठामंत्री शरद पवार आहेत तोवर या भाववाढीला आवर घातला जाणार नाही याची तमाम शेतकऱ्यांनी खात्री बाळगावी, असे वक्तव्य जाहीर सभेत केल्याची बातमी इलेक्ट्रॉनिक प्रसारमाध्यमाने प्रसारित केली होती. म्हणजे खाद्यान्नाचे भाव वाढले तर जणू ग्रामीण भागात स्वर्ग अवतरणार आहे असा सदर मंत्रिमहोदयांना विश्वास वाटत असावा. वास्तविक ग्रामीण भागातील भूमिहीन शेतमजूर, असंघटित मजूर आणि केवळ स्वत:च्या निर्वाहासाठी शेती करणारे बहुसंख्य शेतकरी हे या महागाईच्या खाईमध्ये होरपळून निघतात हे वास्तव आहे. तसेच शहरी विभागात असंघटित क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या बहुसंख्य कामगारांना ही वाढती महागाई भाजून काढते. यातील जास्तीत जास्त २५ टक्के लोकांना सार्वजनिक वितरण व्यवस्थेमुळे काही प्रमाणात वाढत्या महागाईपासून संरक्षण मिळत असेल, तसेच देशातील कमाल २५ टक्के लोकांना एकतर महागाईभत्त्याच्या योजनेमुळे किंवा ते संपन्न आर्थिक थरातील असल्यामुळे या महागाईला तोंड देण्याचे सामर्थ्य प्राप्त झाले आहे. पण राहिलेल्या किमान ५० टक्के जनतेचे जीवन ही वाढती महागाई उद्ध्वस्त करीत आहे. आजच्या घडीला अशी बहुसंख्य जनता नेतृत्वाच्या अभावी अजून रस्त्यावर उतरलेली नाही. पण याचा अर्थ भविष्य काळातही ती सतत पोट आवळत उपासमार सहन करीत राहील असे नाही. कोणत्याही नेतृत्वाशिवाय जनता जेव्हा रस्त्यावर उतरते तेव्हा ते अराजकाला आमंत्रण असते आणि अशा अराजकामुळे अर्थव्यवस्था ठप्प होते, हा जागतिक पातळीवरचा अनुभव आहे. तसे झाले की आर्थिक वाढीला लगाम लागतो. भारतात तसे झाले तर परकीय वित्तसंस्था या अर्थव्यवस्थेत केलेली आर्थिक गुंतवणूक मागे घेतील. अनिवासी भारतीय आपली बँकेतील खाती बंद करतील. एकदा ही प्रक्रिया सुरू झाली तर १९ वर्षांपासूनचे परकीय चलनाचा साठा संपण्याचे संकट पुन्हा उभे राहू शकेल. राज्यकर्त्यांनी हा धोका ओळखून संभाव्य अराजक टाळण्यासाठी वेळीच पावले उचलावीत.

**रमेश पाध्ये**
rameshpadhye@hotmail.com
६, पद्मरेखा, ५९ जयप्रकाश नगर, गोरेगाव (पूर्व), मुंबई ४०००६३.
Phone : 022-26861814

अभिवादन

किशोर बेडकीहाळ

# वैचारिक प्रवास : भेदाकडून अभेदाकडे जाणारा

**विचारवंत म्हणून साने गुरुजींची प्रतिमा प्रतिष्ठित करणाऱ्या भोळ्यांना साने गुरुजींच्या जयंतीदिनीच मृत्यू यावा हा केवळ योगायोग असेलही, पण त्यातही भोळ्यांचा 'वैचारिक अनुबंध'च प्रकट झाला, म्हणून भोळ्यांच्या लवकर जाण्याने चळवळीची, साहित्य व्यवहारांची, माणुसकीची व अशा अनुबंधाची झालेली हानी ही साचेबंद प्रतिक्रिया राहत नाही, तर मनाच्या दुखऱ्या कोपऱ्यांच्या संख्येत भर टाकणारी ठरते. गेल्या २० वर्षांहून अधिक काळ जीवाभावाचे संपन्न मैत्र देणाऱ्या या विचारवंत मित्राच्या स्मृतीस हार्दिक अभिवादन.**

प्रा.डॉ.भा.ल.भोळे यांच्या निधनाने एका निर्भीड, व्यासंगी, साक्षेपी, अशा भाष्यकाराला आपण सारेच मुकलो आहोत. डॉ.भोळे यांच्या संदर्भात या प्रकारची प्रतिक्रिया साचेबंद म्हणून सोडून देता येणार नाही. वरील निर्भीड, व्यासंगी व साक्षेपी हे तिन्ही शब्द भोळ्यांच्या लेखनात, जीवनव्यवहारात शब्दश: खरे होते. या शब्दांच्या अर्थांची छटा कितीही कमी-जास्त धरली तरी त्यांच्या टीकाकारांना, मित्रांना, वाचकांना हे शब्द वापरण्यास काही पर्यायच उरत नाही. महाराष्ट्राला ज्ञानोपासक भाष्यकारांची एक सकस परंपरा आहे. डॉ.भोळे याच परंपरेतले होते. हे जितके खरे, तितकेच या परंपरेअंतर्गत असणाऱ्या प्रा.गं.बा. सरदार, वसंत पळशीकर यांच्या परंपरेत ते अगदी चपखलपणे बसतात हेही खरेच. परिवर्तनवादी विचार विश्वातील प्रा.सरदार ते प्रा.भोळे या परंपरेचे एक वेगळेपण ठळकपणे दिसते, ते म्हणजे भाष्य करून समाजस्थितीचे भान करून देण्याबरोबर उभयतांनी प्रमाण मानलेल्या विचारवंतांना त्यांच्या अनुयायांसमोर परस्परपूरकतेने उभे करण्याचा आटोकाट प्रयत्न केला. महाराष्ट्रातील सामाजिक चळवळी तत्त्वदर्शन म्हणून व्यापक आहेत. विश्वात्मक असणाऱ्या व होऊ पाहणाऱ्या विचारधारांच्या त्या पाईक आहेत, पण त्यांचा व्यवहार मात्र परस्परवर्जक स्वरूपाचा आहे. अनुयायांच्या डोक्यावरील इतिहासाची ओझी, त्यांच्या अस्मितांच्या रूपात प्रत्यक्षात वावरत असल्याने समता चळवळीला प्रमाणभूत असणाऱ्या मूल्यांचे आविष्कार भिन्न व परस्परविरोधी स्वरूपात घडताना दिसतात. याने सामाजिक चळवळीचे पाऊल पुढे पडायच्या ऐवजी जैसे थेच राहते, त्याचा फायदा प्रस्थापितांनाच होतो. या वास्तवाचे तीव्र भान प्रा.सरदारांप्रमाणेच प्रा.भोळे यांच्या लेखनातही दिसते. परंपरा, धर्म, संस्कृतीविचार आदींबाबत तर हे भान त्यांच्या लेखनात जागोजाग दिसते. या भानातून जसा प्रा.सरदारांनी लोकवाङ्मयाचा वेगळा (ऐतिहासिक दृष्टिकोनातून) अर्थ लावला, तसाच वेगळा अर्थ प्रा.भोळे यांनी फुले-आंबेडकर-शाहू-गांधी-मार्क्स यांच्याबाबतीत लावला आहे. या साऱ्यांच्या विचारधारांचे मूलगामी, कालोचित असे परिष्करण करून त्यांना अनुयायांच्या 'बंदिस्त' पिंजऱ्यातून बाहेर काढण्याचा प्रयत्न व विरोधकांच्या तथाकथित हिंदूकरणातून सोडवण्याचा प्रयत्न एकाच वेळी करण्याचे आव्हान प्रा.भोळे यांनी लीलया पेलले, म्हणूनच प्रा.सरदारानंतरची त्यांची परंपरा चालवणारा 'प्रबोधन व्रती' असे त्यांचे वर्णन जास्त वास्तव ठरते. सत्तरीच्या दशकात डॉ.भोळे यांच्या लेखनाला सुरुवात झाली, त्यावेळी साहित्य, राजकारण व समाजकारण या तिन्ही क्षेत्रांत प्रस्थापितांना हादरे बसत होते. दलित समूहांच्या शिक्षित फळीने आपले हक्क, व्यवस्थेतील आपला वाटा मागत, व्यवस्थेलाच आव्हान दिले होते. हे आव्हान इतके मूलगामी होते की परिवर्तनाच्या विश्वातही त्याने खळबळ माजली. म.फुल्यांचे नव्याने मूल्यमापन करण्याचाही हाच काळ होता आणि मधल्या जातींच्या उठावामुळे राजकारण स्पर्धाशील होण्याचाही हाच काळ होता. शिक्षित दलितांच्या अनुभवाने बद्ध झालेल्या साहित्यकृतींनी पांढरपेशे समाजस्तरही हादरून जाण्याचा हाच काळ होता. विविध विचारप्रणालींवर आधारलेले संघर्षशील गटही याच काळात टोकदार होताना दिसतात. हा सर्वच काळ घुसळणीचा होता, तसा पुरोगामी चळवळींतर्गत परस्परांपासून अंतर राखणाराही होता. काळाची ही पार्श्वभूमी घेऊन भोळ्यांमधील अभ्यासक लिहिता झाला. राज्यशास्त्र, समाजशास्त्र, इतिहास, साहित्य अशा विविध क्षेत्रांत डॉ.भोळ्यांना मुळातच रूची असल्याने

आपली रूची, तत्कालीन वास्तव व परिवर्तनवादी मानस यांचा (भिन्न न करता येणारा) 'संयोग' त्यांच्या लेखनात झाला. भोळ्यांनी ज्या ज्या विषयांवर लिहिले, त्या प्रत्येक विषयांचे त्यांचे आकलन (चोख, कालोचित व ) एकूण परिवर्तनवादी चळवळ पुढच्या टप्प्यावर जाण्यास उपयुक्त ठरेल असेच दिसते. प्रा.सरदारांसारखे डॉ.भोळे मार्क्सवादी दृष्टी बाळगत होते, पण ते कम्युनिस्ट झाले नाहीत, फुले-आंबेडकरी चळवळीची तरफदारी करताना ते मार्क्स वा गांधी विरोधी झाले नाहीत. किंबहुना चळवळींना ग्रासणारी द्वंद्वे (उदा. मार्क्स विरुद्ध बुद्ध, गांधी विरुद्ध आंबेडकर) कशी दूर होतील याचाच विचार त्यांच्या लेखनात दिसतो. या द्वंद्वात्मकतेमुळे चळवळींचे समांतरत्व वाढत जाते व एकूणात त्यांची परिणामक्षमता कमी होते. यातूनच परिवर्तनाची सुटी बेटे तयार होतात. त्यातून मग संकुचित अस्मिता, वैचारिक अवरोध यांची मालिका सुरू होते, हीच त्यांची धारणा राहिली. सामाजिक चळवळीतील दैवते मानले गेलेल्या विचारवंतांचे परस्परपूरकत्व पुढे आणणे ही मग त्यांची बांधिलकी झाली. सत्तरीच्या दशकातील राजकीय-सामाजिक-सांस्कृतिक पार्श्वभूमी व प्रा.भोळ्यांचे लेखनविषय यांच्या तादात्म्यातून ही बांधिलकी अगदी सघन झाली. मात्र विविध विचारवंतांचे परस्परपूरकत्व पुढे आणण्यासाठी अर्थांची ओढाताण करणे, पुराव्यांची मोडतोड करणे व विसंगतींकडे कानाडोळा वा दुर्लक्ष करणे अशा गोष्टींची त्यांना गरज पडली नाही. याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे 'ऐतिहासिक दृष्टिकोना'बद्दलची त्यांची चोख समज व त्याचे उपयोजन करण्यातील निरपेक्षता हे होय. (म्हणूनच 'निर्भीड आणि व्यासंगी' हे शब्द भोळ्यांच्या बाबतीत अर्थपूर्णच ठरतात.) या निरपेक्ष उपयोजनामुळेच पुरोगामी व प्रतिगामी अशा दोन्ही छावण्यांतील अस्मितावाद्यांच्या झुंडशाहीवर व अभिव्यक्ती स्वातंत्र्यावरील हल्ल्यांवर, भोळे परखडपणे लिहू शकले. (जिज्ञासूंनी भोळे यांचा भावनादुखीचे राजकारण आणि अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य हा 'साहित्य-अवकाश' या त्यांच्या अलीकडच्या पुस्तकातील लेख अवश्य वाचावा). 'आंधळ्या विभूतीपूजेत परिवर्तीत होणारे भावनादुखीचे राजकारण व विद्यमान बौद्धिक धुरिणांचे अचिकित्सक अंधानुयायित्व' या चळवळींमधील दोषांवर प्रा.भोळे यांनी अचूक बोट ठेवून परिवर्तनवाद्यांना सावध करण्याचे अत्यावश्यक कार्य केले आहे.



समतेच्या चळवळीत विविध विचारधारांच्या राहुट्या किंवा छावण्या आहेत. या साऱ्यांच्या सर्वच भूमिका भोळ्यांना मान्य नव्हत्या, पण त्यांनी आपल्या विरोधाला वैचारिक मर्यादेतच तारस्वर दिला. मतभिन्नता म्हणजे द्वेषाचा आधार नव्हे, एवढेच सांगून भोळे थांबले नाहीत तर समताविचाराचे समाजात प्रवर्तन करणाऱ्यांसाठी त्यांनी 'संघर्ष किंवा द्वंद्वाच्या नावाखाली द्वेषाधिष्ठित रणनीतींचा अवलंब करणाऱ्या चळवळी समतेत फारसे योगदान करू शकणार नाहीत.' असा इशाराही त्यांनी देऊन ठेवला आहे. (विसावे शतक आणि भारतातील समताविचार, पृष्ठ १२१) विषमता कमी व्हावी किंवा नष्ट व्हावी म्हणूनच्या संघर्षात सबंध समाजालाच (केवळ लाभार्थींना नव्हे) समतेच्या दिशेने नेण्याचे दायित्व समाजधुरिणांनी पार पाडायचे असते (उपरोक्त पृ.१२२) ही समतेच्या चळवळीची गरजच डॉ.भोळे यांनी अधोरेखित केली व त्यांचे सारे लेखन, सामाजिक व व्यक्तिगत व्यवहारही यासाठीच्या सामंजस्यांनी परिपूर्ण होते. भेदाकडून अभेदाकडे, विषमतेकडून समतेकडे जाण्यासाठी द्वंद्ववादाचा निरास होण्याच्या प्रक्रियेला अभ्यासक-भाष्यकार म्हणून भोळ्यांचे हे योगदान फारच मोलाचे आहे. समता विचाराच्या चर्चाविश्वात उदारमतवादाच्या मांडणीला जोड देणाऱ्या अमर्त्य सेन प्रभृतींच्या लेखनाची चिकित्सा करून भारतीय संदर्भात त्याच्याही पुढे जाण्याचे आव्हान त्यांनी दाखवून देऊन एकविसाव्या शतकातील 'समता' संकल्पनेपुढची आव्हाने परिवर्तनवाद्यांनी पेलण्यासाठी काय केले पाहिजे याचेही दिग्दर्शन केले आहे. म.फुले, महर्षी वि.रा.शिंदे, आंबेडकर, गांधी यांच्या समन्वयाचा प्रा.भोळे यांचा प्रयत्न व विद्यमान जागतिक वास्तवाशी जोडून घेऊन व्यापक व्यवस्था परिवर्तनाशी तो जोडण्याचा त्यांचा प्रयत्न जर एकत्रितपणे पाहिला तर आताच्या समतेच्या चळवळी वैश्विक स्तरावर जाण्यासाठी काय करावे लागेल, याचे ते दिग्दर्शनच आहे असे म्हणता येते.

राजकीय-सामाजिक प्रश्नांइतकाच रस भोळ्यांना सांस्कृतिक विश्वातही होता. किंबहुना समाजपरिवर्तनवाद्यांनी सांस्कृतिक प्रश्नांची उपेक्षा करता कामा नये. अशीच त्यांची धारणा होती. सांस्कृतिक विश्वातले अनेक प्रश्न घेऊन त्यांनी लेखन केले. त्यात साहित्यविषयक लेखन फार महत्त्वाचे आहे. समाजातील साहित्य व्यवहार हा अधिकाधिक लोकानुवर्ती कसा होईल, हे पाहणेही परिवर्तन चळवळींचे कामच आहे असे मानून याही क्षेत्रात भोळ्यांनी आपला ठसा उमटवला आहे. सामाजिक शास्त्रांच्या व्यासंगाची पार्श्वभूमी असल्याने भोळ्यांचा साहित्यविचार हा स्वाभाविकच समाजसापेक्ष झाला आहे. मराठी लेखकांची संदिग्ध तत्त्ववैचारिकता, राजकारणाचे वरवरचे व वृत्तपत्रीय आकलन, जनजीवनाविषयीची अत्यंत जुजबी जिज्ञासा, लोकलढ्यांकडे

बघण्याचा तुच्छतापूर्ण दृष्टिकोन' याचा मराठी साहित्यव्यवहारांवर झालेल्या परिणामांकडे (साहित्य अवकाश, पृ, ८३-८४) लक्ष वेधण्याचे काम करून भोळे थांबले नाहीत, तर त्यातून साहित्य व समाज यातील वाढत्या अंतराकडे त्यांनी निर्देश केला आहे. मराठीतील रूढ आस्वादक समीक्षेपेक्षा वेगळी समीक्षा भोळे यांनी लिहिली ती त्यांच्या समाजसापेक्ष साहित्यविषयक दृष्टीमुळेच. मराठी गद्य शैलीला म.फुल्यांनी दिलेल्या योगदानाचे दर्शन मराठी वाचकांना भोळ्यांनी घडवले तेही याच साहित्य दृष्टीमुळे. भोळ्यांच्या समीक्षादृष्टीत त्यांच्या सामाजिक शास्त्राच्या व्यासंगाचेही उत्तम दर्शन घडते. विद्यमान (जागतिक स्तरावरील व त्याचा परिणाम म्हणून भारतातीलही) नवभांडवली बाजारशरण सामाजिक वास्तवाचाही त्यांच्या समीक्षालेखनात संदर्भ दिसतो. (ज्येष्ठ समीक्षक म.सु.पाटील यांच्या 'साहित्याचे सामाजिक व सांस्कृतिक अनुबंध' या पुस्तकावर लिहिताना (साहित्याचा अवकाश, पृष्ठ १३०) डॉ.भोळे यांनी आजच्या बाजारपेठेने व माध्यमांनी जीवनावर केलेल्या परिणामांबद्दलचे अतिशय भेदक विवेचन केले आहे.) समाजशास्त्रीय समीक्षा मराठी साहित्यव्यवहारात नवीन नाही, पण तिचा वापर करून लोकजीवन तळापासून वळणाऱ्या घटनांच्या परिणामी निर्माण होणाऱ्या प्रवाहांना कवेत घेऊन साहित्य पुढे जाताना दिसते का, हे पाहण्याचा त्यांचा प्रयत्न अर्थपूर्ण व वेगळा म्हणावा लागेल. या दृष्टीने अनेक कलाकृतींची त्यांनी लिहिलेली परीक्षणे, साहित्यविषयक प्रश्नांवरची भाष्ये पाहण्यासारखी आहेत.

संस्कृती, कला, प्राचीन वास्तू याकडे पाहण्याचा भोळ्यांचा दृष्टिकोनही त्यांच्या ऐतिहासिक दृष्टिकोनाने बद्ध आहे व त्यावर डॉ.लोहियांचाही प्रभाव आहे. डॉ.यशवंत मनोहरांच्या 'स्मरणाची कारंजी' या पुस्तकावरील (साहित्य अवकाश, पृष्ठ ३५) भोळ्यांचा परीक्षण लेख या दृष्टीने पाहण्यासारखा आहे. आजच्या काळात आलेले शोषणाचे-विषमतेचे भान व त्यातून घडणारे मानस इतिहासकडे, प्राचीन कला-वास्तू यांचेकडे जेव्हा पाहते, तेव्हा ऐतिहासिक दृष्टिकोनाचा लोप होण्याची शक्यता असते व त्यातून साहित्यसंस्कृतीचा कृतक संबंध व्यक्त होतो, हा भोळे यांचा इशारा त्यांच्या अव्वल समीक्षादृष्टीची साक्ष देतो. वरवर साहित्यबाह्य वाटणारी ही समीक्षादृष्टी, साहित्य ही समाजबाह्य गोष्ट तर नाहीच, पण ती समाजसापेक्ष असते याचा उच्चार करणारी आहे. भोळे यांनी सततच उत्साहाने समाजसापेक्ष साहित्यकृतींची (उदा. अरुण काळे, संतोष पद्माकर पवार, प्रफुल्ल शिलेदार हे कवी) या दृष्टीतून चिकित्साही केली. समाजसापेक्ष असणे व तिचे कलात्मक असणे यात त्यांना अंतर वाटत नाही. हेही त्यांचे वेगळेपण म्हणावे लागेल. साहित्यव्यवहारातील भाषा या घटकाविषयी भोळे खूपच जागरूक होते. अनेक इंग्रजी शब्दांना त्यांनी मराठी प्रतिशब्द दिले. याबाबत ते आगरकरांचा कित्ता गिरवतात, तर मराठी भाषेतच लिहिणे हा राजवाड्यांचा बाणा जपून फक्त मराठीतच लिहितात. मराठी साहित्याच्या समृद्धीसाठी इंग्रजी, हिंदी ग्रंथही भाषांतरित करतात व भाषांतराबाबतही संस्कृतीसापेक्षतेचे भान दाखवतात. साहित्य व्यवहाराच्या समृद्धीसाठी निरुपयोगी ठरणाऱ्या साहित्य संमेलनापासून ते फटकून राहिले व त्याऐवजी गंभीर साहित्यचर्चेच्या व्यासपीठांना त्यांनी आपले मानले. याबाबत ना श्रोत्यांच्या मोठ्या संख्येची भुरळ त्यांना कधी पडली ना मोठ्या श्रोतृसंख्येने त्यांना लोकानुरंजनी भूमिका घ्यायला भाग पडले.

संस्कृतीकारणाच्या क्षेत्रातही अत्यंत महत्त्वाची घटना असणाऱ्या पूर्वास्पृश्य समाजगटांच्या धर्मांतराचा त्यांनी साक्षेपी आढावा घेतला. यात विपश्यनेच्या मागे पळणाऱ्या नवबौद्ध बांधवांना या भ्रामक विचारपासून परावृत्त करण्याचा त्यांचा प्रयत्न ठळकपणे दिसतो. दलित चळवळीचा आस्थेवाईक पण परखड भाष्यकार ही त्यांची प्रतिमा म्हणून मनावर ठसते. दलितांच्या राखीव जागांवर लिहितानाही डॉ.भोळे यांनी विवेकी आरक्षणाची भूमिका मांडली असून, आर्थिक पायावरील आरक्षणाला सैद्धांतिक व घटनात्मक अंगाने विरोध व्यक्त केला आहे. (संदर्भ दलित चळवळीचा, पृष्ठ २०५ ते २१२) आरक्षण समर्थकांच्या आजच्या अनुनयाच्या व बचावात्मक पवित्र्यांच्या काळात स्पष्ट, सडेतोड भूमिका घेऊन आरक्षणाचे फायदे व मर्यादा दाखवून देणारे त्यांचे लेखन दलित चळवळीसाठी नक्कीच दिशादर्शक ठरेल.

डॉ.भोळे यांचा सर्वच वैचारिक प्रवास हा त्यांच्या शब्दात 'भेदाकडून अभेदाकडे' जाणारा आहे. या प्रवासासाठी लागणारे सामंजस्य, साध्य-साधनविवेक माणसांविषयीची आपुलकी, चळवळींविषयीची आस्था व साक्षेपी दृष्टी यांनी त्यांचे व्यक्तित्व संपन्न व संपृक्त होते. त्यांच्या स्वभावातील खुमासदार मिश्किलीही माणसे जोडण्याच्या त्यांच्या व्रताला बाधा आणू शकली नाही. आपली भूमिका आणि माणूस याबाबत कायम साक्षेपी भूमिका घेणारा हा सुहृद भाष्यकारही काळाच्या पडद्याआड गेला तो साने गुरुजींच्या जयंती दिनी. भोळ्यांच्या भाषेत सांगायचे तर ज्या साने गुरुजींचे विचारवंतपण महाराष्ट्राच्या नजरेआड होते ते समोर आणण्याचे कार्य भोळ्यांनी कळकळीने केले. ('विचारवंत साने गुरुजी' हा भोळे यांचा लेख भालचंद्र नेमाड्यांनी संपादित केलेल्या साने गुरुजी पुनर्मूल्यांकन या साहित्य अकादमीद्वारा प्रकाशित पुस्तकात आहे. तो जिज्ञासूंनी अवश्य वाचावा.) विचारवंत म्हणून साने गुरुजींची प्रतिमा प्रतिष्ठित करणाऱ्या भोळ्यांना साने गुरुजींच्या जयंतीदिनीच मृत्यू यावा हा केवळ योगायोग असेलही, पण त्यातही भोळ्यांचा 'वैचारिक अनुबंध'च प्रकट झाला, म्हणून भोळ्यांच्या लवकर जाण्याने चळवळीची, साहित्य व्यवहारांची, माणुसकीची व अशा अनुबंधाची झालेली हानी ही साचेबंद प्रतिक्रिया राहत नाही, तर मनाच्या दुखऱ्या कोपऱ्यांच्या संख्येत भर टाकणारी ठरते. गेल्या २० वर्षांहून अधिक काळ जीवाभावाचे संपन्न मैत्र देणाऱ्या या विचारवंत मित्राच्या स्मृतीस हार्दिक अभिवादन.

**किशोर बेडकीहाळ**
सातारा
Mob. : 9423012877

मनोहर जाधव

# लढाऊ आणि अभ्यासू मित्र

आदरांजली



**समाजपरिवर्तनाची चळवळ, वाचन-लेखन, व्याख्यान-अध्यापन ही प्रा. अरुण कांबळे यांच्या आवडीची क्षेत्रं होती. फार मन:पूर्वक ते या कामात स्वत:ला झोकून देत. विषयातील सूक्ष्म संदर्भ आणि भिन्न-भिन्न बाजू यांचा त्यांनी बारकाईने विचार केलेला असे. त्यांचा 'संस्कृत'चा व्यासंगही दांडगा होता, 'रामायणातील संस्कृतिसंघर्ष' या त्यांच्या पुस्तकात याचे दाखले मिळतात. त्यांनी डॉ. आंबेडकरांच्या विचारसूत्रांचा प्रगल्भतेने अन्वयार्थ लावला होता आणि वर्तमान व्यवस्थेसंबंधीचे त्यांचे निरीक्षण मार्मिक होते. आत्मशोध आणि आत्मटीका हा त्यांच्यातील संवेदनशील कवी-कार्यकर्त्याचा स्थायीभाव होता.**

प्रा. अरुण कांबळे गेल्याची धक्कादायक बातमी आली आणि माझ्यासमोर आठवणींचा पट उलगडत गेला. १९८२-८३ मध्ये उल्हासनगर येथे 'अस्मितादर्श साहित्य संमेलन' (आंबेडकरी विचारांचे संशोधक वसंत मून यांच्या अध्यक्षतेखाली) भरले होते. त्यावेळी तेथील एका दलित युवकाने संघ लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण केली होती. त्याचा जाहीर सत्कार त्या दिवशी संध्याकाळी एका ठिकाणी होता. त्या कार्यक्रमात प्रा.कांबळे यांचे भाषण ऐकण्याचा योग आला. त्यांनी केलेल्या आंतरजातीय विवाहाचे थरारक वर्णन 'पूर्वा' मासिकात वाचले होते. दया पवार यांनी आपल्या 'चावडी' पुस्तकात अंगातील शर्ट काढून गोल गोल भिरकावणारा मोर्चातील तरुण पँथर अरुण कांबळे यांचे चित्रण कोणत्या तरी संदर्भात केले आहे, ते आठवले. 'रामायणातील संस्कृतिसंघर्ष' या पुस्तकानिमित्ताने त्यांनी केलेला न्यायालयीन संघर्ष आणि त्याकामी त्यांचे मित्र ॲड.नितीन प्रधान यांनी केलेली मदत आठवली. माधव गडकरींनी 'लोकसत्ता'तील 'चौफेर' सदरात बाबासाहेब आंबेडकरांच्या 'रिडल्स इन हिंदुइझम'वर केलेली टीका आणि त्या टिकेचा त्याच वृत्तपत्रात तातडीने तर्कशुद्ध प्रतिवाद केलेला प्रा.कांबळेंचा लेख डोळ्यांपुढे तरळून गेला. बार्शीच्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात प्रा.गं.बा. सरदार अध्यक्ष असताना मराठवाडा विद्यापीठ नामांतरवाद्यांचा मोर्चा घेऊन गेलेल्या प्रा.कांबळे यांचे वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेले छायाचित्र आठवले. अशा कितीतरी आठवणी.

मी पुणे विद्यापीठात आल्यानंतर प्रा.कांबळे यांच्याशी घट्ट मैत्री झाली. त्या आधी मी फैजपूरला असताना आमचा संपर्क कमी होता. विद्यापीठीय उपक्रमांमध्ये आम्हा उभयतांचा सहभाग असल्याने संपर्क वाढला. एव्हाना ते मुंबई विद्यापीठाच्या मराठी विभागात चांगलेच रूळले होते. मराठी विभागाचे ते प्रमुख झाले, त्यावेळी त्यांनी आवर्जून फोन करून वृत्तांत कळवला आणि विभागासाठी काय काय करायचे आहे, त्याचे नियोजनही सांगितले. फोनवर बराच वेळ आम्ही बोललो. त्या बोलण्यातील एक वाक्य आजही माझ्या लक्षात आहे. ते म्हणाले, ''आपण विद्यापीठांमध्ये नोकरीला आहोत म्हणून मित्र नाही आहोत, तर चळवळीमधून आपण आलेलो असून तो आपल्या मैत्रीचा खरा धागा आहे.'' मित्राकडे आणि मैत्रीकडे व्यवहारापलीकडे पाहणारी प्रा.कांबळेंची ही दृष्टी मला खूप मोलाची वाटली.

समाजपरिवर्तनाची चळवळ, वाचन, लेखन, व्याख्यान, अध्यापन ही त्यांची अतिशय आवडीची क्षेत्रं होती. फार मन:पूर्वक ते या कामात स्वत:ला झोकून देत असत. अनौपचारिक चर्चेतही त्यांच्याकडून अनेक संदर्भ ऐकायला मिळत. व्याख्यानात एखादा विषय अतिशय मुद्देसूदपणे आणि विस्ताराने ते खुलवत नेत. विषयातील सूक्ष्म संदर्भ आणि भिन्न भिन्न बाजू यांचा त्यांनी बारकाईने विचार केलेला असे. स्पष्ट उच्चार, दमदार शब्दफेक, आवेश आणि आक्रमकतेनुसार बदलणारी देहबोली, व्याख्यान ऐन रंगात आले की टाचा किंचित उंचावून बोलण्याची त्यांची धाटणी, नाकाच्या शेंड्यावर ठेवलेला चष्मा. चष्म्याच्या काचेतून आणि काचेबाहेरून वेध घेणारी नजर, योग्य वेळी अनुषंगाने घेतलेला पॉज हे सर्व पाहण्यासारखे असे. म्हणजे प्रा.कांबळे यांचे व्याख्यान श्रवणीय तर असायचे, पण प्रेक्षणीय देखील असायचे. प्रा.कांबळे टापटीपपणे राहत. राहणीमान प्रथमदर्शनी नजरेत भरे. मनिला वा पँट, झब्बा-पायजमा असला तरी व्यवस्थित इस्त्री केलेले कपडे, नीट बसवलेले केस, खिशाला पेन. चालण्यात आणि बोलण्यात कमालीचा आत्मविश्वास.

प्रा.कांबळे यांचा संस्कृतचा व्यासंग दांडगा होता. ‘रामायणातील संस्कृतिसंघर्ष’ या त्यांच्या पुस्तकात याचे दाखले मिळतात. आग्रही परंतु तर्कशुद्ध, संदर्भयुक्त लेखन करणारे प्रा.कांबळे वैचारिक स्पष्टतेच्या संदर्भात अतिशय काटेकोर होते. हे जसे त्यांच्या व्याख्यानात दिसे, तसे लेखनातूनही प्रकट होत असे. दि. २३ ते २५ मार्च २००२ या दरम्यान कल्याण येथे बुद्ध-फुले-आंबेडकर जागतिक साहित्य संमेलन प्रा.कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली भरले होते. त्यावेळी त्यांनी केलेले भाषण छोटेखानी असले तरी अतिशय महत्त्वाचे आहे. परप्रांतातील दलित साहित्य चळवळीसंबंधी त्यांनी अनेक अज्ञात संदर्भ त्यात उद्धृत केले आहेत. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारप्रवाहांचा आणि चळवळीचा अनेक अंगाने त्यांनी बारकाईने अभ्यास केला होता, हे ते भाषण वाचले की लक्षात येते. त्या भाषणात एका ठिकाणी त्यांनी म्हटले आहे, ‘‘डॉ.आंबेडकरांचा लढा दलित सवर्ण समतावाद्यांचा समतेच्या प्राप्तीसाठी सुरू झालेला धर्मसंगर होता. कोणत्याही प्रकारची संकुचितता त्यात नव्हती. म्हणूनच मी आपल्याला असे आवाहन करतो की, सर्व जाती-धर्मातील समतावाद्यांना समाविष्ट करून ही चळवळ पुढे गेली पाहिजे. किंबहुना तरच ती खऱ्या अर्थाने पुढे जाईल, याचे भान सर्वांनी ठेवणे अत्यंत गरजेचे आहे. दलित साहित्याच्या क्षेत्रात हे भान ठेवले गेले आहे असे दिसते, पण राजकीय-सामाजिक क्षेत्रात त्याचे प्रत्यंतर दिसत नाही.’’ प्रा.कांबळे यांनी बाबासाहेबांच्या विचारसूत्राचा किती प्रगल्भतेने अन्वयार्थ लावला होता आणि सद्य:स्थितीतील वर्तमान व्यवस्थेसंबंधीचे त्यांचे किती मार्मिक निरीक्षण होते, ते त्यांच्या वरील विवेचनावरून लक्षात येते. ‘चळवळीचे दिवस’ हा त्यांचा प्रदीर्घ लेख ‘अस्मितादर्श’मध्ये प्रसिद्ध झाला होता. पुढे त्याची पुस्तिका प्रसिद्ध झाली. त्यात त्यांनी नामांतर आंदोलनाच्या काळातील आपल्या आठवणी नोंदविल्या आहेत. ‘अरुण कृष्णाजी कांबळे’ या स्वत:च्याच नावाने त्यांनी आपला कवितासंग्रह प्रकाशित केला. कवितासंग्रहाच्या शीर्षकाची प्रा.कांबळे यांची कल्पना अफलातून होती. तो संग्रह छोटेखानी आहे, पण त्या कवितेत विद्रोह ठासून भरलेला आहे. त्यातील ‘डॉ.बाबासाहेब आंबेडकर’ या कवितेत त्यांनी बाबासाहेबांशी संवाद साधला आहे.

*‘‘एकाचा बाबासाहेब*
*दुसऱ्याच्या बाबासाहेबांचे पाय ओढताना,*
*दुसऱ्याचा बाबासाहेब*
*तिसऱ्याच्या बाबासाहेबांचे पाय ओढताना,*
*तिसऱ्याचा बाबासाहेब*
*चवथ्याच्या बाबासाहेबांचे पाय ओढताना,*
*आणि सगळेच मिळून बाबासाहेब*
*तुमचे हात-पाय-डोळे-कान-नाक ओढताना,*
*तुम्हाला कसे होते हो?’’*

असा उपरोधिक सवाल कवीने बाबासाहेबांना विचारला आहे आणि बाबासाहेबांच्या तथाकथित निष्ठावान अनुयायांना परखडपणे धारेवर धरले आहे. हा आत्मशोध आणि आत्मटीका, प्रा.कांबळे यांच्यासारख्या संवेदनाशील कवी-कार्यकर्त्याच्या मनाचा स्थायीभाव होता.

प्रा.कांबळे यांनी राष्ट्रीय राजकारणात जनता दलाच्या राजवटीत पंतप्रधान व्ही.पी. सिंग यांच्यासोबत ठळक सहभाग नोंदवला होता. जनता दलाचे राष्ट्रीय चिटणीस, जनता दल पार्लमेंटरी बोर्ड सदस्य, राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य आणि बिहार राज्याचे प्रभारी म्हणून त्यांनी महत्त्वपूर्ण काम केले. भारतीय दलित पँथरचे अध्यक्ष या नात्याने विविध आंदोलनांचे नेतृत्व केले. त्यांच्यासोबत काम करणारे दुय्यम-तिय्यम फळीतील कार्यकर्ते पुढे मंत्री झाले, खासदार झाले. अलीकडच्या काही वर्षांत मात्र प्रा.कांबळे सार्वजनिक जीवनात आणि साहित्यक्षेत्रातही फारसे दिसत नव्हते. विद्यापीठातील नोकरीतही अनुषंगाने जी पदे मिळायला हवी होती, ती त्यांना मिळू शकली नाहीत. याचे शल्य त्यांच्या मनात असावे असे त्यांना भेटल्यावर जाणवत असे. पुणे विद्यापीठातील एका अध्यासनावर त्यांच्या नियुक्तीची शक्यता बळावली होती, पण त्यातही अनेक तांत्रिक अडचणी उद्‌भवल्या आणि मुंबई विद्यापीठातच राहणे त्यांनी पसंत केले. काही कामानिमित्त पुणे विद्यापीठात आल्यावर मात्र ते मराठी विभागात आवर्जून येत. माझ्या ऑफिसबाहेर ‘आत येण्यास परवानगीची गरज नाही’ अशी पाटी लावली आहे. ती वाचून, एका हाताने दार ढकलून आणि दारातच उभे राहून हसत म्हणत, ‘‘परवानगीची गरज नसली तरी एटिकेट्सचा भाग म्हणून विचारतो, आत येऊ का?’’ मग ऑफिसचा माहोल बदलून जाई. एक चैतन्य निर्माण होई. विभागातील सर्व प्राध्यापकांना भेटत. गप्पा, चर्चेमध्ये रंगून जात. त्यावेळी माझ्या कार्यालयात जे कोणी लेखक, कार्यकर्ते, विद्यार्थी बसलेले असत त्यांच्याशी ओळख करून दिल्यावर महाराष्ट्राच्या त्या त्या भागातून आलेल्या या लोकांना तेथील जुने राजकीय-सामाजिक संदर्भ रंगवून सांगत. घटना-प्रसंग वर्णन करताना टाळी मिळवण्यासाठी हात पुढे करीत, ही मात्र त्यांची खास लकब होती. या निमित्ताने समोरची व्यक्ती बहुश्रुत होत असे आणि कांबळे सरांची अनपेक्षित भेट झाली म्हणून आनंदूनही जात असे.

दि. २० डिसेंबर रोजी संध्याकाळी ‘अरुण कांबळे इज नो मोअर’ असा मित्राचा एसएमएस आला त्यावेळी मी घरातील माझ्या छोट्या ग्रंथालयातील पुस्तकांची मांडामांड करीत होतो. आदल्या दिवशी एका दूरचित्रवाणी वाहिनीने दिलेले प्रा.कांबळे हैदराबादमधून बेपत्ता असे वृत्त मी पाहिले होते. काही मित्रांशी फोनवर बोलून माहिती घेतली होती. काळजी वाटत होती आणि अचानक एसएमएसचा मजकूर पाहून अस्वस्थ झालो. लगेच टी.व्ही. लावला. कांबळे सर गेल्याचे सविस्तर वृत्तांकन सुरू होते. सर्वच वृत्तांत क्लेशकारक होता. नंतर रॅकमध्ये पुस्तकं लावताना योगायोगाने कांबळे सरांची दोन-तीन पुस्तकं हाती लागली. पहिल्या पानावर पुस्तकभेटीचा मजकूर आणि दिनांकासह स्वाक्षरी. मी त्या स्वाक्षरीवरून हळूवार बोटं फिरवली...

**- प्रा. मनोहर जाधव**
मराठी विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे.
Mob. 9822850290

**सुमन ओक**

# बी. प्रेमानंद

**स्मरण**



**१९८३-८४ या काळात भारतातील विवेकवादी चळवळीचे प्रणेते बी. प्रेमानंद महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आले होते. महाराष्ट्रातील खेड्यापाड्यांत जाऊन त्यांनी चमत्कार व बुवाबाबा यांची भांडाफोड करणारे अनेक प्रयोग केले. त्यापासूनच प्रेरणा घेऊन महाराष्ट्रात अंधश्रद्धा निर्मूलन चळवळ सुरू झाली. महाराष्ट्र अंनिस २० वर्षे पूर्ण करीत असताना अलीकडेच निधन झालेल्या बी. प्रेमानंदांचे स्मरण प्रेरणादायी ठरावे.**

४ ऑक्टोबर २००९ ला दुपारी बी. प्रेमानंद नावाचं चैतन्य निवान्त झालं. 'मृत्यू ही एक अटळ पण नैसर्गिक घटना असल्याने माझ्या मृत्यूनंतर कोणीही शोकसभेचे कार्यक्रम आयोजित करण्यात वेळ वाया न घालविता आपापली नित्याची कामे विना व्यत्यय चालू ठेवावीत, असे या चैतन्यमूर्तीने (व्हायटॅलिटि) आपल्या असंख्य मित्रांना, चाहत्यांना आणि कार्यकर्त्यांना बजावले होते. ह्या घटनेला त्यांच्या सर्व बुद्धिप्रामाण्यवादी मित्रमंडळी व कार्यकर्त्यांनी अत्यंत संयमाने तोंड दिले. त्यांची अखेरची यात्रा आणि त्यावेळेचे दुःख प्रदर्शन, त्यांच्यावर स्तुतिसुमनांचा वर्षाव किंवा त्यांच्या पार्थीव देहाचे अंत्यदर्शन इत्यादि सर्व टाळून त्यांचा देह वैद्यकीय महाविद्यालयाला देण्यात आला.

वयाच्या अवघ्या बाराव्या वर्षी त्यांनी स्वातंत्र्याच्या चळवळीत उडी घेतली. ब्रिटिशांनी या पोरसवदा स्वातंत्र्यसेनानीला अटक वगैरे केली नाही. परंतु त्यांच्या शाळेच्या भ्याड प्राचार्यांनी 'उगाच नसती ब्याद नको' म्हणून त्यांना शाळेतून काढून टाकले. शालेय शिक्षण संपुष्टात आल्याने त्यांच्या खऱ्या शिक्षणाला घरीच सुरुवात झाली. १९४० साली चळवळीत उतरणाऱ्या या निरागस मुलाची देशभक्ती कालांतराने अधिक प्रगल्भ झाली आणि मानवाची अंधविश्वासातून सुटका करून त्याच्यात बुद्धिप्रामाण्य रुजविण्याचे ध्येय त्यांनी स्वत:समोर ठेवले. त्यासाठी ते भारतातील खेड्यापाड्यांमधे तर गेलेच, पण परदेशातही त्यांनी खूप दौरे केले.

ज्ञानपिपासा (सत्य जाणून घेण्याची प्रबळ इच्छा) या मानवी प्रेरणेने ते झपाटले होते. वडील ईश्वरनिष्ठ (थिऑसॉफिस्ट) असल्याने सुरुवातीस त्यांना योग व इतर गूढ विद्या जाणून घेण्याची इच्छा झाली. त्यांच्यापुढे आदर्श होता स्वामी रामदास यांचा. रामदासांप्रमाणेच प्रेमानंदांनीही स्वतःजवळ काहीही पैसे न बाळगता भारतभ्रमण केले. ते जिथे जिथे गेले तिथे लोकांनी त्यांना सढळ हाताने मदत केली, म्हणून आपल्या भारतभ्रमणाचे श्रेय ते त्या सर्व माणसांना देतात; स्वामीजींसारखे ईश्वराला देत नाहीत. ईश्वर आणि आध्यात्मिकतेच्या शोधात त्यांनी अनेक साधू, संन्यासी आणि गुरू यांच्या भेटी घेतल्या. पण त्यापैकी कोणाचेही त्यांनी आंधळेपणाने अनुकरण केले नाही. उलट, अनेक साधू-स्वामींचा ढोंगीपणा त्यांच्या नजरेतून सुटला नाही. स्वामी शिवानंद कुंडलिनी जागृत करण्याचे अफाट महत्त्व सांगत असत, स्वत: मात्र मधुमेहासारख्या चिवट आजाराने पछाडलेले होते. त्याचे कारण ते सांगायचे, 'दुखणी ही गतजन्मांच्या कर्मांची फळे असल्याने ती टाळण्यापेक्षा या जन्मामधे भोगून टाक णंच जास्त श्रेयस्कर वाटतं.' स्वामी नारायणानंदांच्या बाबतीतही त्यांचा भ्रमनिरास झाला. हे स्वामी ब्रह्मचर्याचे सतत गोडवे गात, पण आश्रमाच्या यजमानीण बाईशी मात्र त्यांची फार जवळीक होती. एक दिवस प्रेमानंद अनपेक्षितपणे लवकर आश्रमात परतले तेव्हा स्वामी व या बाई प्रणयक्रीडा करीत असल्याचे त्यांना आढळून आले. हे स्वामी कोऱ्या कागदावर जळते लाकूड फिरवून ॐ हे अक्षर काढण्याचा चमत्कार करीत. चमत्कारांना भुलून न जाण्याचा मूळ स्वभाव असल्याने प्रेमानंदांनी थोड्याच दिवसांत त्यांच्या चमत्काराचे बिंग उघडकीस आणले.

योगी, संन्यासी यांच्या असल्या अनेक अनुभवातून त्यांची खात्री झाली की, या बाबा-बुवांच्या योग आणि तांत्रिक ज्ञानाला काहीही वैज्ञानिक आधार

नाही. त्यानंतर प्रेमानंदांनी ईश्वराचा आणि चमत्कारांचा शोध घेणे सोडून दिले. योग्यांसारखी अलौकिक व चमत्कार करण्याची शक्ति प्राप्त करण्यासाठी घराबाहेर पडलेल्या प्रेमानंदांनी योगी व त्यांच्या तथाकथित चमत्कारांमागचे गूढ उकलण्याचा, सत्य जाणून घेण्याचा मार्ग धरला. त्यांच्यामते चमत्कार (हातचलाखी, रासायनिक संयुगं वापरून, काही यांत्रिक उपकरणं वापरून किंवा मानवी शरीराबाबत लोकांना माहीत नसलेल्या काही गुणधर्मांचा वापर करून - अशा) चार मुख्य पद्धतीने करता येतात. कुठेही चमत्कार झाल्याचे समजताच प्रेमानंद त्याचा मागोवा घेत व चमत्कार करणारे भोंदू बाबाबुवा व त्यांची चालाखी उघड करीत असत. त्यांनी यावर भरपूर लिहिले आहे; अनेक चमत्कार स्वतः करून दाखविले आहेत आणि चमत्कार करून दाखवणारे अनेक कार्यकर्ते प्रशिक्षित केले आहेत. त्यांच्या या कामातील महत्वाचा भाग म्हणजे चमत्कार पाहून आश्चर्यचकित झालेल्या लोकांना त्यांच्यामागील वैज्ञानिक तथ्ये समजावून सांगायची व चमत्कारांचे खरे रूप उघड करायचे. त्यासाठी त्यांना अशा घटनांची प्रात्यक्षिके दाखवून त्यांचे स्पष्टीकरण देता येईल आणि धर्म, चमत्कार किंवा जादू आणि विज्ञान या विषयांवरील एक समृद्ध ग्रंथालय असेल असे एक संशोधनकेन्द्र उभारायचे होते. परंतु बुवाबाबांचे सारे चमत्कार करून दाखविणाऱ्या या बुद्धिवाद्याला त्यासाठी लागणारा पैसा हवेमधे हात फिरवून थोडाच मिळणार होता?

श्रीलंकेचे निरीश्वरवादी डॉ. अब्राहम कोवूर १९६९ साली 'चमत्कारांचा भांडाफोड' करण्याच्या मोहिमेवर भारतात आले होते. समाजसुधारणेच्या कार्याला वाहून घेतलेल्या अनेक तरुण कार्यकर्त्यांच्या मनावर त्यांच्या भाषणांचा प्रभाव पडला. त्यातूनच अंधश्रद्धा निर्मूलनाची चळवळही निर्माण झाली. त्यांच्या प्रभावामुळे प्रेमानंदांनी 'अध्यात्मिक बुवाबाजीचा पर्दाफाश' करण्याचा चंग बांधला आणि तेच त्यांचे जीवितकार्य झाले. अनेक जणांनी चमत्कार दाखवून भोळ्या गरीब लोकांना लुबाडणाऱ्या बाबाबुवांचे खरे रूप उघडे करण्याचा धडाका लावला. पण सत्यसाईबाबाच्या वाटेला जाण्याचे धाडस केवळ प्रेमानंदांनी दाखविले आणि त्यांच्याशी एकाकी झुंज देत राहिले. प्रेमानंदांनी या 'पावरफुल' बाबाविरुद्ध त्यांच्या आश्रमात ६/६/९३ रोजी झालेल्या सहा तरुण शिष्यांच्या हत्येविरुद्ध व 'सुवर्णनियंत्रण' कायद्याखाली कोर्टात खटला दाखल केला. या बाबांची सर्व दुष्कृत्ये प्रेमानंदांनी आपल्या 'स्केप्टिक' या मासिकातून लोकांसमोर मांडली.

कपटनिरोधक वैज्ञानिक देखरेखीखाली जो कोणी चमत्कार करून दाखवील त्याला डॉ. कोवूर यांनी एक लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले होते. कोवूर यांचे हे आव्हान प्रेमानंद आणि इतर समविचारी चळवळींनी कायम ठेवले आहे. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने ही रक्कम आता एकवीस लाखांवर नेली आहे. पण आव्हान स्वीकरण्यास कोणी धजत नाही. लोकांच्या मनातून अंधश्रद्धा नाहीशा करण्यासाठी आधी पिढ्यान्‌पिढ्या देव-धर्म-रूढी यांनी खुरटून टाकलेले त्यांचे मेंदू सुदृढ करायला हवेत, असे प्रेमानंदांचे स्पष्ट मत होते. त्यांच्यात स्वतःच्या बुद्धीने स्वतंत्र विचार करण्याची कुवत व ते विचार प्रकट करण्याचे धैर्य निर्माण करण्यासाठी बुद्धिवादी प्रेमानंद तीन दशके भारतभर हिंडले; हजारो खेडी आणि शहरे त्यांनी पालथी घातली; बाबा-बुवांच्या कपटकारवाया उघड केल्या आणि कार्यशाळा भरवून विज्ञान लोकांपर्यंत पोचविण्याचा व त्यांच्यात चिकित्सक वृत्ती रुजविण्याचा आटोकाट प्रयत्न केला. त्यांनी ४९ देशांना भेटी दिल्या. त्यांच्या या जीवनकार्याची दखल घेऊन 'नॅशनल कौन्सिल फॉर टेक्नॉलॉजी कम्युनिकेशन' या शासकीय संस्थेने त्यांना विद्यावेतन (फेलोशिप) दिले.

काही कार्यकर्ते सुरुवातीस बुद्धिप्रामाण्यवादी चळवळीत भाग घेऊन नंतर डाव्या राजकारणात शिरतात किंवा निसर्गोपचार, योग इत्यादींचा मार्ग अवलंबतात, त्याने बुद्धिवादी चळवळ कमकुवत होते असे प्रेमानंदांचे मत होते. काही अतिधार्मिक लोक तर 'सर्वच बुद्धिवादी अखेरीस देवावर विश्वास ठेवू लागतात', असा अपप्रचार सतत करीत असतात. प्रेमानंद मृत्युशय्येवर असताना त्यांच्याविषयीही अशाच अफवा पसरविण्यात आल्या. त्यांच्या कानावर ही गोष्ट त्यांच्या हितचिंतकांनी घातली त्या वेळेस ते ग्लानीमधे होते. परंतु अफवा कानी पडताच त्यांनी डोळे उघडून आपण शेवटच्या क्षणीही बुद्धीवादीच राहिलो आहोत हे दर्शविले, आणि हे जाहीर करण्यासाठी 'मृत्युशय्येवरील जबानी' (डेथबेड टेस्टिमनी) वर हस्ताक्षर केले व आंगठ्याचा ठसाही उमटविला. २० सप्टेंबर रोजी केलेली ही जबानी म्हणजे निरीश्वरवादाशी व बुद्धिवादाशी असलेल्या त्यांच्या जन्मभराच्या बांधिलकीचे प्रमाणपत्रच आहे.

असे असूनही इतरांच्या धर्मश्रद्धा बाळगण्याच्या अधिकाराचा त्यांनी कधीच अवमान केला नाही. श्रद्धा हा ज्याचा त्याचा वैयक्तिक प्रश्न आहे हे त्यांना मान्य होते.

त्यांच्यावर अनेक पारितोषिकांचा, सन्मानांचा आणि स्तुतिसुमनांचा वर्षावच झालेला होता. त्यांनी अनेक संस्था व संघ स्थापन केले, अनेक चळवळी व मोहिमा राबविल्या, अनेक लढे दिले. परंतु अखेरपर्यंत प्रेमानंद एक साधे, नम्र आणि निष्कांचन परंतु क्रियाशील व प्रेरणादायी कार्यकर्ताच राहिले. स्वतंत्र विचार करणं किंवा बुद्धिप्रामाण्यवादी असणं एवढंच प्रेमानंदांना पुरेसं नव्हतं. त्यांच्या दृष्टीने धर्म आणि धर्माचे ठेकेदार नाकारण्यासाठी व एक मानववादी-बुद्धिप्रामाण्यवादी समाज निर्माण करण्यासाठी माणसाला वास्तवाचे पुरेसे ज्ञान आणि भान असावे लागते. हे ज्ञान व भान सर्वसाधारण माणसांपर्यंत पोचविणे हेही स्वतः बुद्धिप्रामाण्यवादी असण्याइतके महत्त्वाचे आहे. त्यासाठी कार्यकर्त्यांनी प्रौढ व्यक्तींवर वेळ खर्ची न घालता, तरुणांकडे व मुलामुलींकडे वळायला हवे.

**- सुमन ओक**
sumanoak@hotmail.com
Ph. : 020-26802140

अभिनंदन

# कवितेचे झाड...

**मंगेश नारायणराव काळे**



**अगदी गेल्या साठ-सत्तर वर्षांतील मराठी कवितेचा विचार केला तरी हे लक्षात येईल की मर्ढेकरोत्तर मराठी नवकवितेचा वारसा ज्या काही थोड्या कवींनी समृद्ध केला आहे/करत आहेत, त्यात वसंत आबाजी डहाकेंचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. 'योगभ्रष्ट', 'शुभवर्तमान', 'शून:शेप' आणि ज्या कविता संग्रहाला आता साहित्य अकादमीने सन्मानित केले आहे तो 'चित्रलिपी'... असा एक एक मोठा विस्तार डहाक्यांच्या कवितेने व्यापलेला आहे. आणि या कवितेचा 'विशेष' म्हणजे ही कविता नेहमीच समकालीन, आजची कविता राहिली आहे.**

१.

'कवी-लेखक-कलावंत एखाद्या पुरस्काराने सन्मानित केला जातो तेव्हा नेमकं काय होत असतं?'

या प्रश्नाचा विचार करताना मला दोन शक्यता दिसून आलेल्या आहेत : एक म्हणजे काही पुरस्कार-सन्मान एखाद्या कवी-लेखक-कलावंताला मोठे करतात. तो लेखक चर्चेत येतो, त्याला तात्पुरती का होईना एक वेगळी ओळख मिळते. यात त्या पुरस्काराच्या-सन्मानाच्या वजनाइतके त्या कवी-लेखक-कलावंताचे वजन नाही असे गृहीतक आपण मनाशी ठरवलेले असते.

दुसरी शक्यता - काही पुरस्कार-सन्मान ज्या कवी-लेखक-कलावंताना मिळतात तेव्हा त्या पुरस्कारांचे वजन वाढते, महत्त्व वाढते.

परवा मराठीतले ज्येष्ठ कवी वसंत आबाजी डहाके यांना मिळालेला साहित्य अकादमीचा पुरस्कार या दुसऱ्या शक्यतेत बसणारा आहे. अशी वेळ आपल्या मराठी संस्कृतीत अपवादानेच येत असते किंवा तशी वेळ येण्याच्या शक्यता अत्यल्प असतात. अर्थात, तरीही या गोष्टीचे महत्त्व याचसाठी की आपल्या सगळ्यांचा चांगल्या व महत्त्वाच्या लेखनावर-कलाकृतीवर असलेला विश्वास टिकवून ठेवण्यास हातभार लागतो.

म्हणूनच वसंत आबाजी डहाके यांच्या कवितेचा सन्मान, मराठी कवितेसाठी, कवितेच्या वाचकांसाठी, त्यावर आस्था असणाऱ्यांसाठी महत्त्वाचा ठरतो. अर्थात, माझ्यासारख्यांना ही खंत वाटतच राहते की डहाकेंसारख्या महत्त्वाच्या कवी-लेखकांना या पुरस्कारासाठी-सन्मानासाठी आपल्या मराठी संस्कृतीने खूप वाट पहायला भाग पाडले आहे. अरूण कोलटकर या जागतिक दर्जाच्या कवीची उपेक्षा तर सगळ्याच मराठी कवितेच्या, संस्कृतीच्या नागरिकांना शरमेने खाली मान घालायला लावणारी आहे. त्यातल्या त्यात हेच समाधान की त्यांच्या मृत्यूनंतर का होईना साहित्य अकादमी पुरस्कार देण्याचा शहाणपणा दाखवला गेला. असो. देर आये दुरुस्त आये...

२.

मराठी कवितेचा पट, तिला असलेली सातशे-आठशे वर्षांची समृद्ध परंपरा, ही भारतातील कोणत्याही प्रादेशिक भाषेला हेवा वाटावी अशी गोष्ट आहे. मराठी कवितेच्या परंपरेत नेहमीच (वेगवेगळ्या कालखंडात का होईना) महत्त्वाच्या कवींनी आपली उपस्थिती दर्ज केली आहे.

अगदी गेल्या साठ-सत्तर वर्षांतील मराठी कवितेचा विचार केला तरी हे लक्षात येईल की मर्ढेकरोत्तर मराठी नवकवितेचा वारसा ज्या काही थोड्या कवींनी समृद्ध केला आहे/करत आहेत, त्यात वसंत आबाजी डहाकेंचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. 'योगभ्रष्ट', 'शुभवर्तमान', 'शून:शेप' आणि ज्या कविता संग्रहाला आता साहित्य अकादमीने सन्मानित केले आहे तो 'चित्रलिपी'... असा एक एक मोठा विस्तार डहाक्यांच्या कवितेने व्यापलेला आहे. आणि या कवितेचा 'विशेष' म्हणजे ही कविता नेहमीच समकालीन, आजची कविता राहिली आहे.

लघु-अनियतकालिकांच्या चळवळीतून पुढे आलेल्या(?) अरुण कोलटकर, दिलीप चित्रे, मनोहर ओक, तुलसी परब, नामदेव ढसाळ, प्रकाश जाधव इ. कवींनी मराठी कवितेचा चेहरा आमूलाग्र बदलवून टाकण्याचा प्रयत्न चालवलेला होता. अशा वेळी काही उथळ समीक्षकांनी, कवी, लेखकांनी या चळवळीला समांतर असलेल्या समकालीन महत्त्वाच्या कवींचे महत्त्व दुर्लक्षित केले होते... त्यातच भर म्हणजे नव्वदोत्तर कवी-समीक्षकांनी या कवींच्या महत्तेवर शिक्कामोर्तब केल्यामुळे वसंत आबाजी डहाके, विलास सारंग इ. यासारख्या 'मौजे'चे म्हणून ओळख लादल्या गेलेल्या कवींकडे दुर्लक्ष करणे अधिकच सोयीचे झाले होते. या सगळ्या पार्श्वभूमीवर वसंत आबाजी डहाकेंची कविता स्वत:चे स्वतंत्र अस्तित्व, ओळख टिकवून उभी होती/आहे, हे मला अधिक महत्त्वाचे वाटते. कविता कोणतीही असो, कुठल्याही प्रवाहातून आलेली असो तिचे मराठी कवितेच्या परंपरेतले योगदान महत्त्वाचे असते... मला वाटते या पुरस्काराने-सन्मानाने पुन्हा एकदा हेच अधोरेखित केले आहे.

३.

मराठी कवितेत खऱ्या अर्थाने सामाजिक कविता, राजकीय कविता फारशी लिहिली जात नाही असे नेहमीच म्हटले जाते. हिंदीतले ज्येष्ठ कवी चंद्रकात देवतालेंनीही एकदा चर्चेत हा प्रश्न उपस्थित केल्याचे मला आठवते. हे काहीसे खरेही आहे. आपल्याकडे हा 'स्वर' फार चलनात नाही. कदाचित मराठी कवितेच्या प्रवृत्तीत तो सहजपणे येत नसावा. पण मला वाटते भारतीय कवितेत स्वत:चे वेगळे स्थान निर्माण करू शकेल इतका मोठा, निश्चितच होता/आहे. मग तो नारायण सुर्वेंच्या कवितेत असेल, नामदेव ढसाळ, प्रकाश जाधव किंवा अलिकडे अरुण काळेच्याही कवितेत आहे. मात्र यात डहाकेंच्या कवितेतला 'सोशल व्हाईस' या सगळ्यांपेक्षा वेगळ्या जातकुळीचा, वेगळ्या पद्धतीचा आहे. या अंगाने डहाकेंच्या कवितेची चिकित्सा होणे गरजेचे आहे. या सगळ्या परंपरेत डहाकेंची कविता नेहमी तिच्या स्वरात बोलत आलेली आहे. तिच्या आवाजात आक्रोश, संताप, आवेश नसेलही; पण सामान्य माणसांची होणारी होरपळ, अगतिकता, जगण्यातली भयावहता याविषयी ती सातत्याने बोलत आलेली आहे. एका अर्थाने डहाकेंची कविता म्हणजे आजच्या सामान्य माणसाचे या सगळ्या कोलाहलाविषयीचे स्वगत आहे. त्यांच्या कवितेइतके जोरकस भाष्य त्यांच्या समकालीन कवींमध्ये अभावानेच आढळते. डहाक्यांचा कवितेचा स्वर वरवर सौम्य वाटत असला तरी नेमकेपणाने या सगळ्यांकडे बोट दाखवतो, बोल लावतो. ही कविता सातत्याने आजच्या जगण्याविषयी, भवतालाविषयी, सामाजिक-सांस्कृतिक-राजकीय घडामोडींविषयी स्पष्टपणे, नेमकेपणाने बोलत आलेली आहे. ती नेहमी 'आजची' कविता राहिली आहे.

डहाक्यांच्या चारही संग्रहाचा विचार नव्या-जुन्या समीक्षकांनी या दृष्टीने अधिक सूक्ष्मपणे करायला हवा. तसा काही एक प्रयत्न करावा म्हणून आम्ही 'खेळ'च्या वसंत आबाजी डहाके विशेषांकाचे प्रयोजन केले होते.

दुर्दैवाने मराठी समीक्षकांची उदासीनता (कालच्या नि आजच्याही) अनास्था यामुळे तो प्रयत्न पूर्णत: यशस्वी होऊ शकला नाही. असो. या पुरस्काराच्या-सन्मानाच्या निमित्ताने मराठी वाचकांचे, समीक्षकांचे लक्ष या कवितेकडे गेले, तिची खोलवर चिकित्सा झाली तर तिचे महत्त्व ठळकपणे अधोरेखित करता येईल. कोणत्याही चांगल्या महत्त्वाच्या कवितेचे यापेक्षा वेगळे काय मागणे असणार आहे?

४.

साहित्य अकादमीने पुरस्कार देऊन डहाकेंची कविता सन्मानित केलेली असली तरी कादंबरी, समीक्षा, चित्र, संपादन यामुळे व एक विचारवंत म्हणूनही डहाकेंची वेगळी ओळख आहेच.

या पार्श्वभूमीवर त्यांच्या 'कादंबरी'ची (जिच्याकडे बऱ्यापैकी दुर्लक्ष झाले) चिकित्सा करावी लागणार आहे. कवितेइतकीच त्यांची चित्रशैली स्वतंत्र आहे. परंतु जितका न्याय डहाकेंनी कवितेला दिला किंवा वाचकांनी, समीक्षकांनी दिला त्या प्रमाणात त्यांचे स्वत:चेही चित्रकलेकडे दुर्लक्ष झालेले दिसून येते. येत्या काळात डहाकेंकडून त्यांचा हा दुर्लक्षित राहिलेला 'विशेष' सगळ्यांच्या समोर येईल अशी अपेक्षा करायला काय हरकत आहे?

५.

मी या टिपणाचे शीर्षक 'कवितेचे झाड' असे दिले आहे. या मागे निश्चितच काहीएक धारणा आहे.

वसंत आबाजी डहाकेंची कविता, चित्रकला किंवा इतर लेखन आपल्याला समजून घ्यायचे असेल; त्याच्या जवळ जायचे असेल तर डहाकेंमधील कविवृत्ती समजून घेणे गरजेचे आहे. त्यांची एक कविता या सगळ्या संदर्भात एक विधान म्हणून पहाता येईल –

*झाड तोडायचे, कापायचे*
*लगदा करायचा, कागद बनवायचा*
*त्यावर लिहायचे, ते छापायचे*
*मग वाचायचे*

*एवढा खटाटोप कशासाठी?*
*सरळ*
*झाडच वाचावे!*

डहाकेंच्या कवितेचे हे सगळ्यात महत्त्वाचे सूत्र आहे, असे मला वाटते.

**– मंगेश नारायणराव काळे**
Mob. 9766594154

■

**लक्ष्मण उवाच**



**लक्ष्मण लोंढे**

# विश्वास ठेवायलाच हवा...

मागे एका स्पेशालिस्ट डॉक्टरांकडे गेलो होतो. अ‍ॅपॉइंटमेंट घेतलेली होती, पण त्या दिवशी डॉक्टरांकडे पेशंट्सची बरीच गर्दी होती. त्यामुळे वेळ लागणार होता. अशा ठिकाणी मी बरेच वेळा वाचायला काही ना काही तरी घेऊन जातो. त्या दिवशी नेमकं विसरलो होतो. हरकत नाही, कित्येक वेळा तर मी माणसं न्याहाळण्यातही बराच वेळ घालवू शकतो. (तरुणपणच्या सवयी तशा सहजासहजी जात नाही म्हणतात!) पण रस्त्यावरचे, बागेतले चेहरे पाहणं निराळं आणि पेशंटांना पाहणं निराळं. कारण सर्वच पेशंटच्या चेहऱ्यांवर एक वैतागल्याचा, त्रासल्याचा भाव असतो आणि तो फारसा पाहण्यासारखा नसतो. सगळ्या डॉक्टरांच्या दवाखान्यात असतात तशी तिथेही जुनीपानी, फाटकी, धूळ बसलेली मासिकं कोपऱ्यात ठेवलेली होती. पण मी आधीच छातीच्या रोगाच्या प्रादुर्भावानं आजारी होतो, त्यामुळे त्या ढिगात हात घालण्याचा धीर झाला नाही.

मी रूमच्या भिंतीवर नजर फिरविली. एका भिंतीवर डॉक्टरांनी एका बोधवाक्याचा स्टिकर लावलेला होता. 'तुझ्याशी मी सभ्यपणाने वागतो याचं कारण तू सभ्य आहेस हे नाही, तर मी सभ्य आहे हे आहे. मी सभ्य असल्यामुळे मला सभ्यपणाशिवाय निराळे वागताच येणार नाही.'

मनात विचार आला, अशा प्रकारच्या बोधवाक्यांवर विश्वास ठेवायचंही एक वय असतं. त्यावेळी मनाच्या श्लोकातल्या, 'बरे सत्य बोला, यथा तथ्य चाला। बहु मानिती लोक येणे तुम्हाला।।' अशा वचनांवर विश्वास ठेवायला घरच्या वडीलधाऱ्या मंडळींनी सांगितलेलं असतं. आणि आपण तसा भाबडा विश्वास ठेवलेलाही असतो. पण जसजसं वय मोठं होतं, जगाचे व्यवहार कसे चालतात याची ओळख होते, तसतसे आपल्या सरळ वागण्याची लोक आपल्या तोंडावर स्तुती करीत असले तरी पाठीमागे आपल्याला बावळट समजतात असं आपल्याला जाणवू लागतं आणि अशा उपदेशावरचा विश्वास उघड्या डिशमध्ये ठेवलेल्या स्पिरिटप्रमाने पटकन उडून जातो. आपण या विश्वास उडण्याला 'व्यवहार ज्ञान' हे गोंडस नाव देतो. नीतितत्त्व म्हणून ठीक आहे हो, पण जगात वावरायचं म्हणजे थोडं इकडेतिकडे करावंच लागतं, असं आपण स्वत:ला आणि प्रसंगी इतरांनाही पटवून देऊ लागलो. आणि मग 'इकडे तिकडे' करण्यामुळे मनाला लागलेली बोच कमी होते.

आजकाल तर सच्चारित्र्यावरचा विश्वास पार उडावा असा काळ आला आहे. रोज इतके आर्थिक गैरव्यवहार उघडकीस येताहेत की आता या बातम्यांनी आपलं मन विचलितही होत नाही आणि आर्थिक घोटाळ्यांची रक्कमही आजकाल अगदी गगनाला भिडू पहात आहे. एकेकाळी काही लाखाच्या गैरव्यवहाराची बातमी डोळे विस्फारून आणि श्वास रोखून वाचली जायची. आजकाल काही लाखांचा गैरव्यवहार करणाऱ्यांकडे आपण क्षमाशील नजरेनं पाहतो आणि तसे व्यवहार करणारी माणसं तर त्याला अगदी बच्चा समजतात. शिवाय एकेकाळी अशा गुन्ह्यांना शिक्षाही व्हायची म्हणे. आजकाल त्या गैरव्यवहारातली काही रक्कम खाऊन त्या केसेसमधून अपराध्याला सोडविण्यासाठी हुषार वकिलांची फौज तयार असते. पूर्वी सरकारची इन्कम टॅक्स, कस्टम्स यांसारखी काही ऑफिसेसच फक्त भ्रष्टाचाराविषयी बदनाम होती. आता न्यायालयांपासून शिक्षण क्षेत्रापर्यंत सगळ्या खात्यांमध्ये भ्रष्टाचार हा शिष्टाचार झालेला आहे. शाळा-कॉलेजेस काढण्यामागे पुढल्या पिढीला चांगलं शिक्षण मिळवून देणं हा जुना बुरसटलेला उद्देश कुठेच नसतो. तो लोकमान्यांच्या काळातला! आता शिक्षणसंस्था स्थापन करण्याचा उद्देशच मुळी भरमसाठ कॅपिटेशन फी गोळा करणं हा असतो. आमचे एक पोलीस खात्यातले मित्र म्हणतात, सरकारनं पोलिसांच्या गणवेशाचा रंग काय निवडलाय? तो रंगच जणू त्यांना शिकवण देतो, 'खा की' आणि यंदाच्या निवडणुकीनंतर तर काय, जास्तीत जास्त भ्रष्टाचाराचं खातं आपल्याला

**उमरावाच्या मनात एक कल्पना आली. ''अरे, हे वास्तविक त्याचं शिकायचं वय आहे. आपण असं करू या, तू तुझ्या मुलाला माझ्याबरोबर पाठव. मी त्याच्या साऱ्या शिक्षणाचा खर्च करीन. माझा मुलगा ज्या चांगल्या शाळा-कॉलेजात जाईल, त्याच शाळा-कॉलेजात मी तुझ्या मुलालाही घालीन. तो चांगला निघाला तर तुझ्या कुळाचं नाव काढेल. मलाही माझ्या मुलाचा जीव वाचविणाऱ्यासाठी मी काहीतरी केलं याचं समाधान मिळेल.''**

मिळावं यासाठी मंत्र्यांमध्ये खुल्लमखुल्ला झालेल्या निर्लज्ज हाणामाऱ्या आपण पाहिल्या आहेत. शासनाच्या सर्वोच्चपदी विराजमान होणाऱ्या या लोकप्रतिनिधींची ही पातळी आहे, तर आता समाज रसातळाला जायला कितीसा उशीर लागणार? जन्माला येणाऱ्या नव्या पिढीला कोणत्या तोंडानं मनाचे श्लोक आणि भर्तृहरीची नीतिशतकं आपण शिकविणार आहोत?... की ही पुस्तकं आता निरुपयोगी म्हणून रद्दीत टाकून द्यायची?

अशा काहीशा नकारात्मक विचारांचं ओझं मनावर घेऊनच त्या दिवशी घरी आलो. रात्री झोपण्यापूर्वी नेहमीसारखा कॉम्प्युटर लावला, इंटरनेट लावलं. दिवसभरात मला एकही मेल आलेली नसली तरी मी नाराज होतो. सहसा असं होत नाही, दोनचार तरी मेल आलेल्या असतातच. कधी मुंबईतल्या मित्रांकडून, कधी मुंबईबाहेरच्या, तर कधी अगदी देश-विदेशांतूनही या मेल्स येत असतात. इतक्या लोकांनी आज आठवण काढली, इतक्या लोकांना आपल्याशी बोलावंसं वाटलं असं जाणवून समाधान वाटतं. त्या दिवशीही माझी निराशा झाली नाही. एकच पण चांगली लांबलचक मेल होती. एका मैत्रिणीची मेल होती. ही माझी मैत्रीण मला नेहमी चांगल्या मेल पाठवते. आजच्या मेलमध्ये तिनं इतिहासात घडलेल्या एका प्रसंगाचं वर्णन केलं होतं. मेल अशी होती....

'असंही घडतं, विश्वास ठेवा...

ही फ्लेमिंग या नावाच्या एका गरीब स्कॉटिश शेतकऱ्याच्या जीवनात घडलेली सत्य घटना आहे. एकदा तो आपल्या शेतात राबत होता. शेत लहानसंच होतं आणि शेताच्या एका बांधापलीकडे खूप चिखल, दलदल होती. काम करता करता त्याला त्या दलदलीतून कोणाच्या तरी कण्हण्याचा आवाज आला. आवाज क्षीण आणि अस्पष्टसा होता. उघडच होतं, दलदलीत अडकलेली व्यक्ती बराच काळ त्या दलदलीत, चिखलात रुतलेली होती. तो आवाजाच्या दिशेने धावला. दलदलीत जवळजवळ गळ्यापर्यंत रुतलेला एक तरुण मुलगा मदतीची याचना करीत होता. तो चिखलातून जितका जितका बाहेर पडण्याचा प्रयत्न करीत होता, तितका तितका अधिकच आत रुतत होता. त्याच्या चेहऱ्यावर मृत्यूची भीती अगदी स्पष्ट दिसत होती. फ्लेमिंगने त्या मुलाला धीर दिला आणि स्वत: चिखलात शिरून काळजीपूर्वक बाहेर काढलं. आणखी काही वेळ तो मुलगा तसाच धडपडत राहिला असता तर स्वत:च्या हातानं त्यानं आपलं मरण ओढवून घेतलं असतं. फ्लेमिंगनं त्या मुलाला घरी नेलं. न्हाऊ घातलं, आपल्या मुलाचे जुने कपडे त्याला दिले. मुलगा आता खूपच सावरला होता, त्यानं फ्लेमिंगचे आभार मानले आणि तो एकटाच आपल्या घरी गेला.

दुसऱ्या दिवशी सकाळी नाश्ता उरकून फ्लेमिंग शेतावर जायला निघत होता, एवढ्यात त्याच्या घरापाशी एका श्रीमंत उमरावाचा टांगा आला. टांग्यातून एक रुबाबदार, झकपक कपडे केलेली व्यक्ती उतरली आणि फ्लेमिंगला कुर्निसात करीत म्हणाली, ''काल तुम्ही ज्या मुलाचं जीवन वाचवलंत त्या मुलाचा मी बाप. आपण केलेल्या सत्कृत्याबद्दल मी आपला ऋणी आहे. मला आपल्याला काहीतरी बक्षीस द्यायची इच्छा आहे. किती रक्कम देऊ, तुम्हीच सांगा.''

''मला काहीही नको, बक्षिसाच्या आशेनं मी तुमच्या मुलाचे जीव वाचवला नाही. तो अडचणीत होता, त्याला वाचविणं माझं कर्तव्यच होतं. देवानंच तशी बुद्धी मला दिली.'' फ्लेमिंगने नम्रपणे पण ठामपणे नकार दिला. त्याच वेळी नेमका त्याचा मुलगा बाहेर काय चाललंय हे पहायला झोपडीबाहेर डोकावला. त्याच्याकडे बघून उमराव म्हणाला,

''हा कोण?''

''माझा मुलगा.''

''काय करतो तो?''

''मला शेतीच्या कामात मदत करतो.''

''शिकत नाही?'' उमरावानं विचारलं. फ्लेमिंगनं मान खाली घातली. उमरावाच्या मनात एक कल्पना आली. ''अरे, हे वास्तविक त्याचं शिकायचं वय आहे. आपण असं करू या, तू तुझ्या मुलाला माझ्याबरोबर पाठव. मी त्याच्या साऱ्या शिक्षणाचा खर्च करीन. माझा मुलगा ज्या चांगल्या शाळा-कॉलेजात जाईल, त्याच शाळा-कॉलेजात मी तुझ्या मुलालाही घालीन. तो चांगला निघाला तर तुझ्या कुळाचं नाव काढेल. मलाही माझ्या मुलाचा जीव वाचविणाऱ्यासाठी मी काहीतरी केलं याचं समाधान मिळेल.''

फ्लेमिंगनं आपल्या मुलाकडे पाहिलं. तो आनंदला होता. फ्लेमिंगनं उमरावाच्या प्रस्तावाला संमती दिली. उमराव फ्लेमिंगच्या मुलाला घेऊन गेला. त्यानं आपला शब्द पाळला. त्यानं आपल्या मुलासारखंच फ्लेमिंगच्या मुलालाही उत्कृष्ट शिक्षण दिलं. फ्लेमिंगचा मुलगाही सुदैवाने हुषार निघाला. कालांतरानं त्यानं लंडनच्या सुप्रसिद्ध सेंट मेरीज हॉस्पिटल मेडिकल स्कूलमधून वैद्यकीय पदवी घेतली. पुढे तो संशोधनात मग्न झाला आणि आज त्याला सारं जग पेनिसिलिनचा संशोधक सर अॅलेक्झांडर फ्लेमिंग या नावानं ओळखतं. उमरावाच्या ज्या मुलाला फ्लेमिंगनं वाचवलं होतं, तो मोठेपणी एकदा न्यूमोनियानं आजारी पडला. त्या काळी अत्यंत दुर्धर मानल्या गेलेल्या त्या रोगातून त्याला कोणत्या औषधानं वाचवलं असेल?... पेनिसिलिननं.

त्या उमरावाचं नाव होतं... लॉर्ड रँडॉल्फ चर्चिल. आणि त्याच्या मुलाचं नाव होतं, सर विन्स्टन चर्चिल! ज्यानं इंग्लंडला आणि पर्यायानं साऱ्या जगाला दुसऱ्या महायुद्धात हिटलरच्या विरुद्ध विजय मिळवून दिला.

मैत्रिणीनं पाठविलेली मेल वाचली आणि मी थरारून गेलो. मनात आलं, सद्‌विचारांवरचा, सत्प्रवृत्तींवरचा मानवतेचा विश्वास उडून चालणार नाही. जेव्हा आजूबाजूला सद्‌विचारांची, सत्प्रवृत्तींची पडझड होताना दिसत असते, तीच नेमकी वेळ त्यांच्यावर अढळ श्रद्धा ठेवायची असते.

**लक्ष्मण लोंढे**
laxmianlondhe 13@gmail.com
Phone : 022-24304007

**राम जगताप**

साधना शिफारस



# ‘अंतर्नाद’च्या संपादकाचे अंतरंग

भानू काळे हे गेली पंधरा वर्षे ‘अंतर्नाद’ या वाङ्मयीन मासिकाचे संपादक आहेत आणि मालकही! त्यांच्या ‘उच्चभ्रू कलिंगड’, ‘कॉम्रेड’ आणि ‘तिसरी चांदणी’ या तीन कादंबऱ्या पंचवीस वर्षांपूर्वी प्रकाशित झाल्या आहेत. तीन वर्षांपूर्वी ‘बदलता भारत’ हे ‘अंतर्नाद’मधील त्यांच्या लेखमालेचे पुस्तक प्रकाशित झाले आहे. आता त्यांचे ‘अंतरीचे धावे...’ हे ललित लेखनाचे पुस्तक प्रकाशित झाले आहे. या पुस्तकात एकूण ३२ लेख आहेत आणि सर्व लेख ‘अंतर्नाद’मधून पूर्वप्रकाशित झालेले आहेत. त्यात काही संपादकीय आहेत तर काही प्रासंगिक लेख. ‘अंतर्नाद’मधील अनेक संपादकीय चांगले ललित लेख झालेले आहेत.

‘अंतर्नाद’चे संपादक म्हणून त्यांची भूमिका, दृष्टिकोन आणि उलगाउलग करायला लावणाऱ्या समस्या- प्रश्न या पुस्तकात आल्या आहेत. त्यामुळे हे पुस्तक ‘बदलता भारत’च्याही आधी यायला हवे होते. ‘अंतर्नाद’ आणि ‘भानू काळे’ या दोहोंनाही समजून घेणे या पुस्तकामुळे सोपे जाणार आहे.

भावलेले विषय, मान्यवरांच्या भेटी-गाठी, प्रवासात आलेले अनुभव यावर भानू काळेंनी लिहिले आहे. शिवाय चौफेर प्रवास आणि उत्तम वाचन या गोष्टी ललित लेखनासाठी आवश्यक असतात, त्या त्यांच्याकडे आहेत. त्यांनी अनेक लेखांत वापरलेली अवतरणे (मराठी आणि इंग्रजीतील) आणि दिलेले संदर्भ यातून ते जाणवत राहते. प्रत्येक विषयाच्या अनेक बाजू समजून घेण्याचा त्यांचा प्रयत्न असतो, त्यामुळे काही लेखांना ललित वैचारिक असे स्वरूप आले आहे.

लेखन करताना भानू काळे अनेकदा सावध भूमिका घेऊन लिहितात. प्रत्येक विषय अगदी तोलून-मापून घेतल्यासारखा, पण ही त्यांची मर्यादा नसून सामर्थ्य आहे. त्यामुळे शब्दांचा सोस वा उधळमाधळ त्यांच्या कुठल्याही लेखात सहसा दिसत नाही. योग्य अवतरणे आणि संदर्भांची जोड देऊन ते लेख सजवतात. त्यामुळे या पुस्तकातला जवळपास प्रत्येक लेख वाचनीय झाला आहे.

‘जेआरडी टाटा’, ‘बाजारू संस्कृतीच्या विळख्यात’, ‘सलाम इंडिया टुडे’, ‘एक छोटुकले मोठे मासिक’, ‘असाही एक भारत भाग्य-विधाता’ आणि ‘सामाजिक कार्य’ हे या पुस्तकातले उत्तम लेख. ‘जेआरडी टाटा’ हा लेख आर.एम. लाला यांनी लिहिलेल्या पुस्तकाचा केवळ परिचय आहे, पण त्याची मांडणी मात्र चांगल्या ललित लेखाची आहे. ‘इंडिया टुडे’ या प्रसिद्ध (पाक्षिक आणि नंतर साप्ताहिक झालेल्या) नियतकालिकाविषयीचा लेखही असाच रंजक आहे. ‘एक छोटुकले मोठे मासिक’ हा ‘रिडर्स डायजेस्ट’ आणि त्याचे संस्थापक-संपादक डेविट वॉलास यांच्याविषयीचा लेख ‘रिडर्स’च्या वाचकांचे आणि त्याच्याविषयी आकर्षण असणाऱ्यांचे कुतूहल शमवणारा आहे. (दुर्दैवाची गोष्ट एवढीच, गेल्या काही महिन्यांपासून जगभर आलेल्या मंदीने हे मासिक बंद करण्याची वेळ त्याच्या चालकावर आलेली आहे.) ‘असाही एक भारत भाग्यविधाता’ हा लेख सर ऑर्थर थॉमस कॉटन या ब्रिटिश माणसाने भारतात पाणीप्रश्नाविषयी केवढे अवाढव्य काम केले आहे याची ओळख करून देणारा आहे. आपल्याला एल्फिन्स्टन, जॉन विल्सन, रुड्यार्ड किपलिंग, मोल्सवर्थ, मेजर कँडी, विल्यम कॅरे असे अनेक ब्रिटिश अधिकारी माहीत असतात, त्यांनी केलेले कामही बऱ्यापैकी माहीत असते. थॉमस कॉटन हा त्यांच्याच पंक्तीतला पण तुलनेने अपरिचित. ‘सामाजिक कार्या’विषयीच्या लेखाची मांडणीही चांगली झाली आहे; पण त्यातून कार्यकारणभाव समजण्यापलीकडे ठोस काही हाती लागत नाही.

जेफ्री आर्चर हा जगप्रसिद्ध लेखक पुण्यात आला असता त्याच्यासोबत घालवलेल्या काही तासांचे वर्णन ‘एक संध्याकाळ बेस्ट सेलरच्या सहवासात’ या लेखात केले आहे. आकर्षण, कुतूहल आणि प्रत्यक्ष अनुभव या तिन्हींचा मेळ जमल्याने हाही चांगला ललित लेख झाला आहे.




या सात लेखांव्यतिरिक्तचे बाकी जवळपास सर्वच लेख भानू काळे यांनी संपादकीये म्हणून लिहिलेले आहेत. त्यामुळे त्यांचे विषय प्रासंगिक आहेत. त्यातल्या काही लेखांची मांडणी भानू काळे यांनी चांगली केली आहे, पण त्यांनी काढलेले निष्कर्ष मात्र तितकेसे पटत नाहीत. पन्नासावा स्वातंत्र्यदिन, आनंदवन, शूल आणि अरुण भाटिया, नवी आध्यात्मिकता हे त्यापैकी काही लेख. तर ‘महात्मादेखील माणूस असतो’ आणि ‘आनंदवन’ या लेखांची शीर्षके आकर्षक आहेत, पण तशी लेखांची मांडणी नाही. गांधीजींविषयीचा लेख एका मूळ गुजरातीत लिहिलेल्या पण मराठीत अनुवादित झालेल्या कादंबरीचा परिचय आहे, पण कुठल्याही कादंबरीविषयी लिहिताना ठोस आणि व्यापक स्वरूपाचे विधान करता येणे अवघड असते, हे अवधान हा लेख लिहिताना विसरले गेले असे वाटते. ‘आपण आणि ते’, ‘फुकाचे मुखी’, ‘ब्राह्मण नाही, हिंदूही नाही’ हे तीन लेख वगळायला हवे होते आणि ‘अंतर्नादची दशकपूर्ती’ या लेखाचे थोडेसे पुनर्लेखन करावयास हवे होते, असे वाटते. ‘दोन अनुभव-शारदेच्या उपासकांसाठी’ आणि ‘जगण्याचे बळ वाढवणारा श्वास’ या लेखांना पुस्तकरूप का दिले असा प्रश्न पडतो. एकूण आशय व विषय पाहता ‘अंतरिचे धावे’ हे पुस्तकाचे नाव समर्पक आहे.

**अंतरीचे धावे : भानू काळे**

मौज प्रकाशन गृह, मुंबई, पाने : २३३, किंमत २०० रुपये.

साधना शिफारस

# आदिवासींच्या वाटेवर प्रकाश

'बाबा आमटे यांचे चिरंजीव' ही प्रकाश आमटे यांची ओळख मागे पडून हेमलकशाच्या 'लोकबिरादरी प्रकल्पा'चे संस्थापक-संवर्धक अशी नवी ओळख निर्माण झाली आहे. आपल्या स्वतंत्र वाटचालीची कहाणी सांगणारे 'प्रकाशवाटा' हे त्यांचे आत्मकथनात्मक पुस्तक अलीकडेच प्रकाशित झाले. एप्रिल ते नोव्हेंबर या आठ महिन्यात या पुस्तकाच्या तब्बल नऊ आवृत्त्या प्रकाशित झाल्या आहेत. 'समकालीन प्रकाशना'च्या या पुस्तकाचे शब्दांकन सीमा भानू यांनी तर संपादन सुहास कुलकर्णी यांनी केले आहे.

भामरागड हा चंद्रपूर जिल्ह्यातला अतिशय दुर्गम आणि पूर्णपणे जंगलाने व्यापलेला भाग. सगळीकडे घनदाट जंगल. अवाढव्य वाढलेलं. त्यातून सूर्यप्रकाशही धड आत शिरकाव करू शकत नसे. साप आणि विंचू यांचं अस्तित्व पावलापावलावर. या जंगलात रहात होते, ते फक्त प्राणी आणि माडिया गोंड ही आदिवासी जमात. वीज, पाणी आणि निवारा या तिन्ही मूलभूत गोष्टींचा अभाव असलेल्या या ठिकाणी खरं तर कुठलाच प्रकल्प उभा राहू शकत नव्हता. पण बाबा आमटे यांनी १९७० च्या आसपास याच ठिकाणी एक प्रकल्प उभा करायचे ठरवले. पण हा संकल्प करणाऱ्या बाबांचे वय त्यावेळी होते ५६, तर नुकतेच वैद्यकीय शिक्षण पूर्ण केलेल्या प्रकाश आमटे यांचे वय होते २२ वर्षे.

अक्षरश: शून्यातून विश्व निर्माण करण्यासारखे हे काम होते. पण बाबा आमटे, आनंदवनची भक्कम साथ, काही खंदे कार्यकर्ते आणि डॉक्टर असलेली पत्नी मंदा यांच्या बळावर प्रकाश आमटे यांनी ही जबाबदारी स्वीकारली; पेलली आणि त्यात ते यशस्वीही झाले. गेल्या २५-३० वर्षांत त्यांनी हेमलकशाचा कायापालट करून टाकला आहे. 'ट्रायल अँड एरर' पद्धतीने सुरू झालेल्या त्यांच्या प्रयोगाने माडिया गोंड या आदिवासी जमातीला जगण्याच्या मुख्य प्रवाहाच्या वाटेवर आणून सोडण्याचे काम केले आहे. त्यामुळे हे पुस्तक केवळ प्रकाश व मंदा आमटे यांच्या वाटचालीचे नसून, या आदिवासी जमातीचेही आहे.

एकूण १५६ पानांच्या या पुस्तकात १५ प्रकरणे आहेत. त्यातील कसोटीचे प्रसंग, विस्तारती वैद्यकीय सेवा, शाळेची सुरुवात, अनोखे प्रयोग आणि प्राण्यांचे गोकुळ ही पाच प्रकरणे पुस्तकाचा गाभा आहे. इतर प्रकरणे या प्रयोगाची पार्श्वभूमी, काही वैयक्तिक अनुभव आणि समाजमान्यता मिळाल्यानंतरचा प्रवास सांगणारी आहेत. प्रकाश आमटे यांनी आरोग्य, शिक्षण आणि शेती या तीन पायाभूत क्षेत्रांत तसेच आदिवासी आणि हिंस्र प्राण्यांसोबत सहजीवनाचेही अनेक प्रयोग केले आहेत. आदिवासींनुसार स्वत:ची जीवनशैली बदलणे, त्यांच्या सोयीसाठी स्वत:त बदल करत जाणे, अडी-अडचणी-संकटे यांतून आपल्या परीने मार्ग काढत राहणे आणि सतत नवनव्या गोष्टी शिकण्याचा कंटाळा न करणे, हे या पुस्तकातील प्रत्येक प्रकरणांतून प्रकर्षाने प्रत्ययास येते. या गोष्टी प्रेरणादायी तर नक्कीच आहेत, पण असे काम करताना कोणती पथ्ये पाळायची असतात, काय टाळायचे असते यासाठी मार्गदर्शकही आहेत. अशा प्रकारच्या कामांना सुरुवातीच्या काळात समाजाकडून मान्यता मिळत नाही. किंबहुना ज्यांच्यासाठी काम केले जाते त्यांचेही पुरेसे सहकार्य मिळत नाही. शिवाय स्वत:चा अनुभवही कधी कधी तोकडा पडतो. त्याविषयी त्यांनी अतिशय प्रांजळपणे लिहिले आहे. स्वत:च्या चुकाही कबूल केल्या आहेत, आणि यशाच्या हकीकती सांगताना कुठेही भाषेचा फुलोरा आणि शब्दांच्या अवडंबराचा आधार घेतलेला नाही. अतिशय संयत आणि साध्या-सोप्या भाषेत त्यांनी निवेदन केले आहे. हे या पुस्तकाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे आणि त्याच्या यशामागचे मुख्य कारणही! प्रकाश आमटे यांना साधा डॉक्टर, दंतरोगतज्ज्ञ, अस्थिरोग तज्ज्ञ, नेत्ररोगतज्ज्ञ, स्त्रीरोग तज्ज्ञ अशा अनेक भूमिका निभवाव्या लागल्या. त्या ते निभावतातही, पण त्यांच्याही पुढे दोन पावले असा हा प्रवास आहे.

आदिवासींना त्यांची मुले शाळेत पाठवण्यास राजी करण्यापासून ते त्यांच्या माडिया भाषेत अ-अहिरीचा, आ-आरीचा असा अभ्यासक्रम तयार करण्यापर्यंत अनेक व्यवधाने त्यांना सांभाळावी लागली. आधी माडियातून आणि नंतर प्रमाण मराठीतून अशा पद्धतीने शिकवावे लागले. त्यातून आरती, दादा पांचाळ, विलास मनोहर या त्यांच्या सहकाऱ्यांनी 'माडिया-मराठी शब्दकोश' तयार केला. १९७६ साली शाळेला सुरुवात झाली, तेव्हा २५ मुले शाळेत दाखल झाले. त्यानंतरच्या मुलांपैकी काही हेमलकशातच शिक्षक, काही फॉरेस्ट गार्ड तर काही वकील झाले.




आदिवासींचा विश्वास बऱ्यापैकी संपादन केल्यानंतर प्रकाश आमटे यांना 'न्यायाधीशा'चीही भूमिका करावी लागली. तीही त्यांनी कौशल्याने केली, पण अजूनही आपले काम संपले असे त्यांना वाटत नाही. कुणी बाहेरून येऊन मदत करण्याची गरज भासणार नाही, इतके हे आदिवासी स्वयंपूर्ण व्हावेत अशी त्यांची इच्छा आहे.

दिगंत आणि अनिकेत आमटे ही तिसरी पिढी आता हेमलकशाची जबाबदारी सांभाळत आहे. फिलीप जॉर्ज, विलास मनोहर, दादा पांचाळ अशा अनेकांची आपल्या उत्तम पगाराच्या नोकऱ्या सोडून प्रकाश आमटेंसोबत आनंदाने आणि खुशीने काम केले. हे पुस्तक वाचून आपणही असे शिलेदार व्हावे, अशी प्रेरणा काहींना तरी निश्चित मिळू शकेल!

**राम जगताप**
jagtap.ram@gmail.com
Mob.: 9930360424

**प्रकाशवाटा : प्रकाश आमटे**
समकालीन प्रकाशन, पुणे, पाने : १५६, किंमत : २०० रुपये.

अनुभव

# चित्रे...

नववी, दहावी आणि त्याच्या आसपासची वर्ष जरा वेगळी असतात. मुलांना करिअरची चिंता लागलेली असते. त्याहून जास्त ती पालकांना असते. मुलं बदलत असतात, त्यांचा स्पेक्ट्रम रूंदावत असतो. अशा वातावरणात आणखी एक महत्त्वाची गोष्ट घडते– मुलं बंडखोर बनायचा प्रयत्न करतात. आपली आयडेंटिटी शोधण्याचा प्रयत्न करतात आणि प्रस्थापित बाबींना धिक्कारण्यासाठी काहीही करतात.

माझ्या आजूबाजूचे वातावरण आस्तिक, श्रद्धाळू असल्याने मी बंडखोर(!) बनावे तर नास्तिक असणे स्वाभाविक होते. मग देवळासमोर जाऊन पण आत न जाणं, 'देव काय कामाचा' अशांसारख्या सिली पण सो कॉल्ड बंडखोर गोष्टी करायचो. दहावीमध्ये तर जास्तच. मराठी या विषयाची पुस्तकं (अभ्यासक्रमातली) चांगली असू शकतात, हा दहावीत आल्यानंतर बसलेला एक धक्का होता. ते पुस्तक नुसतंच चांगलं नव्हतं तर वाचनीय पण होतं, आणि महत्त्वाचं म्हणजे 'बोरिंग' नव्हतं.

'कोसला', 'मधुकर'सारख्या पुस्तकांतून घेतलेले पॅसेज; आरती प्रभू, केशव मेश्राम, मर्ढेकर, इंदिरा संत इत्यादींच्या कविता. पण सर्वांत जास्त आवडलेल्या दोन कविता– 'देवा, ह्याही देशात पाऊस पाड' आणि 'झाड झाड मुके'. कवी अनुक्रमे दि.पु.चित्रे आणि चंद्रकांत पाटील.

'देवा ह्याही देशात पाऊस पाड' ही कविता तर भन्नाट. देव न मानणं ही आमची तेव्हाची फॅशन. आणि हा कवी तर देवाकडेच काहीतरी मागतोय. अभ्यासासाठी आणि मोअर दॅन दॅट मार्कांसाठी ती कविता अभ्यासलीच पाहिजे. मग पूर्व व मुख्य परीक्षा, तीन महिन्यांची सुट्टी असं करत करत दहावी सरली. अकरावीचे पहिले तीन महिने पण संपले. डोक्यात वेगळाच गुंता होता. आधीचा खुळेपणा हरवला होता.

मामाकडे एका दुपारी त्यांची पुस्तकांची लिस्ट करताना एकूण कविता– १, आणि एकूण कविता २, चतुरंग, ही तीन पुस्तके दिसली. बाकीची मजा तर होतीच, पण त्या दुपारी दि.पु.चित्रे नावाची नव्याने ओळख झाली. मग 'चतुरंग' तीन वेळा वाचणे इत्यादी बाबी झाल्या. १५ डिसेंबर २००७ रोजी 'मर्ढेकरांच्या कादंबऱ्या' घ्यायला गेलो असताना 'एकूण कविता ३' दिसले. घेण्यासाठी पैसे तर जवळ नव्हतेच, मनात मात्र होते की हे घ्यायचे आहे.

पुन्हा दोन महिने गेले. ११ फेब्रुवारी २००८ रोजी पुस्तक घ्यायला बाहेर पडलो. वॉल्ट व्हिटमन, निस्सीम एझिकिएल यांच्या साहित्य अकादमीने प्रकाशित केलेल्या कविता घेतल्या. व्हॉट अबाऊट चित्रे? दादरहून आम्ही डोंबिवलीला आलो. तिथे 'एकूण कविता २', 'मर्ढेकरांची कविता' घेतले. मी विकत घेतलेले पहिले पुस्तक चित्रेंचे.

मध्यमवर्गाला साधारणत: ऑपरच्युनिस्टीक म्हटले जाते. ते म्हणे इंटेलेक्चुअल्स म्हणून ते कोणाचे भक्त असणं हे सहसा घडत नाही. मी मध्यमवर्गीय घरातला असूनही, चित्रेंवर भक्ती करायला लागलो होतो. त्यांचं मिळेल ते वाचण्याचा प्रयत्न होता.

जुलैमध्ये मी अस्सल पुस्तकप्रेमी असल्याचे दाखवून दिले– मी लायब्ररीमधून 'एकूण कविता – १' ढापले(!) त्याच्या ब्लर्बवर विंदांनी लिहिलेले 'एक दिलीप चित्रे हा मराठी भाग्ययोग, पण दहा दिलीच चित्रे ही मात्र महाभयंकर गोष्ट ठरेल'. ऑगस्टमध्ये 'पुन्हा तुकाराम' घेतले आणि पूर्ण वाचले! कारण 'एकूण कविता १' आणि 'एकूण कविता २' एका मर्यादेनंतर मला समजतही नव्हती. ९ सप्टेंबर २००९ रोजी 'एकूण कविता ३' घेतले. २१ सप्टेंबर २००९ रोजी 'साहित्य आणि अस्तित्वभान– १' घेतले. त्या पुस्तकाला असलेली प्रा.प्रभाकर बागलेंची प्रस्तावना. ते पुस्तक मला फेब्रुवारी २००९ पर्यंत पुरले. परत परत वाचत होतो.

चित्रेंची पुस्तकं नुसती दिसली तरी ती हातात घेऊन काहीतरी वाचण्याचा मोह व्हायचा. शेवटी बारावीची परीक्षा आहे, या कारणावरून मी ती पुस्तकं एका अनरिचेबल अशा (पण मला माहीत असलेल्या!) जागी ठेवली.

त्यानंतर वाचू या, वाचू या करीत राहिलो. ऑक्टोबर २००८ मध्ये आलेली त्यांची रविवार टाईम्समधील मुलाखत 'कविता स्वत:तच मोठी किंवा लहान असते' जपून ठेवली आहे आणि आता बातमी– चित्रे गेले.

प्रचंड ऑल राऊंडर असे हे व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले. त्यांचे टीकाकार, समर्थक, समीक्षक जे काय करतील ते करू देत. आम्ही मनात त्यांची पूजा बांधत होतो. ते गेले. आता त्यांना प्रत्यक्ष भेटणे शक्य नाही. पण साध्या, सरळ कविता समजल्या म्हणून कधी हवेत गेलो तर जमिनीवर आणण्याचे काम चित्रेंच्या कविता करतात. अशा प्रकारची कविता पण असते ही जाणीव निर्माण करण्याचे काम चित्रेंच्या कविता करतात. स्वत:चा क्षुद्रपणा जाणवून देण्याचे काम चित्रेंच्या कविता करतात. मराठी भाषेला समृद्ध करण्याचे काम चित्रेंच्या कविता करतात.

'एकूण कविता ३' या पुस्तकातील पहिलीच कविता आहे 'मला आस होती नभे धुंडण्याची'. चित्रेच्या कवितातील 'नभ' शोधणे हीच आता आम्हाला पण लागलेली आस आहे.

**संकल्प गुर्जर** (F.Y.B.A.)
फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे, Mob. : 9867238314

## आग्रह चुकीचा, पण टीका सद्हेतूने!

बाबा भांड हे मराठी विश्वातले एक सुजाण साहित्यिक आणि उत्तम प्रकाशक आहेत. त्यांनी 'साधना' : बालकुमार दिवाळी अंकातील दासू वैद्य यांच्या 'गावात एक पत्र आलं' या चांगल्या कथेवर विकृत चित्रणाचा आरोप करावा हे विचित्र वाटले. (संदर्भ : साधना : १२ डिसेंबर २००९).

सामाजिक संघटनांबरोबर मी ग्रामीण भागात थोडाफार हिंडलोय. दासू वैद्य यांनी समाजाचं जे वर्णन केलंय ते अवास्तव आहे असं मला तरी वाटत नाही. आपलं दारिद्रय, स्वच्छतेबाबतची बेपर्वाई, अंधश्रद्धा, अडाणीपण लपवून ठेवायची वृत्ती अनेकांत आढळते. ही वृत्ती समाजसुधारणेच्या कामात अडथळे निर्माण करते. मागे नर्गिस दत्त यांनी संसदेत निवेदन करून सत्यजित रायचे चित्रपट परदेशी प्रदिर्शत करायला विरोध केला होता. देशाच्या दारिद्रयाचे प्रदर्शन परदेशी लोकांसमोर होता कामा नये, असं नर्गिसबाईंचं म्हणणं होतं. बाबा भांड यांचं पत्र वाचताना मला त्या घटनेची आठवण झाली.

सद्य वास्तव मुलांसमोर यायलाच पाहिजे. चांगलं कोणतं, गैर कोणतं याची जाण अनेक मुलांपाशी असते. आणि नसेल तर तशी शिकवण त्यांना स्वतंत्रपणे दिली जावी. त्यासाठी साहित्यात कोणत्याही स्वरूपाची लपवाछपवी करायची गरज नाही. बाहेरील वास्तव सर्जनशीलपणे वाङ्मयातून परिणामकारकपणे मांडणं, हे साहित्यिकांचं प्रथम कर्तव्य आहे. बाबा भांड हे स्वत: आपल्या साहित्यातून आणि प्रकाशनांतून असे करीत आले आहेत. आमच्यासारख्यांना त्यांच्याविषयी वाटणारा आदर त्यातूनच जन्माला आला आहे.

दासूंच्या लेखनातील तपशीलात किरकोळ दोष असतील; काही ठिकाणी अतिशयोक्तीही असेल; मान्य... पण त्यांची भूमिका प्रामाणिक आहे, ग्रामीण सांस्कृतिक परिसर त्यांना जसा दिसतोय तसा मुलांसमोर मांडण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. बाबा भांड यांनी बदललेली खेडी पाहिली असतील. आमच्या नजरेला काही ती पडलेली नाहीत. ग्रामीण भागांइतकाच अडाणीपणा आज शहरात आहे. आणि दिवसेंदिवस तो वाढतो आहे. सत्यसाईबाबा थेट मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी मुक्काम करू लागलेत, तथाकथित सुशिक्षित समाजातले हे भीषण शैक्षणिक-सांस्कृतिक दारिद्रय आज विद्यार्थ्यांसमोर कोणीतरी ठेवायला पाहिजे.

असो... या पार्श्वभूमीवर बाबा भांड यांचा आग्रह मला चुकीचा वाटला. मात्र दासू वैद्य यांच्या लेखनावर त्यांनी केलेली टीका सद्हेतूने केली आहे हे मला जाणवलं. त्यांच्या आक्षेपासंदर्भात व्यक्त केलेल्या माझ्या या मतांतरामागील सद्हेतू ते लक्षात घेतील, अशी आशा करतो.

**- अवधूत परळकर, माहीम, मुंबई २६.**

## असत्य आणि अन्यायकारक विधान!

१४ नोव्हेंबर २००९ च्या 'साधना' अंकात डॉ.द.ना.धनागरे यांचा विद्यापीठातील अध्यासनांबाबत एक विचारप्रवर्तक लेख आहे. या लेखात मी लिहिलेल्या 'पुणे विद्यापीठाचा इतिहास' या पुस्तकाचा दोनदा संदर्भ दिलेला आहे. मात्र पुढे त्यांनी एक विधान केलेले आहे. ''आज कार्यरत असलेल्या ११ अध्यासनांपैकी, नामदेव अध्यासन सोडल्यास, कुठल्याही इतर अध्यासनांचा साधा नामोल्लेखसुद्धा पुणे विद्यापीठाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त १० फेब्रुवारी १९९९ रोजी प्रसिद्ध झालेल्या 'अधिकृत इतिहासा'त आढळत नाही याचे आश्चर्य वाटते.'' या विधानासंदर्भात प्रत्यक्ष वस्तुस्थिती मात्र वेगळी आहे. गंमत म्हणजे या विधानाच्या जेमतेम चार-पाच ओळी आधी स्वत: डॉ.धनागरे यांनीच लो.टिळक अध्यासनाबाबत माझ्या पुस्तकाचा संदर्भ दिलेला आहे! जिज्ञासू वाचकांनी कृपया माझ्या पुस्तकातील पृ.१०८, १२९, १३६, १५०, १५२, १५४, १५५ आणि १५६ वरील अध्यासनांचे उल्लेख पहावेत. नामदेव, ज्ञानेश्वर, टिळक, गांधी, सावरकर, हिराचंद नेमचंद, विखे पाटील अशा सात अध्यासनांचे हे नामोल्लेख पाहिले तर डॉ.धनागरे यांचे विधान असत्य आहे हे सिद्ध होते. त्यांनी हे हेतुपूर्वक केले असेल असे मला वाटत नाही, पण त्यांच्यासारख्या ज्येष्ठ व व्यासंगी

संशोधकाकडून माझ्यावर नकळत का होईना अन्याय झाला हे निश्चित! पुस्तक प्रकाशित झाल्यावर स्थापन झालेल्या अध्यासनांचा पुस्तकात नामोल्लेख करण्याइतका भविष्यदर्शी मी नाही, हेही नम्रपणे नमूद करतो.

**राजा दीक्षित, पुणे.**

## अध्यासनांचे फक्त नामोल्लेखच!

डॉ. राजा दीक्षितांनी 'मी असत्य आणि अन्यायकारक विधान केल्याचा' माझ्यावर आरोप केला आहे. त्यांनी त्यांच्या पुस्तकात वेगवेगळ्या पृष्ठांवर सात अध्यासनांचा (ज्ञानेश्वर, नामदेव, सावरकर, विखे पाटील, टिळक, म.गांधी, हिराचंद नेमचंद) फक्त उल्लेख केला आहे. आणि फार तर ती कोणत्या वर्षी/तारखांना स्थापन झाली किंवा त्यांचे उद्घाटन कोणी केले एवढाच तपशील दिला आहे. या सातपैकी दोन अध्यासनांच्या नामोल्लेखांची मी दखल घेतली होतीच, मात्र अध्यासनांच्या कामांचे स्वरूप कोणते? नेमलेल्या प्राध्यापकांची नावे, त्यांचे कार्य, अध्यासनांतर्गत केलेले संशोधन प्रकल्प, इतर उपक्रम, त्यासाठीचे निधीसंकलन, प्राध्यापकांच्या नेमणुकीपूर्वीची निवडप्रक्रिया, अध्यासनांच्या कामाचे ताळेबंद/अहवाल व्यवस्थापन परिषद आणि सिनेटसमोर ठेवले गेले होते किंवा नाही, अध्यासनांसाठी विद्यापीठाने स्वत:च्या निधीतून केलेली तरतूद, अध्यासने स्थापण्याबाबत अधिकारमंडळांमध्ये धोरणात्मक चर्चा झाली होती किंवा नाही, असे कुठलेच तपशील डॉ. दीक्षितांच्या पुस्तकात मिळत नाहीत, हे मला सुचवायचे होते. पण 'नामोल्लेखसुद्धा नाही' या माझ्या अभिप्रायाचा डॉ.दीक्षितांनी फारच शब्दश: अर्थ घेतला आहे असे दिसते. त्यांनी सात अध्यासनांचा 'नामोल्लेख' तेवढा केलाय हे मी मान्य करतो.

**– द. ना. धनागरे, पुणे.**

## शोधयात्रा : अपूर्ण समाधानाची वास्तवकथा!

संवेदनशील लेखक राजा शिरगुप्पे यांनी ग्रामीण महाराष्ट्राची सद्य:स्थिती समजून घेण्यासाठी केलेल्या दहा जिल्ह्यांमधील शोधयात्रेचा सविस्तर वृत्तांत 'साधना'च्या दिवाळी अंकात वाचला. हा वृत्तांत वाचताना राजा शिरगुप्पेंमधील लेखक-कलावंत हा तरल संवेदनशील पत्रकार असल्याचे जाणवत होते. परंतु माझ्यासारख्या युवा वाचकाला, ज्याने अजूनही संपूर्ण महाराष्ट्र जवळून पाहिला नाही त्याला, या शोधयात्रेमधून बरेच काही विषय हाती लागावेत अशी अपेक्षा होती. संपूर्ण वृत्तांत वाचून झाल्यावर मला मनापासून वाटले की, यातील जवळपास नव्वद टक्के चित्रण कोणत्याही एका जिल्ह्याला सहज लागू होईल. आज कोणताही एक जिल्हा डोळ्यांसमोर घेऊन त्या जिल्ह्यातील अतिदुर्गम भागातील व शहरातील शिक्षणाची तुलना, रस्ते, वीज, पाणी, आर्थिक उत्पन्न, रोजगार, विकासाचा असमतोल, जनतेची वाचन तथा सांस्कृतिक भूक यामध्ये प्रचंड तफावत जाणवतेच. ग्रामीण महाराष्ट्राचे चित्रण करताना अनेक मुद्द्यांना या वृत्तांतामध्ये स्पर्शही झालेला दिसत नाही.

मुळात महाराष्ट्राचा जो असमतोल विकास आज दिसतो आहे, तोच या वृत्तांताचा मुख्य गाभा आहे. हा असमतोल विकास का झाला, याची नेमकी कारणमीमांसा यात दिसत नाही. तसेच कोणत्या भागातील नेमके कोणते प्रश्न आज ऐरणीवर आहेत, ते कसे सोडविता येतील, यासाठी महाराष्ट्रातील सज्जन शक्तीने आज कोणते प्रयत्न करावयास हवेत, याचेही चित्र या शोधयात्रेतून समोर येत नाही. देशाचे, राज्याचे नाव माहीत असणे, स्वातंत्र्यदिन कधी येतो? भारत कुठे आहे? मुंबई बघितली का? जागतिकीकरण म्हणजे काय? महाराष्ट्राचा सुवर्णमहोत्सव माहीत आहे का? गुजरातमधील दंगल... मुंबईमधील बॉंबस्फोट... इत्यादींची माहिती रोजच्या जीवनमरणाची लढाई लढणाऱ्यांना माहीत ठेवण्याची आवश्यकता आहे का? (असेच काही प्रश्न : उत्तर देऊन पहा – संयुक्त महाराष्ट्रासाठी हुतात्मा झालेल्या १०६ व्यक्तींची नावे काय? महिला आपल्या कपाळावर कुंकू वर नि हळद खाली का लावतात?) माध्यमांमध्ये आपण काम करीत असल्याने आपणा सर्वांना हे प्रश्न माहीत असणे म्हणजे सामान्यज्ञान सजग असण्यासारखे आहे. पण ग्रामीण भागातील या व्यक्तींना जे माहीत आहे, त्याबाबतीत त्यांना बोलतं करणं हे खरं कौशल्य असतं. कारण त्यांच्याजवळ जी माहिती आहे, ती आपल्याजवळ नाही. उदा. गडचिरोली जिल्ह्यात झाडे, वने, त्यांच्याजवळची वनौषधी, शेतकऱ्यांनी पिढ्यान्‌पिढ्या जतन केलेले कृषितंत्रज्ञान, या बाबतीत आपण आजही अज्ञानी नाही का? आज त्या अर्थाने आपण सारेच कृषिनिरक्षर नाही का?

या शोधयात्रेतून कोणत्या जिल्ह्यात कोण कोण शिक्षणसम्राट आहेत, कोण कोण कसेकसे सहकारसम्राट आहेत? (जे चित्र बीड आणि बारामतीबाबत शिरगुप्पे यांनी चांगले दाखविले आहे.) आज महाराष्ट्राच्या विविध भागात शिक्षक, चपराशी ते बाबू यांचे नोकरीला लावण्याचे रेट काय आहेत? पश्चिम महाराष्ट्रातच मुलींचा जन्मदर कमी व विदर्भात का जास्त आहे? कोणत्या जिल्ह्यात कोणती जनआंदोलने उभी आहेत? कोणत्या भागात कुमारी मातांचे प्रश्न अजूनही

मोठ्या प्रमाणावर दिसतात? कोणत्या जिल्ह्यात कोणत्या लोकदेवतांच्या नावावर श्रद्धेचा बाजार भरतो? कोणकोणत्या जातीत, कोणत्या कोणत्या जिल्ह्यांत आजही किती हुंडा दिला जातो? पाणी अडविण्याचे चांगले प्रयोग कोणत्या जिल्ह्यात व चांगली माणसे अडविण्याचे राजकारण, समाजकारण कोणत्या जिल्ह्यात कसे व का चालते? विदर्भ-मराठवाड्यातील शेतकरी पॅकेजनंतरही आत्महत्या का करतो आहे? शेतकऱ्यांच्या चळवळीचे नेतृत्व का क्षीण झाले? ग्रामीण महाराष्ट्रातील युवकांच्या मनात आज काय खलबते शिजत आहेत? गावोगावी बँका, पतसंस्था, शिक्षणसंस्था राजकारणी नेत्यांनी हाताशी धरून एक नवी वेठबिगारांची फौज कशी तयार केली आहे? जनआंदोलनांवरून ग्रामीण भागातील जनतेचा विश्वास का उडत चालला आहे? ग्रामीण भागातील बोलीभाषा जतन करण्यासाठी कोण काय प्रयत्न करतो आहे? यासाठी काय केले पाहिजे? शहराचा-गावाचा विकास होतो म्हणजे खरंच या भागातील लोकांच्या चुलीवर सकस अन्न शिजते काय? यांच्या महिन्याच्या बजेटमध्ये दुधावर व आरोग्यावर किती खर्च असतो? पहिलीपासून इंग्रजी सुरू झाल्याने गळतीचे प्रमाण खरंच थांबले का? ग्रामीण भागातील आदिवासी आश्रमशाळांमध्ये कोवळ्या मुलींवर अत्याचार करणारे कोण आहेत? देशाचे, राज्याचे नियोजन चुकीचे ठरले म्हणजे काय व ते कसे असावे? यावरही काही भाष्य असावयास हवे होते. म्हणजे मला वाटते, ग्रामीण महाराष्ट्राचे महानगरीय वाचकांना खऱ्या अर्थाने वास्तव दर्शन झाले असते.

माझ्यासारख्या वाचकांनी यापूर्वी अनिल अवचट, ज्येष्ठ पत्रकार पी. साईनाथ, ‘बदलता भारत’ लिहिणारे भानू काळे किंवा ‘३३ लक्ष पाऊले’ हे पुस्तक लिहिणारे दि.बा.मोकाशी यांचे व इतरांचेही लिखाण वाचल्याने, मूळ प्रश्नाच्या तळाशी जाण्याचा प्रयत्न या शोधयात्रेच्या निमित्ताने झालेला दिसत नाही. या शोधयात्रेचा शेवटही तेवढासा भावनात्मक झालेला नाही. लेखासोबत ठिकठिकाणच्या प्रकाशचित्रांचाही खूप चांगला वापर करता आला असता, तो का केला गेला नाही, याचाही खुलासा या शोधयात्रेतून होत नाही.

आज सर्वच माध्यमे बाजारवादाचे समर्थन करू लागल्याने, ‘साधना’ या ध्येयनिष्ठ साप्ताहिकाला सामाजिक बांधिलकी दाखवून बदलत्या महाराष्ट्राचे ग्रामीण वास्तव महाराष्ट्राच्या पन्नाशीच्या निमित्ताने (राजा शिरगुप्पेंच्या लेखणीतून) मांडावे वाटले, हेही नसे थोडके. पण या शोधयात्रेतील सुटलेले दुवे साधनाला सहज साधता आले असते. राजा शिरगुप्पेंच्या लिखाणाला ते सहज साध्यही आहे. या शोधयात्रेसाठी राजा शिरगुप्पेंनी घेतलेली भ्रमंतीची मेहनत खरोखरच अभिनंदनीय आहे. परंतु साधनातील ही शोधयात्रा वाचताना पूर्ण समाधान मिळत नाही, ही प्रामाणिक प्रतिक्रिया नोंदवीत आहे, कृपया गैरसमज नसावा...

**नरेंद्र लांजेवार**

ग्रंथपाल, भारत विद्यालय, बुलडाणा.

l_narendra2001@yahoo.com

Mob. : 9422180451

## अवास्तव अपेक्षा नको!

‘साधना’शी वर्षभरापासून जोडले गेलेले लेखक राजा शिरगुप्पे यांनी ‘भारतभ्रमण करून साधनासाठी लेखन’ करण्याचा प्रस्ताव ठेवला तेव्हा आम्ही त्यांना सांगितले, ‘भारतभ्रमण नंतर पाहू, पण तूर्त महाराष्ट्र राज्याच्या सुवर्णमहोत्सवाच्या निमित्ताने महाराष्ट्रात भटकंती करून साधना दिवाळी अंकासाठी काही लिहा.’ याबाबत भटकंतीचा प्रदेश राजा शिरगुप्पे यांनी ठरवावा, पण जास्तीत जास्त ३० पानांचा लेख असावा आणि तो दीड महिन्यांत मिळावा. अशी अपेक्षा आम्ही व्यक्त केली होती. त्यानुसार राजा शिरगुप्पेंनी एक महिनाभर भटकंती करून पंधरा दिवस लेखनासाठी देऊन तो ४६ पानी लेख लिहिला. तो लेख हातांत आला तेव्हा आम्ही त्याचे शीर्षक अतिशय विचारपूर्वक दिले. ‘शोधयात्रा : ग्रामीण महाराष्ट्रातील दुर्गम भागांची.’ या शीर्षकातून व त्यासोबतच्या संपादकीय निवेदनातून तो लेख कशावर आधारित आहे हे पुरेसे स्पष्ट झाले आहे. शिवाय, राजा शिरगुप्पे यांनी ‘कोलंबसासारखं नाही, नामदेवासारखं’ या प्रास्ताविकात आणि ‘मी काय शिकलो?’ या समारोपात त्या शोधयात्रेची पार्श्वभूमी, तिचा उद्देश, तिच्या मर्यादा आणि काढलेले निष्कर्ष हे सर्व अतिशय नेमकेपणाने मांडलेले आहे. या प्रदीर्घ लेखाकडे कोणत्या दृष्टिकोनातून पाहावे व कोणत्या चौकटीत तो वाचला जावा, हे स्पष्ट करण्यास ते पुरेसे आहे. त्यामुळे नरेंद्र लांजेवार या तरुण मित्राने वरील पत्रात व्यक्त केलेल्या अपेक्षा अवास्तव आहेत असे म्हणणे भाग आहे. नरेंद्र म्हणतो त्या प्रमाणे लिहायचे असेल तर एका व्यक्तीला काही वर्षे किंवा एखाद्या संस्थेला काही महिने काम करावे लागेल.

अशा अवास्तव अपेक्षांचे ओझे संवेदनशील लेखकावर लादले तर तो गुदमरून जाण्याची शक्यता असते; नरेंद्रनेच वरील पत्राची सुरुवात ‘‘संवेदनशील लेखक राजा शिरगुप्पे’’ अशी केली आहे, म्हणून हा खुलासा.

**– संपादक ‘साधना’**

*साधना अंकास हार्दिक शुभेच्छा*

# दि मुळा प्रवरा इलेक्ट्रीक को–ऑपरेटिव्ह सोसायटी लि.

## श्रीरामपूर, जि. अहमदनगर, (महाराष्ट्र राज्य)

**: वैशिष्ट्ये :**

* सुरळीत वीजपुरवठा... ग्राहकांची सेवा * ग्रामीण विद्युतीकरण क्षेत्रात महाराष्ट्रातील * एकमेव यशस्वी सहकारी वीज संस्था * आशिया खंडातील सर्वात मोठी एकमेव यशस्वी सहकारी वीज संस्था * शासनाच्या धोरणानुसार कार्यक्षेत्राचा शेती आणि औद्योगिक विकासात सिंहाचा वाटा * ग्राहक व सभासद यांना तत्पर व विनम्र सेवा * विजेची काटकसर करा, वीजबिले वेळेवर भरा तसेच विजेचा अनधिकृत वापर टाळा, अपारंपरिक ऊर्जा वापरावर भर द्या.

**लोकनेते**



**मा. स्वा. बाळासाहेब विखे-पाटील**
माजी केंद्रीय मंत्री, अध्यक्ष स्थायी समिती
केंद्रीय संरक्षण खाते, नवी दिल्ली

**चेअरमन**



**मा. श्री. आण्णासाहेब सारंगधर म्हस्के-पाटील**
माजी पाटबंधारे, फलोद्यान, सामाजिक
वनीकरण व कृषि राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

**व्हा. चेअरमन**



**मा. श्री. सचिन रंगराव गुजर**

## संचालक मंडळ

**मा.आमदार श्री.राधाकृष्ण एकनाथराव विखेपाटील**
परिवहन, बंदरे, विधी व न्याय मंत्री, महाराष्ट्र राज्य
**मा.श्री.शिवाजीराव रामभाऊ गाडे–पाटील**
(माजी चेअरमन)
**मा.श्री.रामभाऊ लक्ष्मणराव लिप्टे–पाटील**
(मा.संचालक अ.नगर, जिल्हा मध्यवर्ती सह.बँक मर्या.अ.नगर)
**मा.श्री.इंद्रभान रावसाहेब थोरात–पाटील**
**मा.श्री.बाबासाहेब लक्ष्मण भिटे**
(मा.अध्यक्ष, जिल्हा परिषद, अहमदनगर)
**मा.श्री.पोपटलाल चंदनमल कुंकूलोळ**
**मा.श्री.अशोक निवृत्ती बागूल**
**मा.श्री.चंद्रकांत पन्नालाल चुत्तर**
**मा.सौ.अनुराधा रमेश वने**
**मा.श्री.गंगाधर भिवाजी चौधरी–पाटील** (स्वीकृत)
**मा.चीफ प्रोजेक्ट मॅनेजर, ग्रा.वि.निगम, मुंबई** (प्रतिनिधी)

**मा.आ.श्री.चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम–पाटील**
**मा.श्री. रामदास विश्वनाथ धुमाळ–पाटील**
(चेअरमन, डॉ.बाबूराव दादा तनपुरे सह.साखर कारखाना लि., श्रीशिवाजीनगर)
**मा. श्री.भानुदास काशिनाथ मुरकुटे** (माजी आमदार)
**मा.श्री.जलीलखाँ अब्दुलकरीमखाँ पठाण**
**मा. श्री.अनिल शामराव कांबळे**
**मा.श्री.सुभाष जानजी अंत्रे–पाटील**
**मा.श्री.अरुण बाबूराव तनपुरे**
(सभापती, कृषि उत्पन्न बाजार समिती, राहुरी)
**मा.श्री.भास्कर दिगंबर खर्डे–पाटील**
**मा.श्री.सिद्धार्थ भानुदास मुरकुटे**
**मा.सौ.मंगलाबाई बाळकृष्ण चोरमुंगे**
**मा.श्री.सुरेश मोहनीराज करपे–पाटील** (स्वीकृत)
**मा.श्री.मंजाबापू धोंडिबा थोरात** (स्वीकृत)
**मा.अधिक्षक अभियंता, म.रा.वि.कंपनी अ.नगर** (प्रतिनिधी)

**मा.जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, अ.नगर** (प्रतिनिधी)

साधना साप्ताहिक
२ जानेवारी २०१०

एन.डी.नं. आर.एन.आय.१६०१/५७
रजि.क्र.एल-२/आर.एन.पी./पी.एन.सी.डब्ल्यू./डब्ल्यू-१७८/२००९-२०११
तिकिटाशिवाय पाठवण्याचा परवाना नं.७
पोस्टींग दर गुरुवारी मार्केट यार्ड पी.एस.ओ.सॉर्टिंग ऑफिसमधून

*साधना अंकास हार्दिक शुभेच्छा*

# श्री बलभीम विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था मर्या. क।। नूल, गडहिंग्लज.

**किसान मिनी बँक**

: संस्थेची माहिती :

सभासद : १२५८

भागभांडवल : २३,५१,६७० * खेळते भांडवल : १,०३,४४,९९०



**मा. श्रीपतरावजी शिंदे**
**चेअरमन**

**श्री. आप्पासो गणपतराव यादव**
सभापती

**श्री. सुभाष आप्पासो देसाई**
उपसभापती

**श्री. रामाप्पा इराप्पा मुदपाकी**
सचिव

**संचालक, सर्व सभासद व कर्मचारी वृंद**